# महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन

वर्ष १ ले, अंक १२ वा, एप्रिल-२०२६

पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना




प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक १२ वा, एप्रिल-२०२६

**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव**

सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११०६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड**

उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-४११०६७

**वृत्तसंपादक**

**श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,**

'महापशुधन वार्ता' कक्ष, पशुधन पर्यवेक्षक
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**मुख्य संपादक**
**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११०६७**




मागील अंक वाचण्यासाठी

dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

महापशुधन वार्ता

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना



मा. श्रीमती पंकजा मुंडे
मा. मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, मंत्रालय, मुंबई-४०००३२

“महाराष्ट्र सरकारने ग्रामीण भागातील अर्थकारणाला गती देण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सुरू केली आहे. ही योजना आपल्या पशुपालक आणि शेतकरी बांधवांसाठी खऱ्या अर्थाने 'गेम चेंजर' ठरणार आहे.या योजनेचा मुख्य फायदा असा की, याद्वारे ग्रामीण महिलांना, तरुणांना आणि शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व शेळी-मेंढी पालनासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य आणि अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे राज्यामध्ये केवळ पशुधनाशी संबंधित उद्योजकांची संख्या वाढणार नाही, तर दर्जेदार पशुजन्य पदार्थांचे उत्पादन होऊन पशुसंवर्धनाच्या व्यवसायात क्रांतिकारी बदल होतील. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे आणि ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करून स्थलांतर रोखणे, हा या योजनेचा केंद्रबिंदू आहे. ही योजना पशुपालकांना केवळ 'उत्पादक' न ठेवता 'उद्योजक' बनवणारी आहे, त्यामुळे ग्रामीण भागात आगामी काळामध्ये रोजगाराच्या संधींची संख्या निश्चितपणे वाढेल आणि माझा पशुपालक हा इतरांना रोजगार देणारा उद्योजक ठरेल, असा मला विश्वास आहे.”



मा. डॉ. रामास्वामी. एन
सचिव (पदुम) महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-४०००३२

“मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना हा पशुपालकांच्या कल्याणाचा एक शाश्वत मार्ग आहे. ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देणारी एक क्रांतीकारी योजना ठरेल. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट केवळ पशुपालन नसून, पशुपालकांना 'उद्योजक' बनवणे हे आहे.या योजनेंतर्गत गाई, म्हशी, शेळी-मेंढी आणि कुक्कुट पालनासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान देऊन सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि शेतकऱ्यांना हमखास उत्पन्न देणाऱ्या रोजगाराची संधी उपलब्ध होईल. पशुधनामुळे राज्याच्या दूध, मांस व अंडी उत्पादनात वाढ होईल आणि पशुपालकांच्या हातात नियमित भांडवल उपलब्ध राहील. शेतीला पूरक जोडधंदा मिळाल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याला आता एक भक्कम आर्थिक आधार मिळेल. थोडक्यात सांगायचे तर, ही योजना ग्रामीण | महाराष्ट्रात समृद्धी आणणारी आणि पशुपालकांचे जीवनमान उंचावणारी ठरेल.”



मा. डॉ. किरण पाटील (भा. प्र. से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य
औंध, पुणे-४११०६७

“महाराष्ट्र शासनाची 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट करणारी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा मुख्य भर हा पशुपालकांचा 'पशु-उद्योजकां'मध्ये कायापालट करण्यावर आहे. गाई, म्हशी, शेळी-मेंढी आणि कुक्कुट पालनासाठी ७५% पर्यंत भरीव अनुदान देऊन ग्रामीण भागातील महिला, सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना हक्काचा रोजगार मिळेल. शेतीला पूरक जोडधंदा मिळाल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याला वर्षभर उत्पन्नाचा खात्रीशीर स्रोत उपलब्ध होईल. उच्च उत्पादनक्षम पशुधनामुळे राज्याच्या पशुजन्य उत्पादनात वाढ होऊन ग्रामीण भागात पशुजन्य उद्योगाचे जाळे विस्तारण्यास मदत होईल. थोडक्यात, या योजना केवळ अनुदान देणाऱ्या नसून, ग्रामीण भागात उद्योजकतेची नवी लाट निर्माण करणाऱ्या व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या ठरतील, याचा मला ठाम विश्वास आहे.”


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

महापशुधन वार्ता

## या अंकात...





- ❑ मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्यस्तरीय योजना)
- ❑ मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (जिल्हास्तरीय योजना)
- ❑ मा. डॉ. किरण पाटील यांनी स्वीकारला पशुसंवर्धन आयुक्तपदाचा कार्यभार
- ❑ महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाकडून 'जीवामृत'ची निर्मिती
- ❑ यवतमाळ महोत्सवात जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचा थाट; पशुपालकांचा उस्फूर्त प्रतिसाद
- ❑ राज्यात लवकरच देशी गोवंश डेअरीची स्थापना होणार: मा. शेखर मुंदडा
- ❑ रायगड: उरणमध्ये पशुपालकांसाठी प्रशिक्षण व कृती सत्र शिबिर संपन्न
- ❑ चंद्रपूर जिल्हास्तरीय कृषी, पशु-पक्षी प्रदर्शनी २०२६
- ❑ 'वन हेल्थ' राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाचे सादरीकरण
- ❑ नाशिकमध्ये 'शास्त्रीय शेळी व कुक्कुटपालन' प्रशिक्षण
- ❑ अहिल्यानगरमध्ये देशी गोवंश संवर्धनासाठी मोठे पाऊल;
- ❑ सातारा येथील एनएलएम प्रकल्पाची तपासणी
- ❑ तितूर येथे विशेष घटक योजनेअंतर्गत ३ दिवसीय पशुपालन प्रशिक्षण
- ❑ महा एनजीओ फेडरेशन व शासकीय प्रक्षेत्राचा स्तुत्य उपक्रम
- ❑ खलासना येथे गायीच्या डोळ्याच्या कर्करोगावर यशस्वी शस्त्रक्रिया
- ❑ चाळीसगावच्या 'टीएमव्हीपी' मध्ये प्रगत 'सीआर' एक्स-रे तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग
- ❑ प्राण्यांमधील अस्थिभंग आता असाध्य नाही
- ❑ १९६२ - वर्षभरात ३.७८ लाख तक्रारींचे निवारण
- ❑ मुख्यमंत्री पशुधन ग्रामीण उद्योजकता योजना: ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा रोडमॅप
- ❑ उष्माघाताचा धोका, तंत्रशुद्ध व्यवस्थापनातून वेळीच रोखा!
- ❑ गाई -म्हशीमधील दूध घट : कारणे व शास्त्रोक्त उपाय!
- ❑ जीवामृत: पशुधन व शेतीतील समृद्ध सहसंबंध
- ❑ वेळेवर गर्भधारणा = दरवर्षी वासरू = शाश्वत दुग्ध उत्पादन
- ❑ मथुरा-लभान गोवंश : वैशिष्ट्ये व प्रजनन क्षेत्र
- ❑ आयटी इंजिनिअर्सच्या डेअरी फार्मला पशुसंवर्धन विभागाचा तांत्रिक आधार
- ❑ पशुसंवर्धन विभागाची मिळता साथ, मल्हारा गावात उगवली समृद्धीची पहाट


**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना शासन निर्णय प्राप्त करण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा.**




# राज्यस्तरीय योजना

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमाद्वारे जनमानसाचे जीवनमान उंचावणे, शाश्वत आर्थिक समृद्धी मिळवणे, पर्यावरणीय व्यवस्थापन स्थिर ठेवून राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सची करण्याचे राज्याचे ध्येय आहे. सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पुर्ण होत आहेत. राज्यातील नागरिकांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षा व न्याय व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत राज्यात १०० उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कृषी व संलग्न क्षेत्रातील ७ उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून, शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. या उपक्रमाव्दारे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व पशुपालन या शेतीपुरक जोडधंद्यांना उद्योजकतेचे स्वरुप देण्यासाठी सुयोग्य वातावरण (integrated ecosystem) उपलब्ध करुन देणे, हा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना'- राज्यस्तरीय योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.



**डॉ. रामास्वामी एन.** (भा.प्र.से.)
सचिव (पदुम),
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखड्यानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देणारे ८ घटक सुनिश्चित केले आहे. त्यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात भरीव सहभाग नोंदविण्यासाठी पशुजन्य उत्पन्नात वाढ करण्याच्या व्यापक भूमिकेतून पशुआरोग्याच्या सुविधेबरोबरच पशुपालन व्यवसायास पोषक वातावरण उपलब्ध करुन देणे हे पशुसंवर्धन विभागाचे धोरण आहे. यासाठी पशुसंवर्धन विभाग पशुपैदास सुधारणा (Breeding), पशुधनाचे आरोग्य (Animal Health), वैरण विकास (Fodder), पशुखाद्य (Feed) व पशुधनाचे व्यवस्थापन (Management) या पंचसूत्रीनुसार काम करत आहे.

राज्यात केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची वंशावळ निर्माण करण्यासाठी कृत्रिम रेतन, लिंग विनिश्चित रेत मात्रांचा पुरवठा, भृण प्रत्यारोपण या आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येत असून, पशुपालकांना त्यांच्या दारात पशुआरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने फिरते पशुचिकित्सा पथके कार्यान्वित आहेत. याशिवाय उत्पादन वाढीसाठी वैरण विकास कार्यक्रमासही प्राधान्य देण्यात येत आहे. पशुजन्य उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने विभाग प्रयत्नरत आहे. जेणेकरुन, पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होवून राज्याच्या अर्थव्यवस्थेस बळकटीकरण प्राप्त होईल.

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालात चालू असलेल्या योजनांचे पुनर्विलोकन करुन पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजना एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस केली. मा. मंत्रिमंडळाने दि. १९.०८.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत सदर अहवाल स्विकारला. त्यानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या जिल्हा वार्षिक व राज्यस्तरीय योजनांमध्ये सुसुत्रिकरण करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला होता. मा. मंत्रिमंडळाने दिनांक २२.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर मान्यतेनुसार सध्या अंमलात असलेल्या १८ राज्यस्तरीय योजनांपैकी २ राज्यस्तरीय योजना सुरु ठेवण्यास, ११ योजना बंद करण्यास, ५ योजना सुधारित स्वरुपात व ५ नविन योजना सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सुधारीत व नवीन योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे:

## १) ५ दुधाळ गाय / म्हैस पालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास योजना :-



**लाभाचे स्वरुप:** लाभार्थ्यांना ०५ दुधाळ गाय/ म्हैस व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील अल्पभुधारक, अत्यल्प भुधारक व महिला बचत गट

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभाथी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

ब) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ, ब, क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

१) १ एकर स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्ट्याची जमीन आवश्यक. वनहक्क धारकांना सदर अट लागू राहणार नाही.

२) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील)

किंवा

२ वर्षाचा दुग्ध व्यवसायाचा अनुभव

**प्रकल्पाची किंमत:**

(१) ५ गाय/ म्हैस रु. ५,००,०००/- (प्रति गाय व म्हैस रु. १ लक्ष) व विमा (रु ५,६०,१८०/-)

(२) शेड निर्मिती- रु. ३,००,०००/-

(३) साधन सामुग्री (कडबाकुट्टी यंत्र, फॉगिंग मशीन, खाद्यपाण्याची भांडी, मिल्कींग मशीन, दुध कॅन, फवारणी यंत्र, सोलर ३५ व इतर साहित्य) रु.२,७५,०००/-

**प्रकल्पाची एकूण किंमत**-रु. ११,३५,१८०/-

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु. ५,६७,५९० /-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के (रु. ८,५१,३८५/-)

३) अनुदान २ टप्यात देय राहील. एकुण अनुदानाच्या ५० टक्के इतके पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती तसेच साधनसामुग्री खरेदी केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान जनावरांच्या खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे:**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.) **किंवा** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा दूध संस्थेस किमान २ वर्ष दूध विक्री करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) या योजनेमध्ये प्रती दिन १० ते १२ लिटर दूध उत्पादन देणाऱ्या एच.एफ., जर्सी या संकरित गाई, प्रतीदिन ८ ते १० लिटर दूध उत्पादन देणाऱ्या गीर, सहीवाल, रेड सिंधी, राठी, थारपारकर, प्रती दिन ५ ते ७ लिटर दूध उत्पादन देणाऱ्या स्थानिक प्रजातीच्या गायी / म्हशींचे वाटप करण्यात येईल.

२) वाटप करावयाची दुधाळ जनावरे ही शक्यतो १-२ महिन्यांपूर्वी व्यालेली दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील असावीत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी करावी.

४) एक महिन्याच्या कालावधीत संबंधित लाभार्थ्याने त्याच्या पसंतीनुसार इतर राज्यातून दुधाळ जनावरांची खरेदी करावी. जर लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

५) शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

६) वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

७) योजनेमध्ये वाटप केलेले जनावर मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसरे दुधाळ जनावर खरेदी करुन पुरविण्यात यावे.

८) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्याचा शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरे खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

९) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१०) योजनेंतर्गत प्राप्त दुधाळ जनावरांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या प्रमुखाने करणे बंधनकारक राहील.

११) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## २) शेळी-मेंढीपालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास योजना :-

**लाभाचे स्वरुप:** ५०+५ शेळी/मेंढी गट व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला बचत गट

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

ब) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ, ब, क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के व महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.





**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**पात्रता**

१) स्वतःची १ एकर किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा इतकी जमीन आवश्यक, मात्र वनहक्क धारकांना सदर अट लागू राहणार नाही.

२) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) **किंवा** २ वर्षाचा शेळी/मेंढी व्यवसायाचा अनुभव

**प्रकल्पाची किंमत : ५०+५ शेळी/मेंढी**

१) पशुधन खरेदी- प्रती शेळी / मेंढी रु. १२,०००/- व बोकड / मेंढा रु.१५,०००/- प्रमाणे गटाची किंमत- रु. ६,७५,०००/-

२) ३ वर्षाचा विमा-१२.७५% (+ १८% GST)-रु. १,०१,५५४/-

३) शेड निर्मिती- रु. २,००,०००/-

४) कडबा कुट्टी यंत्र-रु.३०,०००/-

५) सोलर (३ kw)-रु. १,३२,०००/-

**प्रकल्पाची एकूण किंमत - रु.११,३८,५५४/-**

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के ( रु. ५,६९,२७७/-)

२) अनु. जाती जमाती लाभार्थी ७५ टक्के (रु. ८,५३,९१५/-)

३) अनुदान २ टप्प्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती तसेच साधनसामुग्री खरेदी केल्यानंतर व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान शेळी/मेंढी गट खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमीपत्र.) किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) खरेदी समितीच्या उपस्थितीत गटाची खरेदी करावी.

२) खरेदी प्राथम्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या प्रक्षेत्रावर उत्पादित झालेल्या शेळ्या-मेंढ्यांतून करण्यात यावी.

३) महामंडळाच्या प्रक्षेत्रावर शेळ्या-मेंढया उपलब्ध नसल्यास महामंडळाकडून ना-उपलब्धता प्रमाणपत्र घेवून गटाची खरेदी खाजगी / राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळ्या-मेंढ्यांच्या ब्रिडींग फार्म, स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित शेळी प्रकल्पावरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंती व वजनानुसार करावी.

४) सदरच्या शेळ्या, मेंढया, बोकड व मेंढे स्थानिक वातावरणात तग धरतील याची दक्षता घेण्यात यावी.

५) या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाच्या शेळया मेंढया तसेच, बोकड / मेंढे यांचे वय १ ते ३ वर्ष वयोगटातील असाव्यात.

६) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, गठीत समिती समवेत शेळी / मेंढी गट खरेदी करावी.

७) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरांची खरेदी न केल्यास त्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

८) शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, पशुधनाच्या खरेदीनंतर पशुधन वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

९) वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

१०) योजनेतील शेळ्या-मेंढ्या मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसऱ्या शेळया / मेंढ्या खरेदी करुन पुरविण्यात याव्यात.

११) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, पशुधन खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त यांना सादर करावा.

१२) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१३) योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची नोंद एनडीएलएम पोर्टलवर कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थाप्रमुखाने करणे बंधनकारक राहील.

१४) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## ३) कुक्कुट पक्षांचे वाटपः -

### अ) अंडी देणाऱ्या सुधारित कुक्कुट / देशी पक्षांचे वाटपः




**लाभाचे स्वरुप:** किमान २०० अंडी उत्पादन देणारे ५००० एक दिवशीय पक्षी, १ महिन्याच्या खाद्यावरील खर्च, अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने शेड बांधकाम, खाद्य, पाणी पुरवठा, भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट, ऑटोमेशन प्रणाली, इत्यादी आवश्यक साहित्य, सोलर (३ kw)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भुधारक,
ब) अल्पभुधारक,
क) वनहक्क धारक
ड) सुशिक्षित बेकार,
इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.
२) आरक्षणानुसार पुरेसे महिला पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**प्रकल्पाची किंमत**

१) किमान २०० अंडी उत्पादन देणारे ५००० एक दिवशीय पक्षी (रु. ५०/-प्रती पक्षी प्रमाणे) - रु. २,५०,०००/-
२) १ महिन्याच्या खाद्यावरील खर्च (३ कि.ग्रॅ. प्रती पक्षी x ५००० पक्षी x रु.३०/- प्रती कि.ग्रॅ. प्रमाणे) रु. ४,५०,०००/
३) अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने शेड बांधकाम रु. १५,००,०००/-च्या मर्यादेत
४) खाद्य, पाणी पुरवठा, भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट, ऑटोमेशन, इत्यादी आवश्यक साहित्य- रु. ६,६८,०००/-
५) सोलर (३ kw) - रु.१,३२,०००/-
६) प्रकल्प एकूण किंमत - रु.३०,००,०००/-

**पात्रता**

१) किमान २० गुंठे स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.
२) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु. १५,००,०००/-)
२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी- ७५ टक्के (रु. २२,५०,०००/-)
३) अनुदान २ टप्प्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के इतके पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्यांने शेड निर्मिती केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान साधनसामुग्री खरेदी व पक्षी खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे किंवा स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र) **२)** वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) प्रकल्पासाठी कर्ज मंजूरी सहमती

**अटी व शर्ती:**

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान २०० अंडी उत्पादन देणारे असाव्यात.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट / सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र/ राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घ्यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच दोन महिन्याच्या आत लाभार्थ्याने कुक्कुटपालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या एक महिन्याच्या कालावधीत पक्षी, खाद्य/पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुटपालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुट पक्षांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) अनुदानाच्या ५० टक्के अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करताना बँकेचे कर्ज मंजूरी आदेश

८) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

## आ) पशुपालक/शेतकऱ्यांना देशी / सुधारित मांसल कुक्कुट ३००० ते ५००० पर्यंत पक्षांच्या संगोपनाद्वारे उद्योजकता विकासः

**लाभाचे स्वरुप:** शेड क्षेत्र, सोलर, खाद्य व पाणी भांडी, सोलर प्रणाली (३ kw क्षमतेची)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भुधारक,

ब) अल्पभुधारक,

क) वनहक्क धारक

ड) सुशिक्षित बेकार,

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.



**प्रकल्पाची किंमत:**

**१) शेड** - प्रती पक्षी १.२ चौ.फु. जागा आवश्यक, खर्च रु. २५०/- प्रती चौ.फु. दर

**२) खाद्य व पाणी भांडी इत्यादी** प्रती पक्षी रु.५०/- प्रमाणे

**३) सोलर अंदाजीत** - रु १५००००/- (अन्य योजनेत अनुदानाचा लाभ घेतल्यास अनुज्ञेय नाही)

**४) प्रकल्पाची एकूण किंमत-३००० पक्षी-** रु. १२,००,०००/-

**५) ५००० पक्षी-** रु. १९,००,०००/-



**पात्रता**

१) किमान २० गुंठे स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

२) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभघेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (३००० पक्षी ६,००,०००/- तर ५००० पक्षी-रु. ९,५०,०००/-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के (३००० पक्षी-९,००,०००/- तर ५००० पक्षी-रु. १४,२५,०००/-)

३) अनुदान २ टप्पात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के इतका पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्याचे ५० टक्के अनुदान साधनसामुग्री खरेदी व पक्षी खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे:**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

**किंवा**

कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) प्रकल्पासाठी कर्ज मंजूरी सहमती

**अटी व शर्ती**

१) सुधारित पक्षी खुल्या बाजारातून खरेदी करता येतील.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट / सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र / राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घेण्यात यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच दोन महिन्यात लाभार्थ्याने कुक्कुट पालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या १ महिन्यात पक्षी, खाद्य/पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुट पालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुट पक्षांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) अनुदानाच्या ५० टक्के अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करताना बँकेचे कर्ज मंजूरी आदेश

८) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

९) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१०) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

## इ) १००० प्रती आठवडा अंडी उबवणी क्षमतेच्या संयंत्राचा (Incubator, Hatcher) पुरवठा:




**लाभाचे स्वरुप:** प्रती आठवडा १००० अंडी उबवणी क्षमतेचे संयंत्र (Incubator, Hatcher), सोलर यंत्रणा (३ kw क्षमता)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन,

ब) अत्यल्प भुधारक,

क) अल्पभुधारक,

ड) सुशिक्षित बेकार,

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता:**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**प्रकल्पांची किंमत**

१) प्रती आठवडा १००० अंडी उबवणी क्षमतेचे संयंत्र (Incubator, Hatcher) रु २, ०८,०००/-

२) सोलार युनिट (३ kw)- **रु १,३२,०००/-**

एकूण किंमत **३,४०,०००/-**

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु.१,७०,०००/-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी - ७५ टक्के टक्के (रु. २,५५,०००/-)

**आवश्यक कागदपत्रे**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

२) दिव्यांगांसाठी UDID **प्रमाणपत्र**

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने अंडी उबवणी यंत्राची उभारणी करावी.

२) तद्नंतरच्या एक महिन्यात प्रत्यक्ष अंडी उबवणी सुरु करावे.

३) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत अंडी उबवणी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, **छायाचित्र**, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

५) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

६) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

७) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.




**लाभाचे स्वरुप:** मुरघास हार्वेस्टर (चार ओळी एकाचवेळी हॉरवेस्ट) व मुरघास बेलर संयंत्र

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अ.जाती, जमाती लाभार्थी निवड खालील घटकांतून उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक ब) अल्प भूधारक क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ व क मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता:**

किमान १० मोठे पशुधन / १०० शेळ्या किंवा मेंढ्या संख्या, स्वतःचा किमान ५० hp ट्रॅक्टर आवश्यक.

उपकरणाची किंमत रु.२६,००,०००/- च्या मर्यादेत

**अनुदानाचे स्वरुप:**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु.१३,००,०००/-)

२) अनुसुचित जाती / जमाती लाभार्थी ७५ टक्के (रु.१९,५०,०००/-)

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान १० मोठे पशुधन / १०० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) अर्जदाराच्या नावे / कुटुंबातील सदस्याचे नावे असलेले ट्रॅक्टरचे नोंदणी कार्ड (आरसी कार्ड)

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) बँकेचे कर्ज मंजूरीबाबतचे सहमती पत्र किंवा स्वनिधीतून मुरघास सयंत्र खरेदी करणार असल्यास किमान स्वः हिश्श्याची रक्कम जमा असल्याचे स्वतः च्या बँक खात्याचे एक महिन्याचे विवरणपत्र

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या आत मुरघास हार्वेस्टर खरेदीसाठी रकमेचा भरणा करावा.

२) लाभार्थ्यांने ३ महिन्याच्या आत मुरघास हार्वेस्टर (चार ओळी एकाच वेळी हॉरवेस्ट) व मुरघास बेलर संयंत्र खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) मुरघास हार्वेस्टर व मुरघास बेलर संयंत्र वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

६) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

**योजनेचे नाव:** शेळी /मेंढी / गाय / म्हैस / कुक्कुटपालन व्यवसायाद्वारे उद्योजकता विकास करणेसाठी घेतलेल्या कर्जामध्ये व्याज सवलत देणे.

**लाभाचे स्वरुप:** शेळी / मेंढी / गाय / म्हैस /कुक्कुटपालन व्यवसायासाठी प्रकल्प धारकाने वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या कर्जाची विहीत मुदतीत परतफेड केल्यास व्याज दरात ४ टक्के व्याज सवलत

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.




**पात्रता:**

१) बँकेकडून कर्ज घेऊन शेळी / मेंढी / गाय / म्हैस / कुक्कुटपालन प्रकल्प, चारा प्रक्रिया / पशुखाद्य निर्मिती कारखाना

२) केंद्र / राज्याच्या अन्य अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

**अनुदानाचे स्वरुप:**

कर्जावरील व्याजदरात ४ टक्के सवलत एकुण रु. ४,००,००० च्या मर्यादेत पुर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर

**आवश्यक कागदपत्रे**

बँकेचे प्रकल्प मंजूरी व कर्ज मंजूरीचे पत्र

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने निवड झाल्याचे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांनी कळविल्यानंतर प्रकल्प / कारखाना उभारणी करावी.

२) कर्जाची विहित वेळेत परतफेड करणे आवश्यक.

३) घेतलेल्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के सवलत (एकूण रु. ४,००,००० च्या मर्यादेत) पुर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर बँकेचे नादेय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.




**व्यवस्थापन: पशुसंवर्धन व्यवसायात Artificial Intelligence व ML (Machine Learning) तंत्रज्ञानाचा वापर :-**

**लाभाचे स्वरुप:** पशुपालकाकडील गाय / म्हैशीच्या गळ्यातील सेन्सर/स्मार्ट कॉलर बेल्ट प्रती गाय / म्हैस रु ५०००/- व एका गोठ्यासाठी गेटवे रु १०,०००/- (५० टक्के अनुदान तत्वावर) किमान ५ ते ४० गायी / म्हशी.

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**पात्रता:** भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेल्या स्वतःच्या किमान ५ गायी / म्हशी

**प्रकल्प किंमत**

१) गाय / म्हशीच्या गळ्यातील सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट प्रती गाय / म्हैस रु. ५०००/-

२) एका गोठ्यासाठी (किमान ५ ते ४० गायी/म्हशी) गेटवे रु. १०,०००/-

**अनुदानाचे स्वरुप**

सर्व प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान तत्वावर (प्रती लाभार्थी रु. १,००,०००/-च्या मर्यादेत)

**आवश्यक कागदपत्रे**

स्वतः च्या मालकीच्या ५ गायी / म्हशी असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

**कार्यपध्दती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत गायी / म्हशीसाठी सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठयासाठी गेटवे खरेदी करुन वापर सुरु करावा.

२) लाभार्थ्याने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत गायी / म्हशीसाठी सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठयासाठी गेटवे खरेदी करुन वापर सुरु न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) गायी / म्हशीसाठी सेन्सर/स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठ्यासाठी गेटवेचा वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

६) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

**अंमलबजावणीची कार्यपध्दती (वैयक्तिक लाभाच्या योजना) :-**

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक व्हावे यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या अहवालात पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी अशी शिफारस केली आहे. ही बाब विचारात घेवून राज्यस्तरीय योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी लाभार्थी निवड एकाच प्रणालीव्दारे ऑनलाईन करण्यात येईल. योजना राबविण्यासाठी कार्यपध्दती:

**अ) लाभार्थी निकष:**

वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवडीसाठी योजनानिहाय निकष संबधित योजनेत दर्शविण्यात आले आहेत. ज्या योजनांचा लाभ भुमीहीन लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे, अशा योजनांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**ब) लाभार्थी निवड -**

१) योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस वेळापत्रकाची आखणी करुन विहीत कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवावेत.

२) प्राप्त अर्जाची छाननी ऑनलाईन पध्दतीने करुन निवड समितीमार्फत यादृच्छिक (Random) पध्दतीने जे लाभार्थी अटी व शर्तीची पुर्तता करतात, अशा लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

३) संबंधित भागाचा समुह स्वरुपात विकास होईल याद्दष्टीने लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी, यासाठी आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्या-त्या भागातील भौगोलीक स्थिती, जिल्हा नियोजन आराखडा व स्थानिक व्यावसायिक पर्यावरण विचारात घेवून जिल्हानिहाय लक्ष्यांक निर्धारित करावे.

४) अनुदानाअभावी त्या-त्या आर्थिक वर्षात योजनेचा लाभ देणे शक्य होणार नाही, असे लाभार्थी प्रतीक्षाधीन ठेवण्यात येतील.

५) संबंधित योजनांसाठी लाभार्थी निवडीसाठी दरवर्षी अर्ज मागविण्यात येतील. मात्र, मागील आर्थिक वर्षात प्रतीक्षाधीन असलेल्या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल.

**क) निवड समिती:**

(i) वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- | अध्यक्ष |
| २. जिल्हा समाज कल्याण अधिकारी- | सदस्य |
| ३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प- | सदस्य |
| ४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी (जिल्हा परिषद)- | सदस्य |
| ५. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | सदस्य सचिव |

(ii) मांसल कुक्कुट ३०००/५००० कुक्कुटपक्षी व अंडी देणाऱ्या ५००० कुक्कुटपक्ष्यांचे वाटप व मुरघास संयंत्र वाटप योजना या ३ योजनांसाठी प्राप्त अर्जाची तपासणी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **१) आयुक्त पशुसवंर्धन व दुग्धव्यवसाय** | **अध्यक्ष** |
| २) अतिरिक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय | सदस्य |
| ३) संबंधित विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहआयुक्त | सदस्य |
| **४) सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (पशुधन व नियोजन)** | **- सदस्य सचिव** |

समितीने तपासणीअंती शिफारस केलेल्या प्रस्तावांची अंतिम निवड खालील समितीमार्फत करण्यात येईल -

| | |
|---|---|
| **१) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय** | **अध्यक्ष** |
| २) आयुक्त पशुसवंर्धन व दुग्धव्यवसाय | सदस्य |
| ३) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, आदिवासी विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| **७) सह/उपसचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय** | **सदस्य सचिव** |

**ड) खरेदी समिती** दुधाळ पशुधन, बैल जोडी व शेळी मेंढी गट वाटप योजनांतर्गत पशु वाटपासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीद्वारे खरेदी करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **१) संबंधित तालुक्याचे तालुका पशुसंवर्धन अधिकारी :-** | **अध्यक्ष** |
| २) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखान्याचे संस्थाप्रमुख - | सदस्य |
| ३) बँक बँक (कर्ज चर्चा) | सदस्य |
| ४) विमा कंपनीचा प्रतिनिधी | सदस्य |
| **५) लाभार्थी** | **सदस्य** |

**टिप -**

१) वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान हे त्यांच्या बँक खात्यात पशुधनाची खरेदी / प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर थेट जमा (DBT) करण्यात येईल.

२) व्याज सवलत योजनेंतर्गत देण्यात येणारी सवलत ही प्रकल्पधारकाने संबंधित बँकेकडून घेतलेल्या कर्जाची विहीत कालमर्यादेत परतफेड केल्यानंतर Back Ended Subsidy च्या स्वरुपात अदा केले जाईल.

**मूलभूत निर्देशक सुचना :**

१) एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ देण्यात येईल.

२) केंद्र शासनाच्या किंवा शासनाच्या इतर विभागाकडील समान योजनेचा लाभ घेतला असल्यास, सदर कुटुंबास या योजनेचा लाभ देय राहणार नाही. यासाठी केंद्र शासनाच्या किंवा शासनाच्या इतर विभागांकडील याच प्रकारच्या योजनेचा लाभ मागील ३ वर्षात इतर शासकीय संस्था / विकास मंडळाकडून घेतला नसलेबाबत अर्जदाराचे स्वयंघोषणापत्र घेण्यात येईल.

३) संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) हे या योजनांचे अमंलबजावणी अधिकारी असतील व ते या योजनांसाठी आहरण व संवितरण अधिकारी राहतील. विभागीय स्तरावर संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

४) योजना मुंबई व उपनगर वगळून इतर जिल्ह्यांसाठी लागू.

५) लाभार्थ्यांची योजनानिहाय निवड यादी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय, पुणे हे संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

६) संबंधित सहाय्यक आयुक्त (प.व दु.), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देतील.

७) लाभार्थ्यांची निवड झाल्याबाबत संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सर्व संबंधित लाभार्थ्यास लेखी कळवतील.

८) योजनांतर्गत निवड झालेल्या संबंधित लाभार्थी यांचेकडून योजनेचे अंमलबजावणीसाठी विहीत प्रपत्रात बंधपत्रे / योजनानिहाय आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यात येईल. लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे सर्वसमावेशक प्रारुप आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करुन ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात येईल.

९) लाभार्थ्यांनी शासकीय अनुदानाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास लाभार्थ्यांकडून अनुदानाची रक्कम व्याजासह महसूली कार्यपध्दीने वसूल करण्यात येईल. असे लाभार्थी / कुटुंब शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत लाभ देण्यास पुढील पाच वर्षासाठी अपात्र राहील, यासाठी त्यांच्या स्वतंत्र नोंदी ठेवण्यात येतील व तसे संबंधित ग्रामपंचायत, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना कळविण्यात येईल.

१०) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत तसेच, आदिवासी क्षेत्र उपयोजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी अनुक्रमे केवळ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीच खर्ची करण्यात येईल.

११) योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या दुधाळ जनावरे, शेळी-मेंढी व कुक्कुट पक्षी गटांची तसेच प्रकल्पांची पडताळणी पुढील आर्थिक वर्षात नजीकच्या जिल्ह्यातील अधिकारी यांच्यामार्फत Cross verification करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे.

१२) संबंधित आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी २ टक्के निधी प्रशासकीय खर्चासाठी खर्च करण्यात यावा.

**मुल्यमापन** - योजनेचे दर ३ वर्षांनी बार्टी, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन केंद्र यासारख्या शासन मान्यताप्राप्त त्रयस्त संस्थामार्फत मूल्यमापन करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या निधीतून करण्यात येईल.






# जिल्हा वार्षिक योजना

सद्यस्थितीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागांतर्गत १४ जिल्हा वार्षिक योजना अंमलात आहेत. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक करण्यासाठी चालु असलेल्या योजनांचे पुनर्विलोकन करुन पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची केलेली शिफारस विचारात घेवून चालु असलेल्या जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा घेण्यात आला आहे. सदर आढाव्याअंती अस्तित्वात असलेल्या १४ जिल्हा वार्षिक योजनांपैकी ६ जिल्हा वार्षिक योजना बंद करण्यास, ६ योजना सुधारित स्वरुपात व २ योजना कोणत्याही बदलाशिवाय पुढे चालू ठेवण्यास व ७ नवीन जिल्हा वार्षिक योजना सुरु करण्यास शासनाने दि. ०९ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.



**डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य
पुणे- ४११०६७

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमाद्वारे जनमाणसाचे जीवनमान उंचावणे, शाश्वत आर्थिक समृद्धी मिळवणे, पर्यावरणीय व्यवस्थापन स्थिर ठेवून राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स करण्याचे राज्याचे ध्येय आहे. सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होत आहे. राज्यातील नागरिकाना जागतिक दर्जाचे शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षा आणि न्याय व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत राज्यात १०० उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कृषी व संलग्न क्षेत्रातील ७ उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून, शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. या उपक्रमाव्दारे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि पशुपालन या शेतीपुरक जोडधंद्यांना उद्योजकतेचे स्वरुप देण्यासाठी सुयोग्य वातावरण उपलब्ध करुन देणे, हा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखड्यानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देणारे ८ घटक सुनिश्चित केले आहे. त्यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात भरीव सहभाग नोंदविण्यासाठी पशुजन्य उत्पन्नात वाढ करण्याच्या व्यापक भूमिकेतून पशुआरोग्याच्या सुविधेबरोबरच पशुपालन व्यवसायास पोषक वातावरण उपलब्ध करुन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे. यासाठी पशुसंवर्धन विभाग पशुपैदास सुधारणा, पशुधनाचे आरोग्य, वैरण विकास, पशुखाद्य व पशुधनाचे व्यवस्थापन या पंचसूत्रीनुसार काम करत आहे.

राज्यामध्ये केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची वंशावळ निर्माण करण्यासाठी कृत्रिम रेतन, लिंग विनिश्चित रेत मात्रांचा पुरवठा, भृण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व पशुपालकांना त्यांच्या दारात पशुआरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने फिरते पशुचिकित्सा पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. याशिवाय उत्पादन वाढीसाठी वैरण विकास कार्यक्रमासही प्राधान्य देण्यात येत आहे. पशुजन्य उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने विभाग प्रयत्नरत आहे. जेणेकरुन, पशुपालकांच्या पर्यायाने राज्याच्या अर्थव्यवस्थेस बळकटीकरण प्राप्त होईल.

यासाठी राज्य सरकारने दि. ०९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागात पशुउद्योजक तयार होऊन ग्रामीण अर्थचक्र अधिक वेगवान करण्यासाठी "**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना**" **जिल्हा वार्षिक योजना** अंतर्गत सुधारीत व नवीन योजना राबविण्याचे निश्चित केले आहे. या योजनांविषयी...




## १. दुभत्या जनावरांचे वाटप:

ग्रामीण भागातील पशुपालनाचा विकास आणि विशेषतः भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाने 'दुभत्या जनावरांचे गट वाटप' ही महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश दुग्धोत्पादनात वाढ करुन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

### योजनेचे स्वरूप व लाभ:

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दुभत्या गायी किंवा म्हशींचे गट वाटप केले जातात. यामध्ये दोन पर्याय उपलब्ध आहेत:

- १ दुभती गाय / म्हैस व ३ वर्षांचा विमा.
- २ दुभत्या गायी / म्हशींचा गट व ३ वर्षांचा विमा.

### लाभार्थी व पात्रता निकष

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवड खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

- ❑ भुमीहिन (फक्त १ गाय / म्हैस गटासाठी).
- ❑ अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत)
- ❑ अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर).
- ❑ महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)
- ❖ **विशेष आरक्षण:** दिव्यांग व्यक्तींसाठी ५ टक्के, तसेच १ गाय / म्हैस गटासाठी महिलांना ५० टक्के आणि २ गाय / म्हैस गटासाठी ३० टक्के आरक्षण लागू राहिल.
- ❑ १ गाय / म्हैस यासाठी जमीनधारणेची आवश्यकता नाही.
- ❑ २ गायी / म्हैस गटासाठी किमान १ एकर जमीन आवश्यक. मात्र, वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

### प्रशिक्षणाची अट

२ गाई / म्हशींच्या गटासाठी लाभार्थ्याकडे पशुपालन व्यवसायाचे शासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. जर प्रमाणपत्र नसेल, तर अनुदान मिळण्यापूर्वी प्रशिक्षण घेणे किंवा २ वर्षांचा दुग्ध व्यवसायाचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

### गटाची किंमत:

१ जनावरासाठी अंदाजे १,१२,०३६ रुपये, तर २ जनावरांच्या गटासाठी २,२४,०७२ रुपये (विमा रक्कमेसह) खर्च अपेक्षित आहे.

### अनुदानाचे प्रमाण:

- ❑ सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी: **५० टक्के.**
- ❑ अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गासाठी: **७५ टक्के अनुदान.**

### आवश्यक कागदपत्रे

१. ७/१२ उतारा किंवा ८-अ उतारा (किंवा ५ वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा).

२. वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसूची "जे" प्रमाणपत्र

३. पशुपालन दुग्धव्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

**किंवा,** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षांचे अनुभव प्रमाणपत्र **किंवा** दूध संस्थेस किमान २ वर्ष दूध विक्री करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र

४. दिव्यांगासाठी UDID प्रमाणपत्र.

६. बचत गटासाठी सदस्यत्व प्रमाणपत्र.

### अटी व शर्ती:

१) या योजनेमध्ये प्रती दिन १० ते १२ लिटर दूध देणाऱ्या एचएफ, जर्सी या संकरित गाई, प्रती दिन ८ ते १० लिटर दूध देणाऱ्या गीर, साहीवाल, रेड सिंधी, राठी, थारपारकर, प्रती दिन ५ ते ७ लिटर दूध देणाऱ्या देवणी, लाल कंधारी, गवळाऊ व डांगी गाई तसेच, मुऱ्हा व जाफराबादी या सुधारित जातीच्या म्हशी वाटप करण्यात येतील. वाटप करावयाची दुधाळ जनावरे ही शक्यतो १-२ महिन्यांपूर्वी व्यायलेली दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील असावीत.

२) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने गठीत समिती समवेत दुधाळ गाय म्हैस गटाची राज्या बाहेरुन खरेदी करावी.

३) जर लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

५) वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

६) योजनेमध्ये वाटप केलेले जनावर मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसरे दुधाळ जनावर खरेदी करुन पुरविण्यात यावे.

७) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

८) योजनेंतर्गत वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

ज्या शेतकऱ्यांकडे कमी जमीन आहे किंवा जे भूमिहीन आहेत, त्यांच्यासाठी ही योजना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून देणारी आहे. इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.




## २) शेळी / मेंढी गट वाटप योजना :-

### लाभाचे स्वरुप:

१) ५+१ शेळी / मेंढी गट + विमा किंवा

२) १०+१ शेळी / मेंढी गट + विमा

### लाभार्थी:

सर्व प्रवर्गातील भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला **बचत गट**

### लाभार्थी निकष:

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन (फक्त ५+१ शेळी/मेंढी गटासाठी)

ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

ड) वनहक्क धारक

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच ५+१ शेळी / मेंढी गटासाठी महिलांना ५० टक्के आणि १०+१ शेळी मेंढी गटासाठी ३० टक्के आरक्षण लागू राहील.

### पात्रता

१) फक्त ५+१ शेळी / मेंढी गटासाठी जमीनीची अट लागू नाही.

२) किमान १ एकर स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा, २ वर्षाचा शेळी / मेंढीपालन व्यवसायाचा अनुभव.

### गटाची किंमत

१) ५+१ शेळी/मेंढी

अ) पशुधन खरेदी

१) प्रती शेळी / मेंढी - रु. १२,०००/-

२) बोकड / मेंढा - रु. १५,०००/-

ब) विमा: १२.७५%

क) विक्री कर: १८%

ड) ५+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. ८६,२८४/-

२) १०+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. १,५५,३११/-

### अनुदानाचे स्वरुप

१) सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के

### आवश्यक कागदपत्रे

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र.

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.) **किंवा** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

४) दिव्यांगांसाठी UDID **प्रमाणपत्र**

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

### अटी व शर्ती

१) खरेदी समितीच्या उपस्थितीत गटाची खरेदी करण्यात यावी.

२) खरेदी प्राथम्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ प्रक्षेत्रावर उत्पादित शेळ्या-मेंढ्यातून करण्यात यावी.

३) महामंडळाच्या प्रक्षेत्रावर शेळ्या-मेंढ्या उपलब्ध नसल्यास महामंडळाकडून ना-उपलब्धता प्रमाणपत्र घेवून शेळी-मेंढी गटाची खरेदी खाजगी / राष्ट्रीय पशुधन अभियान / स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेळ्या-मेंढ्यांच्या ब्रिडींग फार्म्सवरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार वजनानुसार करण्यात यावी.

४) सदरच्या शेळ्या, मेंढया, बोकड व मेंढे स्थानिक वातावरणात तग धरतील याची दक्षता घेण्यात यावी.

५) या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाच्या शेळ्या / मेंढ्या तसेच, बोकड / मेंढे यांचे वय १ ते ३ वर्ष वयोगटातील असाव्यात.

६) निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत / १ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने गठीत समिती समवेत खरेदी करावी.

७) लाभार्थ्यांने कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

८) खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

९) वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

१०) योजनेतील पशुधन मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विमा रकमेतून दूसरे पशुधन खरेदी करावे.

११) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (प. व दु.) यांना सादर करावा.

१२) योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

१३) या संपुर्ण खरेदी प्रक्रियेचा समावेश लाभार्थ्याकडून करुन घ्यावयाच्या बंधपत्रामध्ये करण्यात यावा.






### ३) अंडी देणाऱ्या सुधारित कुक्कुट / देशी पक्षांचे वाटप :-

**लाभाचे स्वरुप:**

अंडी देणाऱ्या १६-१८आठवडे वयाच्या ५०० सुधारित / देशी कुक्कुट पक्षी, अर्धबंदिस्त / पिंजरा गादी पध्दतीचे शेड, खाद्य, पाणी भांडी, एग्ज ट्रे, एग नेस्ट इ. आवश्यक साहित्य.

**लाभार्थी प्रवर्ग:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांग बांधवांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता:**

कुक्कुट व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा २ वर्षाचा कुक्कुट व्यवसायाचा अनुभव असणे आवश्यक.

**गटाची किंमत:**

१) पक्षी किंमत - किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे ५०० पक्षी रु. ३५०/- प्रती पक्षी प्रमाणे

२) २ महिन्याच्या खाद्यावरील खर्च (७.२ कि.ग्रॅ. प्रती पक्षी x रु. २७/- प्रती कि.ग्रॅ. प्रमाणे)

३) अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने संगोपन (प्रती पक्षी रु. १००)

४) खाद्य, पाणी भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट इत्यादी आवश्यक साहित्य (प्रती पक्षी रु. २०/-)

एकूण किंमत रु. ३,३२,२००/-

**अनुदानाचे स्वरुप**

१. सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के

**आवश्यक कागदपत्रे**

२. अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के

१) पशुपालन कुक्कुट व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र) किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.

२) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे व १६ ते १८ आठवडे वयोगटातील असावेत.

### अटी व शर्ती

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे व १६ ते १८ आठवडे वयोगटातील असावेत.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट/ सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र / राष्ट्रीय पशुधन अभियान / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घेण्यात यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने कुक्कुट पालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या एक महिन्याच्या कालावधीत पक्षी, खाद्य / पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुटपालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुटपक्षी खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

८) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## ४) वैरण विकास योजना -

### अ) चार उत्पादन कार्यक्रम :-

**लाभाचे स्वरुप:** चारा बियाण्यांचा / ठोंबाचा पुरवठा

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील शेतकरी, शेतकरी समुह गट

**लाभार्थी निकष:**

१) वैयक्तिक शेतकऱ्यासाठी १ हे. वैरण उत्पादन घेण्यासाठी

२) वनहक्क धारक

३) नोंदणीकृत शेतकरी समुह गट

**पात्रता**

अ) वैयक्तिक शेतकरी -

१) स्वतःची जमीन व सिंचन सुविधा

२) स्वतःचे किमान ३ ते ४ पशुधन

आ) शेतकरी समुह गट

**अनुदानाचे स्वरुप**

१) वैयक्तिक लाभार्थी १०० टक्के अनुदान १ हेक्टरसाठी रु. ४०००/-

२) शेतकरी समुह गट ५ हेक्टर व रु. २००००/- च्या मर्यादेत

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) किमान ३ ते ४ पशुधन

४) नोंदणीकृत प्रमाणपत्र (शेतकरी समुह गट)

### अटी व शर्ती

१) सदर योजनेंतर्गत पुरविण्यात येणारे बियाणे / ठोंबांची खरेदी राष्ट्रीय बियाणे महामंडळ / राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी मेंढी विकास मंडळ यांच्याकडून करण्यात येईल.

२) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने पात्रतेसाठी विहीत केलेली आवश्यक ती कागदपत्रे तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांच्याकडे सादर करावीत.

३) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कागदपत्रांची पुर्तता न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) पात्र लाभार्थी संख्या विचारात घेवून जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन हे वैरण बियाणेंसाठी राष्ट्रीय बियाणे महामंडळ / राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे यांच्याकडे व ठोंब्यांसाठी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास मंडळ यांच्याकडे मागणी नोंदवतील.

५) या योजनेत बियाणे / ठोंबे खरेदीची पूर्ण रक्कम जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन हे परस्पर पुरवठादार संस्थेस अदा करतील.

## ब) हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा उत्पादन योजना :-

**लाभार्थी:** अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, वनहक्क धारक, महिला बचत गट

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक

ब) अल्प भूधारक

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान ५ मोठे पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असाव्यात.

**अनुदानाचे स्वरुप:**

प्रकल्प चालु झाल्यानंतर

१) सर्वसाधारण प्रवर्ग - ५०% अनुदान

२) अनुसूचित जाती/जमाती-७५ % अनुदान




अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधा.

**लाभाचे स्वरुप:** हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा उत्पादनासाठी आवश्यक असणारी खालील साधन सामुग्री अनुदान तत्वावर देणे

| अ.क्र. | तपशील | संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | रॅकफ्रेम | ५ | १००००/- |
| २ | प्लास्टिक ट्रे (२५) | २५ | ४५००/- |
| ३ | पाणी टँक + पाइपिंग | १ | ५०००/- |
| ४ | पंप व मिस्टिंग/सिंचन यंत्रणा | १ | ५५००/- |
| ५ | ग्रीनहाऊस / शेड नेट | १ | १००००/- |
| ६ | इतर (उपकरणे, साधने, स्टोरेज) | -- | ५०००/- |
| | | एकूण | ४००००/- |

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान ५ मोठे पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) निवड झाल्यास आवश्यक ते प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमीपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्यात हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा युनिटची उभारणी करावी.

२) कालमर्यादेत उभारणी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.




## क) मिनी टीएमआर (Total Mixed Ration) उपकरण खरेदीसाठी अनुदान :-

**लाभाचे स्वरुप:**

पशुपालकांना ३०० किलो प्रती बॅच क्षमता असलेल्या मिनी टीएमआर उपकरण खरेदीसाठी अनुदान

**लाभार्थी:**

सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. महिला लाभार्थी उपलब्ध न झाल्यास पुरुष प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान १० मोठे पशुधन / ५० शेळ्या किंवा मेंढ्या असाव्यात.

**उपकरणाची किंमत:** रु. ४,४०,०००/- प्रती मशीन

**अनुदानाचे स्वरुप:**

- सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के
- अनुसुचित जाती / जमाती प्रवर्गातील लाभार्थी: ७५%

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान १० मोठे पशुधन / ५० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र

२) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र



संकल्पित चित्र: केवळ उदाहरणास्तव

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच १ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने ३०० किलो प्रति बॅच क्षमता असलेल्या मिनी टीएमआर (Total Mixed Ration) उपकरण खरेदी करुन खाद्य उत्पादन युनिटची उभारणी करावी.

२) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत खाद्य उत्पादन युनिटची उभारणी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभदेण्यात येईल.

३) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खचर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.

# ड) पशुपालकांना कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान :-

**लाभाचे स्वरुप:** पशुपालकांना कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. महिला लाभार्थी उपलब्ध न झाल्यास पुरुष प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.




**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान २ दुधाळ जनावरे/१० शेळ्या/मेंढ्या

**उपकरणाची किंमत**

**रु. ३०,०००/- प्रती कडबा कुट्टी यंत्र खरेदीच्या मर्यादेत**

**अनुदानाचे स्वरुप**

**१) सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के**

**२) अनुसुचित जाती/जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के**

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान २ दुधाळ पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने कडबाकुट्टी यंत्र खरेदी करुन वापर सुरु करावा.

२) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कडबाकुट्टी यंत्र खरेदी करुन वापर सुरु न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) कडबाकुट्टी यंत्रांचा वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

❖ सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी / पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती / जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

## ५) पशुप्रजनन :-

### अ) गायी / म्हशी मध्ये भृण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे :-

**लाभाचे स्वरुप:**

शेतकऱ्यांना त्यांच्या गायी म्हशी / मध्ये भृण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**लाभार्थी निकष:**

सर्व प्रवर्गातील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

स्वतःची भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेली गाय / म्हैस असलेले पशुपालक, गोशाळा.

**एका भृण प्रत्यारोपणाची किंमत:**

रु. २४,०००/- (उच्च अनुवंशीक वंशावळीचे यशस्वी भृण प्रत्यारोपणद्वारे निश्चित गर्भधारणा करणेसाठी येणारा खर्च रु.८०००/- याप्रमाणे ३ प्रयत्नात यशस्विता गृहीत धरण्यात आली आहे)

**अनुदानाचे स्वरुप**

सर्व प्रवर्गासाठी १०० टक्के

(मात्र भृण प्रत्यारोपण करण्यासाठीचे विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक)

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतःच्या मालकीची गाय म्हैस / असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) गोसेवा आयोगाकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र (गोशाळेसाठी)

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) उच्च अनुवंशिक वंशावळीचे भृण प्रत्यारोपण करण्यास इच्छुक असल्याबाबतचे व त्याबाबतच्या सर्व अटी शर्तीचे पालन करण्यास तयार असल्याबाबतचे बंधपत्र.





**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

### गायी / म्हशी मध्ये भ्रूण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे :-

**कार्यपध्दती**

१) सदर योजनेचे अंमलबजावणी यंत्रणा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर राहील.

२) पशुपालकाने नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेमध्ये सदर सेवेबाबतची मागणी नोंदवावी.

३) भ्रूण प्रत्यारोपणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तपासण्या संबंधित स्थानिक शासकीय पशुवैद्यकीय संस्थामध्ये करण्यात याव्यात. यासाठी विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक राहील.

४) संबंधित स्थानिक शासकीय पशुवैद्यकीय संस्थाप्रमुख वरील तपासणी अहवालानुसार भ्रूण प्रत्यारोपणासाठी पात्र असणाऱ्या गायी / म्हशीची माहिती संबधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांना कळवेल.

५) संबधित जिल्हा उपायुक्त (प. दु.) यांनी १०० % अनुदान हिस्सा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांचेकडे जमा करावा.

६) तद्नंतर संबंधित कार्यक्षेत्रातील भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा यांनी संबंधित शेतकऱ्याच्या गाय / म्हशीस उच्च अनुवंशिक वंशावळीचे यशस्वी भ्रूण प्रत्यारोपणद्वारे निश्चित गर्भधारणा करण्यात येईल.

७) सदर योजनेंतर्गत एका पशुपालकास / गोशाळेस एका वर्षात कमाल ५ गाय / म्हशींच्या मर्यादेत योजनेचा लाभ घेता येईल.

## ब) १००% अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा (Sex Sorted Semen) पुरवठा करणे :-



## ब) १००% अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा (Sex Sorted Semen) पुरवठा करणे :-

**पात्रता:** स्वतःची भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेली गाय/म्हैस असलेले पशुपालक, गोशाळा.

**एका रेतमात्रेची किंमत:** प्रती रेतमात्रा किंमत रु. ५७५/- किंवा वेळोवेळी निर्धारित करण्यात येणारी किंमत

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी १०० टक्के (मात्र कृत्रिम रेतन करण्यासाठीचे विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक)

**आवश्यक कागदपत्रे:**

१) स्वतःच्या मालकीची गाय म्हैस / असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२)गोसेवा आयोगाकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र (गोशाळेसाठी)


३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) उच्च अनुवंशिक वंशावळीचे भृण प्रत्यारोपण करण्यास इच्छुक असल्याबाबतचे व त्याबाबतच्या सर्व अटी शर्तीचे पालन करण्यास तयार असल्याबाबतचे बंधपत्र.

**लाभाचे स्वरुप:** १०० % अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा पुरवठा करणे

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक



### कार्यपध्दती

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर हे सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

२) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र या कार्यालयाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व पशुवैद्यकीय संस्था यांच्याकडून गावनिहाय पैदासक्षम गायी-म्हशींची संख्या, जातनिहाय व महिनावार लिंग वर्गीकृत केलेल्या वीर्यमात्रांची (रेतमात्रांची) मागणी संकलित करावी व जिल्ह्याची एकूण मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे नोंदवावी.

३) संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्ह्यातील प्रजननक्षम गायी-म्हशींची संख्या तसेच, प्रतीवर्ष होणारी गायी-म्हशींमधील कृत्रिम रेतने याचा विचार करून रेतमात्रांच्या खरेदीसाठी आवश्यक निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

४) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी पुढील आर्थिक वर्षाकरीता जिल्ह्याची लिंग वर्गीकृत केलेल्या गोठित रेतमात्रांची मागणी संबंधीत विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांचेमार्फत सीईओ, एमएलडीबी यांच्याकडे दरवर्षी माहे फेब्रुवारीपर्यंत नोंदवावी.

५) संबंधित विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांनी सदरची मागणी तपासून ती योग्य असल्याची खातरजमा करावी.

६) सीईओ, एमएलडीबी, नागपूर हे विहीत कार्यपध्दती पार पाडून लिंग वर्गीकृत रेतमात्रा उपलब्ध करुन देतील.

७) पशुवैद्यकिय चिकित्सालये दरमहा संबंधित विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांच्यामार्फत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्राकडून आवश्यक लिंग वर्गीकृत गोठित रेतमात्रांचा पुरवठा नियमितपणे करण्यात यावा.

८) पशुपालकाने नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेमध्ये सदर सेवेबाबतची मागणी नोंदवावी.

९) पशुधन विकास अधिकारी यांनी गाय / म्हशीची जननेंद्रियांची तपासणी करुन गर्भधारणेस सक्षम गाय / म्हशींची निवड करावी.

१०) गर्भधारणा क्षमता तपासणी तसेच कृत्रिम रेतन सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक राहील.

११) या योजनेंतर्गत गायी-म्हशींमध्ये केलेल्या सर्व कृत्रिम रेतनाची नोंद राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM) भारत पशुधन या संगणकीय प्रणालीवर घ्यावयाची असून कृत्रिम रेतनानंतर २१ दिवसांनी गर्भधारणा तपासणी व कालवड / पारडी जन्माच्या नोंदी देखील या प्रणालीवर अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

१२) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी भारत पशुधन किंवा वेळोवेळी प्रचलित असलेल्या संगणकीय प्रणालीवर कृत्रिम रेतन व अनुषंगिक नोंदी घेतल्याची खातरजमा करुनच संबंधित संस्थेस पुढील रेतमात्रांचा पुरवठा करण्याबाबत दक्षता घ्यावी.

## ६) इतर योजना :-

### अ) सुधारित / देशी पारड्याची जोपासना अंतर्गत कालवडी / पारड्यांना पशु खाद्य पुरवठा (५०% अनुदान) योजना :-

**लाभाचे स्वरुप:**

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील भुमीहिन, अल्प भुधारक व अत्यल्प भुधारक पशुपालक

**पात्रता:**

१) कालवडी / पारडीच्या NDLM नोंदणी आवश्यक

२) ३ वर्षासाठी विमा उतरवणे आवश्यक

३) एका कुटुंबातील एक कालवड / पारडू

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी - ५०% अनुदान




| अ.क्र. | महिना | दैनिक खाद्य गरज | मासिक खाद्य पुरवठा |
|---|---|---|---|
| १ | ४ था महिना | १ कि.ग्रॅ. | ३० किग्रॅ. |
| २ | ५ वा महिना | १.५ कि. ग्रॅ. | ४५ किग्रॅ. |
| ३ | ६ वा महिना | १.७५ कि.ग्रॅ. | ५२.५ किग्रॅ. |
| ४ | ७ ते १८ महिने | २ कि.ग्रॅ. | ७२० किग्रॅ. |
| ५ | १९ ते ३२ महिने (कालवड) | २.५ कि.ग्रॅ | १०५० कि.ग्रॅ. |
| ६ | १९ ते ४० महिने (पारडी) | २.५ कि.ग्रॅ | १६५० कि.ग्रॅ. |

**कार्यपध्दती:**

१) लाभार्थ्याने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

२) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था प्रमुखाने लाभार्थ्याकडील कालवड / पारडीस एनडीएलएम प्रणालीवरील नोंदीनुसार वयाची खातरजमा करुन योजनेचा लाभ देण्यात यावा.

३) एका कुटुंबातील एक कालवड / पारडी पात्र असेल.

४) जिल्हा निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

५) निवड झालेल्या पशुपालकाने भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणकानुसार खाद्यामध्ये मॉइश्चरचे प्रमाण १० टक्के, क्रुड प्रोटीनचे प्रमाण २० टक्के, कुड फायबरचे प्रमाण १३ टक्के, कुड फॅटचे प्रमाण २.५ टक्के, ॲसिड इन्सोल्यूबल ॲश ४ टक्के, सॉल्टचे प्रमाण २ टक्के, कॅल्शियमचे प्रमाण ०.५ टक्के व फॉस्फरसचे प्रमाण ०.५ टक्के प्रमाण असलेले पशुखाद्य खरेदी करणे आवश्यक राहील.

६) योजनेत सहभागी असलेल्या कालवड / पारडी यांची कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी अनुदान वितरणापुर्वी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या पशुखाद्याचे ३ महिन्याचे देयक जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना सादर केल्यानंतर विहीत केलेले ५० टक्के अनुदान विचारात घेवून देय अनुदानाची अदायगी डिबीटीव्दारे लाभार्थ्याच्या बँक खात्यात करण्यात येईल.

८) कालवड / पारडीची योजना कालावधीत विक्री केल्यास सदर पशुपालकास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, याची नोंद लाभार्थ्याने घ्यावयाची आहे.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

## आ) नर पारडू (रेडकू) संगोपन व संवर्धन प्रोत्साहन योजना

**लाभाचे स्वरुप:** एका नर पारडू / रेडक्याच्या संगोपनासाठी रु. ६,०००/- चे अर्थसहाय्य (खाद्य, औषधे व देखभालीसाठी).

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**पात्रता:** ज्या पशुपालकाकडे NDLM वर स्वतःच्या नावावर नोंद असलेले पारडू / रेडकू असे शेतकरी (एका पशुपालकास कमाल १० पारडू / रेडकूच्या मर्यादेत)

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी एका नर पारडू / रेडक्याच्या संगोपनासाठी प्रती पशु रु.६,०००/- चे अर्थसहाय्य अनुदान २ टप्प्यात विभागून दिले जाईल.

**१ ला हप्ता ५०%:** पारडू/रेडक्याचे वय ६ महिने पूर्ण झाल्यावर

**२ रा हप्ता (५०%):** पारडू / रेडक्याचे वय १ वर्ष पूर्ण झाल्यावर

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या मालकीचे पारडू / रेडकू असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र

२) पारडू / रेडकू किमान एक वर्षापर्यंत सांभाळण्याबाबत पशुपालकाचे बंधपत्र.

**कार्यपध्दती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी.

२) योजनेत सहभागी असलेल्या पारडू / रेडकू यांचा तपशील कार्यक्षेत्रातील पशुवैद्यक अधिकाऱ्याने स्वतंत्रपणे ठेवावा.

३) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत लाभार्थ्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) योजनेत सहभागी असलेल्या पारडू / रेडकू यांची कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी अनुदान वितरणापुर्वी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

५) पारडू / रेडकू किमान एक वर्षापर्यंत सांभाळण्याबाबत पशुपालकाचे बंधपत्र घेण्यात यावे.

नर रेडकांचे योग्य आहार व आरोग्य व्यवस्थापन केल्यास, ते केवळ 'भार' न ठरता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे एक 'नफाक्षम जोडधंदा' म्हणून समोर येतील.




**नर रेडके संगोपन व्यवसाय नाही छोटा**
**मिळता अर्थसहाय्य नफा होईल मोठा!**




प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

## इ) पशुपालक/शेतकऱ्यांना देशी बैल जोडी खरेदी करिता अनुदान वाटप:

**लाभाचे स्वरुप:** बैल जोडी खरेदी नंतर
सर्वसाधारण प्रवर्ग - ५०% अनुदान (रु. ८४,०२७/-)
अनुसूचित जाती / जमाती-७५ % अनुदान (रु. १,२६,०४०/-)

**लाभार्थी:**
**सर्वसाधारण प्रवर्ग:** ५०% अनुदान (रु. ८४,०२७/-)
**अनुसूचित जाती / जमाती:** ७५ % अनुदान (रु. १,२६,०४०/-)
सर्व प्रवर्गातील अल्प / अत्यल्प भुधारक शेतकरी, वनहक्क धारक, नोंदणीकृत उसतोड कामगार

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.
अ) भुमीहीन
ब) अत्यल्प भूधारक
क) अल्प भूधारक
ड) वनहक्क धारक
इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**
१) स्वतःच्या नावावर ७/१२ उतारा अल्प / अत्यल्प भुधारक शेतकरी असल्याचा, मात्र वनहक्क धारकाना ही अट लागू राहणार नाही.
२) भुमीहीन असल्यास उसतोड महामंडळाकडे नोंदणी असलेला कामगार (वनहक्क धारक वगळून)

**देशी बैल जोडीची किंमत**
पशुपालक / शेतकऱ्यांना देशी बैल जोडी खरेदी करिता अनुदान
१) पशुधन खरेदी- रु. १,५०,०००-/
२) विमा १०.२०% (अधिक १८% GST)- रु. १८,०५६ -/ एकूण-रु. १,६८,०५६/-

**अनुदानाचे स्वरुप:**
१. सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के
२. अनुसुचित जाती/जमाती प्रवर्ग लाभार्थी -७५ टक्के अनुदान देय असेल.




**आवश्यक कागदपत्रे:**
१) स्वत:च्या नावावर ७/१२ उतारा असलेला अल्प/अत्यल्प भुधारक शेतकरी
२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,
३) उसतोड महामंडळाकडे नोंदणी असलेला उसतोड कामगार (फक्त भुमीहिन लाभार्थ्यांसाठी)
४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र
५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती:**
१) लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्यात गठीत समिती समवेत देशी बैल जोडीची खरेदी करावी.
२) एक महिन्याच्या कालावधीत संबंधित लाभार्थ्याने त्याच्या पसंतीनुसार बाजारातून (कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत) देशी बैल जोडीची खरेदी करणे बंधनकारक राहील. जर लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत देशी बैल जोडीची खरेदी न केल्यास अशा ...

(पुढील पृष्ठावर...)

लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) खरेदी केलेल्या देशी बैल जोडीची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांने अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

४) वाटप करण्यात येणाऱ्या देशी बैल जोडीचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

५) योजनेमध्ये वाटप केलेला बैल मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थ्यास दुसरा बैल खरेदी करुन पुरविण्यात यावा.

६) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

७) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

८) योजनेंतर्गत वाटप केलेल्या देशी बैलांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.



**७) प्रचार -प्रसिध्दी :-**

ग्रामीण भागातील शेतकरी/पशुपालकांना पशुसंवर्धनविषयी सर्वांगीण माहिती तसेच पशुसंवर्धनातून ग्रामीण उद्योजकता निर्माण करणे व उत्पन्नाचे शाश्वत साधन निर्माण करण्यासाठी व शास्त्रोक्त व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. सदर योजनेंतर्गत खालील बाबींचा समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे :

१) तालुका / जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन व पुरस्कार

२) दूध स्पर्धा

३) मेळावे / कार्यशाळा / परिसंवाद

४) वंध्यत्व निवारण शिबिरे

५) पशुपालकांना प्रोत्साहीत करण्यासाठी यशस्वी पशुपालकांच्या प्रक्षेत्रांना / नामांकित संस्थांना भेटी / सहलीचे आयोजन

६) दृकश्राव्य माध्यमांव्दारे पशुसंवर्धन विषयक प्रसिध्दी व प्रचार

७) देशी गोवंशाचे जतन व संवर्धन करण्याकरीता ब्रीडर असोशिएशनसाठी कार्यशाळा

**अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक व्हावे, यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या अहवालात पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस केली आहे. सदर बाब विचारात घेवून पशुसंवर्धन व्यवसायाच्या संदर्भात प्रस्तावित असलेल्या जिल्हा वार्षिक योजना व राज्यस्तरीय योजनांची अंमलबजावणीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी योजनांच्या लाभार्थ्यांची निवड ऑनलाईन पध्दतीने एकाच प्रणालीव्दारे करण्यात येईल. प्रस्तावित योजना राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येणार आहे.

**अ) लाभार्थी निकष** - वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवडीसाठी योजनानिहाय निकष संबधित योजनेत दर्शविण्यात आले आहेत. ज्या योजनांचा लाभ भुमीहीन लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे, अशा योजनांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**(ब) लाभार्थी निवड -**

१) सदर योजनांसाठी लाभार्थी निवडताना जिल्हानिहाय सर्वसाधारण / अनुसचित जाती / जमाती प्रवर्गाची लोकसंख्या विचारात घेवून लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

२) योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस वेळापत्रकाची आखणी करुन विहीत कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवावेत.

३) प्राप्त सर्व झालेल्या सर्व अर्जाची छाननी ऑनलाईन पध्दतीने करुन लाभार्थी निवड समितीमार्फत यादृच्छिक (Random) पध्दतीने पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

४) अनुदानाअभावी पात्र लाभार्थ्यांना त्या-त्या वर्षात योजनेचा लाभ देणे शक्य झाले नाही, असे लाभार्थी प्रतीक्षाधीन ठेवण्यात येतील.

५) संबंधित योजनांसाठी लाभार्थी निवडीसाठी दरवर्षी अर्ज मागविण्यात येतील. मात्र, मागील आर्थिक वर्षात प्रतीक्षाधीन असलेल्या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल.

६) संबंधित भागाचा समुह स्वरुपात (Cluster) विकास होईल याद्दष्टीने लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्या-त्या भागातील भौगोलीक स्थिती, जिल्हा नियोजन आराखडा व स्थानिक व्यावसायिक पर्यावरण विचारात घेवून लक्ष्यांक निर्धारित करावे.

**(क) निवड समिती**

वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ३. प्रकल्प अधिकारी, ए. आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी (जि.प.) | सदस्य |
| ५. जिल्हा उपायुक्त प. व दु. | सदस्य सचिव |

**(ड) खरेदी समिती**

दुधाळ पशुधन, बैल जोडी व शेळी / मेंढी गट वाटप योजनांतर्गत पशुवाटपासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीद्वारे खरेदी करण्यात येईल.

| | |
|---|---|
| १) संबंधित तालुक्याचे तालुका पशुसंवर्धन अधिकारी :- | अध्यक्ष |
| २) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखान्याचे संस्थाप्रमुख | -सदस्य |
| ३) बँक प्रतिनिधी (कर्जप्रकरणी) | सदस्य |
| ४) विमा कंपनीचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५) लाभार्थी | सदस्य |

**सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना :-**

१) एका कुटूंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ दिला जाईल.

२) शासनाच्या इतर विभागाकडील समान योजनेचा लाभ घेतला असल्यास, सदर कुटुंबास या योजनेचा लाभ देय राहणार नाही. यासाठी इतर विभागांकडील याच प्रकारच्या योजनेचा लाभ मागील ३ वर्षात इतर शासकीय संस्था / विकास मंडळाकडून घेतला नसलेबाबत स्वयंघोषणापत्र अर्जदाराला सादर करावे लागेल.

३) योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान हे त्यांच्या बँक खात्यात पशुधनाची खरेदी / प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर थेट जमा (DBT) करण्यात येईल.

४) सदर योजना मुंबई व मुंबई उपनगर वगळून इतर जिल्ह्यांसाठी लागू राहील.

५) संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) हे या योजनांचे अमंलबजावणी अधिकारी असतील व ते या योजनांसाठी आहरण व संवितरण अधिकारी राहतील. विभागीय स्तरावर संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

६) योजनांतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांची जिल्हा व योजनानिहाय निवड यादी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय, पुणे हे संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

७) संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देतील.

८) योजनांतर्गत लाभार्थ्यांची निवड झाल्याबाबत संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सर्व संबंधित लाभार्थ्यांस लेखी कळवतील.

९) योजनांतर्गत निवड झालेल्या संबंधित लाभार्थी यांचेकडून योजनेचे अंमलबजावणीसाठी विहीत प्रपत्रात बंधपत्रे / योजनानिहाय आवश्यक ती कागदपत्रे तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी प्राप्त करुन घेतील. लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे सर्वसमावेशक प्रारुप आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करुन ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात येईल.

१०) लाभार्थ्यांनी शासकीय अनुदानाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास लाभार्थ्यांकडून अनुदानाची रक्कम व्याजासह महसूली कार्यपध्दतीने वसूल करण्यात येईल. असे लाभार्थी /कुटूंब शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत लाभ देण्यास पुढील पाच वर्षासाठी अपात्र राहील, यासाठी त्यांच्या स्वतंत्र नोंदी ठेवण्यात येतील व तसे संबंधित ग्रामपंचायत, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना कळविण्यात येईल.

११) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत तसेच, आदिवासी क्षेत्र उपयोजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी अनुक्रमे केवळ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीच खर्ची करण्यात येईल.

१२) योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या दुधाळ जनावरे, शेळी-मेंढी व कुक्कुट पक्षीगटांची तसेच प्रकल्पांची पडताळणी पुढील आर्थिक वर्षात नजीकच्या जिल्ह्यातील अधिकारी यांच्यामार्फत Cross verification करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे.

१३) संबंधित आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी २ टक्के निधी प्रशासकीय खर्चासाठी खर्च करण्यात यावा.

**योजनेचे मुल्यमापन:**

दर ३ वर्षांनी बार्टी, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन केंद्र यासारख्या शासन मान्यताप्राप्त त्रयस्थ संस्थामार्फत मूल्यमापन करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या निधीतून करण्यात येईल.



योजनांच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधा.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




# मा. डॉ. किरण पाटील यांनी स्वीकारला पशुसंवर्धन आयुक्तपदाचा कार्यभार

**पुणे:** पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तपदाचा भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) २०१५ च्या बॅचचे अधिकारी मा. डॉ. किरण पाटील यांनी दि.०७ एप्रिल २०२६ रोजी पदभार स्वीकारला. राज्याच्या कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुसंवर्धन विभागाचे असलेले महत्त्व ओळखून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोडीने पशुपालकांपर्यंत शासकीय योजना पोहोचवण्याला व ग्रामीण भागात पशुसंवर्धनविषयक व्यवसायांच्या माध्यमातून अधिकाधीक उद्योजक घडविण्याला प्राधान्य असेल, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. पाटील यांचा प्रशासकीय अनुभव दांडगा असून, यापूर्वी त्यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. बुलढाणा जिल्हाधिकारी म्हणूनही त्यांची कारकिर्द संस्मरणीय राहिली आहे. डॉ. पाटील यांनी मुख्य सचिवांचे उपसचिव म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा पशुसंवर्धन क्षेत्राला गती देण्यासाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. पाटील यांनी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. रोगनियंत्रण, 'नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन' अंतर्गत पशुधनाची नोंदणी व सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देणे, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना तसेच इतर कल्याणकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या पशुपालकापर्यंत पोहोचवणे आदी मुद्द्यांवर आगामी काळात विशेष भर दिला जाणार असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

विभागाच्या वतीने मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी डॉ. किरण पाटील यांचे स्वागत केले व तांत्रिक कामकाजाविषयी माहिती दिली. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे यांनी विभागाच्या प्रशासकीय रचनेबाबत मा. आयुक्त महोदयांना अवगत केले. यावेळी सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व नियोजन) डॉ. देवेंद्र जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन (आयव्हीबीपी) डॉ. याहयाखान पठाण, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (पुणे विभाग) डॉ. समीर बोरकर, सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुआहार) डॉ. सुनील पसरटे, सांख्यिकी सहसंचालक श्रीमती सुषमा जाधव, उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत भड आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाकडून 'जीवामृत'ची निर्मिती



**मुंबई:** महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाने (MLDB) शाश्वत शेती व पशुपालनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मंडळाच्या वतीने आता उच्च दर्जाच्या 'जीवामृत'ची निर्मिती करण्यात येत असून, नुकतेच या उत्पादनाचे सादरीकरण मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्यासमोर करण्यात आले. मुंबई, मंत्रालय येथे अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तथा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांनी उत्पादित जीवामृत व त्यातील घटकांची माहिती सचिव महोदयांना दिली. "माननीय सचिव महोदयांच्या मार्गदर्शनामुळेच मंडळामध्ये जीवामृत निर्मितीचा हा प्रकल्प यशस्वीरीत्या सुरू झाला आहे," अशी भावना डॉ. मुकणे यांनी यावेळी व्यक्त केली.

डॉ. मुकणे यांनी याप्रसंगी सांगितले की, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या महाराष्ट्रातील विविध प्रक्षेत्रांवर पशुधनाचे शेण व गोमूत्र यांचा प्रभावी वापर करून हे नैसर्गिक खत तयार करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुणे येथील शासकीय पशुपैदास केंद्र, ताथवडे येथील प्रक्षेत्रावर जीवामृत निर्मिती प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आला आहे. या जीवामृतामुळे शेतीमधील उपयुक्त जीवाणूंची संख्या वाढण्यास मदत होऊन जमिनीचा पोत सुधारणार आहे. रासायनिक खतांना हे जीवामृत एक प्रभावी पर्याय ठरत असल्याने शेतकरी वर्गाकडून या उत्पादनाला भविष्यात मागणी वाढणार आहे. या माध्यमातून शासनाला महसुली उत्पन्नही मिळणार आहे. सचिव महोदयांनी या उपक्रमाचे कौतुक करत, हे जीवामृत जास्तीत जास्त शेतकरी व पशुपालकांपर्यंत पोहोचवण्याच्या सूचना दिल्या. या प्रकल्पामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल आणि 'सेंद्रीय शेती'च्या मोहिमेला बळ मिळेल, असा विश्वास आहे.

> मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ नवनवीन प्रयोग राबवत आहे. जीवामृत निर्मिती हा त्याचाच एक भाग असून, यामुळे पर्यावरणाचे रक्षण आणि पशुपालकांचा आर्थिक विकास दोन्ही साध्य होतील.
>
> डॉ. शितलकुमार मुकणे
> अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, तथा
> मुख्य कार्यकारी अधिकारी
> महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ,
> नागपूर




केंद्रीय पशुसंवर्धन विभागाचे अवर सचिव डॉ.विनोद कुमार व केंद्रीय पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अधिराज मिश्रा यांनी महाराष्ट्रातील नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांना भेटी देऊन लाळखुरकुत रोगप्रतिबंधक लसीकरणाच्या आठव्या फेरीनिमित्त केलेल्या कामकाजाची पाहणी व रोग निर्मूलनासाठी केलेल्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. दिनांक २६ मार्च २०२६ रोजी मा. आयुक्त पशुसंवर्धन यांच्यासोबत पथकातील अधिकाऱ्यांनी पाहणीतील निरीक्षणाबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी महाराष्ट्र राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना, योजनांचे एकत्रीकरण, एम्ब्रिओ ट्रान्सफर टेक्नॉलॉजी, गोसेवा आयोग, नॅशनल लाइव्हस्टॉक मिशन, बोव्हाईन ब्रीडिंग ॲक्ट, लस उत्पादन, रोग अन्वेषण व लसीकरण कामकाजाबाबत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती सादर करुन पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य सर्वच आघाड्यांवर प्रगतीशील असल्याची बाब केंद्रीय पथकाच्या निदर्शनास आणून दिली.



केंद्र शासन व पशु रोग अन्वेषण विभाग (पुणे) येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने नुकताच नाशिक जिल्ह्याचा दौरा करून लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण फेरी ८ च्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यातील लसीकरण प्रक्रियेची गती व लस साठवणुकीसाठी असलेल्या 'कोल्ड चेन' (शीत साखळी) व्यवस्थेबाबत पथकाने समाधान व्यक्त केले. 'नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन' (NDLM) पोर्टलवर काम करताना क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन पथकाने दिले.

# यवतमाळ महोत्सवात जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचा थाट; पशुपालकांचा उस्फूर्त प्रतिसाद



## आठ गटांतून २७५ पशु-पक्ष्यांचा सहभाग, एकूण बारा लाख रुपयांची रोख बक्षीसे

यवतमाळ महोत्सवाचे औचित्य साधून जिल्हा परिषद यवतमाळ व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित सन २०२५-२६ साठीच्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचा समारोप उत्साहात पार पडला. २७ व २८ मार्च रोजी आयोजित या प्रदर्शनात जिल्ह्यातील १६ तालुक्यातील पशुपालकांनी आपल्या उत्कृष्ट पशुधनासह लक्षणीय सहभाग नोंदवला. प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री मा. संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री मा. अशोक उईके, जिल्हाधिकारी मा. श्री. विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार पत्की, आणि जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. मंगेश काळे यांच्या हस्ते करण्यात आले.



### आठ गटांतून २७५ पशु-पक्ष्यांचा सहभाग

| | |
|---|---|
| संकरित वासरे (नर गट) | म्हैस वर्ग |
| संकरित वासरे (मादी गट) | बैल जोडी |
| संकरित गाय वर्ग | शेळी वर्ग |
| देशी व गावठी गाय वर्ग | कुक्कुट (पक्षी) वर्ग |



प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय, तृतीय व तीन उत्तेजनार्थ तसेच प्रदर्शनामध्ये सहभागी सर्व पशुपक्ष्यांना प्रोत्साहनपर, अशी एकूण १२ लाख रुपयांची रोख बक्षीसे, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शॉल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी विकास मीना होते. यावेळी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. येसूदेव वंजारी व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. मंगेश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीसोबत पशुपालन करणे काळाची गरज आहे. पशुसंवर्धनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होते. पशुसंवर्धन विभाग यासाठी सदैव तत्पर असून, भविष्यात यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर प्रदर्शने आयोजित करण्याचा आमचा मानस आहे, असे प्रतिपादन मान्यवरांनी आपल्या भाषणात केले.

# राज्यात लवकरच देशी गोवंश डेअरीची स्थापना होणार: मा. शेखर मुंदडा

## पुणे येथे आयोजित गौ टेक ग्लोबल समिट व एक्स्पो उत्साहात संपन्न




**पुणे:** देशी गोवंश संवर्धनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोग इतर राज्यांच्या तुलनेत भरीव कामगिरी केली आहे. प्रती देशी गाय ५० रुपये परिपोषण अनुदान व प्रत्येक तालुक्यात एका गोशाळेला २५ लाख रुपयापर्यंत शेड निवारा अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यादरम्यान, देशी गोवंशाच्या दुधाची स्वतंत्र डेअरी स्थापन करण्याची संकल्पना समोर आली. त्यानुसार लवकरच अंमलबजावणी करण्यासाठी गोसेवा आयोग प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा यांनी केले.

आंतरराष्ट्रीय संस्था ग्लोबल कॉन्फेडरेशन ऑफ काऊ बेस्ड इंडस्ट्रीज (जीसीसीआय) यांच्या वतीने, महाराष्ट्र गो सेवा आयोग आणि आर. आर. काबेल यांच्या सहकार्याने "गौ-टेक २०२६" या आंतरराष्ट्रीय शिखर परिषद व प्रदर्शनाचे आयोजन कृषी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर, पुणे येथे करण्यात आले होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, गुजरातचे माजी मंत्री भूपेंद्र सिंह चूड़ासमा, उत्तराखंड गोसेवा आयोग अध्यक्ष राजेंद्र अथवाल, जैन आचार्य लोकेश मुनी, आमदार हेमंत रासने, पुणे भाजपा अध्यक्ष धीरज घाटे, गोवा-महाराष्ट्र पोस्ट मास्टर जनरल प्रमुख अमिताभ सिंग, राज देशमुख, राघवन तसेच उद्योजक कृष्णकुमार गोयल, दिलीप काळे, जीसीसीआयचे संस्थापक, माजी केंद्रीयमंत्री तसेच राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष व गौ-टेक २०२६ चे आयोजनाध्यक्ष शेखर मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. राज्यभरातील पशुपालक, शेतकरी व गोप्रेमी नागरिकांचा या प्रदर्शनाला प्रतिसाद लाभला. प्रदर्शनातून उत्तम माहिती प्राप्त झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली तसेच अशा स्वरुपाचे आयोजन प्रत्येक जिल्ह्यात करण्याची अपेक्षा अभ्यागतांनी व्यक्त केली.

### देशी गोवंशाच्या दुधाला विक्रमी दर

श्री. मुंदडा पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात शासकीय तसेच सहकारी डेअरीमार्फत गायीच्या दुधाला ३२ रुपये ५० पैसे प्रती लिटर दर दिला जातो. हा दर देशी गोवंशाच्या दुधाचा नसून, होस्टन फ्रिजीएन, जर्सी अशा विदेशी गोवंशाच्या दुधाचा आहे. देशी गोवंशाच्या दुधाला पुणे-मुंबईसारख्या शहरामध्ये १२० ते १५० रुपयांपर्यंत दर मिळत आहे. याशिवाय, बाजारातून देशी गोवंशाच्या दुधाची मागणी वाढत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र राज्यात देशी गोवंश दूध संकलन व वितरण करणारी संस्था स्थापित करुन देशी गोवंश संवर्धनाच्या चळवळीला ऊर्जितावस्था प्राप्त करुन देण्याचा गोसेवा आयोगाचा आहे.

" तब्बल ३ लाख अभ्यागत, २०० पेक्षा अधिक स्टॉल्स व विविध उपक्रम या एक्स्पोमध्ये आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये सेंद्रीय खत व बायो-फर्टिलायझर्स, दूध व मूल्यवर्धित दुग्ध उत्पादने, गौमूत्र व गोबरावर आधारित उत्पादने, नैसर्गिक शेती, पशुवैद्यकीय महाविद्यालये व विद्यापीठे, सीमेन प्रयोगशाळा, सेक्स-सॉर्टेड सीमेन व एम्ब्रियो ट्रान्सफर तंत्रज्ञान, सौर व बायो-एनर्जी, चारा व बियाणे उद्योग, चारागाह विकास यंत्रसामग्री, शासकीय व खासगी बँका, सहकारी संस्था, दुग्ध संघ व फेडरेशन, विविध राज्यांचे गोसेवा आयोग, ॲनिमल फूड प्रोसेसिंग युनिट्स, इनोव्हेटिव्ह स्टार्ट-अप्स, संशोधन व विकासावर आधारित गौ-उत्पादने, भारतीय देशी गाईंच्या जातीचे लाईव्ह प्रदर्शन तसेच नॅचरोपथी, आयुर्वेद व पंचगव्य आधारित उपचार पद्धतींशी संबंधित स्टॉल्स सहभागी झाले होते. "

**श्री. शेखर मुंदडा**, अध्यक्ष: महाराष्ट्र गोसेवा आयोग ( राज्यमंत्री दर्जा)




डॉ. वल्लभभाई कथिरिया म्हणाले, गौ-आधारित उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, नवोन्मेष आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या आयोजनामागील उद्देश आहे. हे केवळ एक प्रदर्शन नसून गौ-आधारित अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून भारताला आत्मनिर्भर व संस्कारित बनविण्याच्या दिशेने एक व्यापक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अभियान आहे.

डॉ. वल्लभभाई कथिरिया यांच्या मार्गदर्शनाखाली या आयोजनात शेखर मुंदडा, रमेश घेटीया, हंसराज गजेरा, अमिताभ भटनागर (जनरल सेक्रेटरी, जीसीसीआय), पुरीश कुमार (जनरल सेक्रेटरी, जीसीसीआय), डॉ. गिरीश शाह, डॉ. नितीन मार्कंडेय, संजय भोसले, उद्धव नेरकर, डॉ. सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, मनीष वर्मा, परेश शाह तसेच इतर अनेकांसह डॉ. दिलीप कुलकर्णी, मंगल अकोले, डॉ. महेश लोहार, विनायक बोरोळे पाटील, कौस्तुभ देशपांडे, मल्हार चनियारा, रमेश ओसवाल, भाग्यश्री चौंडे, अश्विनी पाटील, डॉ. देशमुख, राजेंद्र चौहान, दिलीप काळे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. राज्यभरातून लाखो पशुपालकांनी या प्रदर्शनास भेट दिली.

# रायगड: उरणमध्ये पशुपालकांसाठी भव्य प्रशिक्षण व कृती सत्र शिबिर संपन्न



## मातवली येथे 'महा एनजीओ फेडरेशन' व 'गो-सेवा आयोगा'चा स्तुत्य उपक्रम; पशुपालकांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**उरण (रायगड):** पशुपालन व्यवसायाला आधुनिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने मातवली (ता. उरण, जि. रायगड) येथे आज एकदिवसीय पशुपालक प्रशिक्षण शिबिर व कृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. महा-एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र गो-सेवा आयोग, अदानी व्हेंचर लिमिटेड आणि पशुसंवर्धन विभाग (जिल्हा परिषद, रायगड) यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिरात तालुक्यातील शेकडो पशुपालकांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. शेखर मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावर उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. महेश बालदी, पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.पहिल्या सत्रात महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अशासकीय सदस्य डॉ. नितीन मार्कंडेय यांनी पशुपालकांना तांत्रिक विषयांवर मार्गदर्शन केले. जनावरांची निगा, योग्य पैदास व आधुनिक गो-पालन करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर त्यांनी प्रकाश टाकला.

पशुपालनाला कृषी दर्जा व नवीन योजना मुंबई विभागाचे सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे यांनी पशुपालन व्यवसायाला 'कृषी' दर्जा मिळाल्यामुळे होणारे फायदे विशद केले. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या नवीन योजनांची माहिती देतानाच, त्यांनी रायगड जिल्ह्यातील लाळ्याखुरकुत व पीपीआर लसीकरण मोहिमेचा सविस्तर आढावा घेतला. या लसीकरणाचे महत्त्व पटवून देत त्यांनी पशुपालकांना शंभर टक्के लसीकरण करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अदानी व्हेंचर लिमिटेड व महा-एनजीओ फेडरेशनने घेतलेल्या या पुढाकाराचे आमदार महेश बालदी यांनी कौतुक केले.





# चंद्रपूर जिल्हास्तरीय कृषी, पशु-पक्षी प्रदर्शनी २०२६

## पशुपालकांसाठी आधुनिक पशुपालनाचा मार्गदर्शक उपक्रम




**चंद्रपुर**: पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या वतीने दि. २० ते २२ मार्च २०२६ दरम्यान चांदा क्लब, चंद्रपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी, पशु-पक्षी प्रदर्शनी २०२६ उत्साहात संपन्न झाली. या प्रदर्शनीचे उद्घाटन मा. डॉ. श्री. अशोक उईके (मंत्री, आदिवासी विकास व पालकमंत्री, चंद्रपूर) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास सौ. संगीता खांडेकर (महापौर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (खासदार), श्री. किशोर जोरगेवार व श्री. देवरावजी भोंगळे (आमदार), डॉ. नितीन व्यवहारे (अतिरिक्त जिल्हाधिकारी), श्री. पुलकित सिंग (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. चंद्रपूर), मा. कल्पना क्षीरसागर (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी) तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.



**प्रदर्शनीची ठळक वैशिष्ट्ये**

- ❑ २३ गटांमध्ये सहभाग
- ❑ ३८ प्रगत पशुपालकांचा सहभाग
- ❑ ९७ जातिवंत पशुं-पक्षांचे प्रदर्शन
- ❑ विविध राज्यांतील उच्च प्रतीच्या जातींचा समावेश
- ❑ जातिवंत पशुधन मेळावा मार्गदर्शन व तंत्रज्ञान प्रदर्शन

**पशुविषयक मार्गदर्शन सत्र**

प्रदर्शनी दरम्यान आयोजित मार्गदर्शन सत्रात,

- ✓ १४८ पशुसखींचा सहभाग
- ✓ २५४ पशुपालक उपस्थित
- ✓ विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग

या सत्रात पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

- ✓ विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प माहिती व मार्गदर्शन.
- ✓ वैरण विकास व चारा व्यवस्थापन
- ✓ स्वच्छ दूध उत्पादन व दूध व्यवस्थापन
- ✓ कुक्कुटपालनाचे आधुनिक तंत्रज्ञान
- ✓ शास्त्रोक्त शेळीपालन (स्वयंरोजगारासाठी)
- ✓ पशुसंवर्धन विभागाच्या विविध शासकीय योजना
- ✓ रोगनिदान व नियंत्रण


**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य








**प्रदर्शनीला प्रतिसाद**

तीन दिवसीय प्रदर्शनी दरम्यान एकूण १४७५ अभ्यागतांनी पशुसंवर्धन विभागाच्या दालनाला भेट दिली. या उपक्रमातून अनेक पशुपालकांनी नवीन चेतना, व्यावसायिक दृष्टिकोन व प्रेरणा घेऊन आपल्या व्यवसायात प्रगती साधण्याचा निर्धार व्यक्त केला.

**समारोप व सत्कार**

दि. २२ मार्च २०२६ रोजी आयोजित समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. पुलकित सिंग (भा.प्र.से.) यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व सहभागी प्रगत पशुपालकांचा शाल, श्रीफळ, रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव रण्यात आला.

**उपक्रमाचे महत्त्व**

- ✅ पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाली.
- ✅ उत्पन्नवाढीच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या.
- ✅ पशुपालनात व्यावसायिक दृष्टिकोन विकसित झाला.
- ✅ जिल्ह्यातील पशुसंवर्धन क्षेत्राला नवी चालना मिळाली.

जिल्हास्तरीय कृषी, पशु-पक्षी प्रदर्शनी २०२६ हा उपक्रम पशुपालकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरून,“पशुधन वाढ – शेतकऱ्यांची समृद्धी” या संकल्पनेला बळ देणारा व आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखवणारा प्रभावी उपक्रम ठरला.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




# 'वन हेल्थ' राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाचे सादरीकरण

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वन हेल्थ (NIOH), नागपूर व आयसीएमआर-आरएमआरसी (ICMR-RMRC), भुवनेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "वन हेल्थसाठी कार्यात्मक आराखडा: राष्ट्रीय दृष्टीकोन आणि राज्यस्तरीय कृती" या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपुर विभाग डॉ. सतीश राजू सहभागी झाले होते. याप्रसंगी डॉ. राजू यांनी "पशुसंवर्धन क्षेत्रातील संस्थात्मक क्षमतेचा 'वन हेल्थ' आराखड्यात समावेश" या विषयावर सादरीकरण केले.

या सादरीकरणात डॉ. राजू यांनी राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचा दृष्टीकोन मांडताना राज्यात उपलब्ध असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या सक्षम पायाभूत सुविधांची माहिती दिली. मानवी व प्राणी आरोग्य यांच्या सीमारेषेवर (Human-Animal Interface) रोगांचे सर्वेक्षण, त्वरित निदान व समन्वित प्रतिसादामध्ये क्षेत्रीय पशुवैद्यकांची भूमिका किती प्रासंगिक आणि महत्वपूर्ण आहे, हे अधोरेखित केले. तसेच पशुधनाशी संबंधित माहिती व सर्वेक्षण यंत्रणेला राष्ट्रीय डिजिटल आर्किटेक्चरशी जोडण्याची गरज व्यक्त केली. याशिवाय, "महाराष्ट्रात वन हेल्थची अंमलबजावणी: धोरण, सराव आणि सज्जता" या विषयावरील पॅनेल चर्चेतही डॉ. राजू यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**तज्ज्ञांचा सहभाग:** या कार्यशाळेत देशातील अनेक नामवंत तज्ज्ञांनी सहभाग नोंदवला, ज्यात प्रामुख्याने डॉ. प्रवीण मलिक (माजी आयुक्त, भारत सरकार), डॉ. दीपक म्हैसेकर, IAS (अध्यक्ष, राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण), डॉ. हिमांशू चौहान (प्रमुख, IDSP आणि सहसंचालक, NCDC), डॉ. राकेश मिश्रा (संचालक, TIGS), डॉ. नितीन पाटील (कुलगुरु, माफसू), डॉ. मनोज मुरहेकर (संचालक, ICMR-NIE, चेन्नई), डॉ. रंजन दास (संचालक, NCDC) व ब्रिगेडिअर एम. एम. रामचंद्र (सेवानिवृत्त) (संचालक, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय, भारत सरकार) यांचा समावेश होता.



**डॉ. सतीश राजू**
प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर

"'वन हेल्थ' क्षेत्रातील अनेक मान्यवर शास्त्रज्ञांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. रोगांचा प्रादुर्भाव व जागतिक महामारीच्या सज्जतेवर झालेले सविस्तर मंथन अत्यंत माहितीपूर्ण होते. याद्वारे विविध क्षेत्रांमधील समन्वय व वर्तमानावर आधारित धोरणात्मक कृतीची आवश्यकता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. एकूणच हा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा आणि व्यावसायिकदृष्ट्या फलदायी ठरला."




पशुसंवर्धन विभागाचे मा. आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांची जिल्हाधिकारी, बुलढाणा या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांना पशुसंवर्धन विभागाच्या वतीने निरोप देण्यात आला. याप्रसंगी मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, डॉ. शितलकुमार मुकणे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व आभार मानले. डॉ. देवरे यांनी आपल्या कार्यकाळात विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी व पशुपालकांच्या हितासाठी अनेक महत्वपूर्ण व दूरगामी निर्णय घेतले. त्यांच्या कल्पक नेतृत्वामुळे विभागाच्या कामात मोठी गती आली. त्यांच्या या गौरवशाली प्रवासाचा सन्मान करत, पुढील वाटचालीसाठी त्यांना पशुसंवर्धन विभागाच्या समस्त अधिकारी व कर्मचारी वृंदाकडून शुभेच्छा देण्यात आल्या.



# नाशिकमध्ये 'शास्त्रीय शेळी व कुक्कुटपालन' प्रशिक्षण; शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद सोहळा उत्साहात संपन्न




महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ व भाकृअप-राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैदराबाद यांचे संयुक्त विद्यमाने अनुसूचित जमाती उपघटक योजनेअंतर्गत नाशिक येथे 'एकदिवसीय शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद' व 'शास्त्रीय शेळी व कुक्कुटपालन' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणास नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर व सुरगाणा तालुक्यातील सुमारे २८० शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सचिन बोंडे (संचालक, विस्तार शिक्षण, माफसू, नागपूर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. विकास वासकर (सहयोगी अधिष्ठाता, क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ), डॉ. बाबुराव नरवाडे (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नाशिक विभाग), डॉ. मिलिंद भणगे (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, प्रादेशिक रोग अन्वेषण प्रयोगशाळा, नाशिक) आणि डॉ. संतोष शिंदे (सहाय्यक आयुक्त, लघुपशुसर्वचिकित्तालय, बोदवड) यांची प्रमुख उपस्थिती होती. शेळीपालन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, ते अधिक फायदेशीर करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक मार्केटिंग तंत्रांचा वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉक्टर सचिन बोंडे यांनी केले. विशेषतः दुर्गम भागातील लोकांसाठी हे साधन अत्यंत उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. विकास वासकर यांनी दुर्गम भागातील महिला सक्षमीकरणासाठी शेळी व कुक्कुटपालन हे उत्तम पर्याय असल्याचे सांगितले. तसेच डॉ. नरवाडे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना व त्याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे सांगून पशुसंवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. 'अनुसूचित जमाती उप-घटक' योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

प्रशिक्षण सत्रात शिरवळ महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापक डॉ. अजय खानविलकर, डॉ. विजयसिंह लोणकर, डॉ. राहुल कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे यांनी उपस्थितांना तांत्रिक मार्गदर्शन केले. यामध्ये शेळ्यांचे आरोग्य व्यवस्थापन, कुक्कुटपालनातील आधुनिक तंत्रज्ञान आणि आहार व्यवस्थापन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन प्रकल्प समन्वयक डॉ. साईनाथ भोकरे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. संतोष शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले.



# अहिल्यानगरमध्ये देशी गोवंश संवर्धनासाठी मोठे पाऊल;
## भ्रूण प्रत्यारोपण (ET) प्रयोगात ६३ टक्के यश




**अहिल्यानगर / पुणे:** देशी गोवंशाचे संरक्षण आणि त्यांच्या अनुवांशिक सुधारणेसाठी राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने एक मोठे यश संपादन केले आहे. अहिल्यानगर येथील पांजरपोळ गोरक्षण संस्थेत राबविण्यात आलेल्या पहिल्याच 'भ्रूण प्रत्यारोपण' (Embryo Transfer - ET) चाचणीचे निकाल अत्यंत गुणवत्तापूर्ण लागले असून, यामध्ये तब्बल ६३ टक्के यश मिळाले आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भ्रूण प्रत्यारोपण व आयव्हीएफ (ET-IVF) प्रयोगशाळा, ताथवडे (पुणे) यांच्या वतीने राबविण्यात आला. या मोहिमेला पशुसंवर्धन विभागाचे सचिव मा. डॉ. एन. रामास्वामी, पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे (MLDB) मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. शितलकुमार मुकणे आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या यशामुळे गोशाळा व शेतकऱ्यांकडील अनुवांशिकरीत्या कमी उत्पादक असलेल्या (ND Cattle) गाईंमध्ये सुधारणा करून उच्च दर्जाच्या देशी गोवंशाची निर्मिती करणे आता अधिक सोपे होणार आहे. देशी गाईंच्या संवर्धनासाठी हे तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास 'टीम ET-IVF' चे डॉ. विष्णू जवणे व डॉ. नवटाके यांनी व्यक्त केला आहे.

**प्रयोगाचा तपशील व यश:**

- **प्रक्रियेची तारीख:** २६ डिसेंबर २०२५ रोजी भ्रूण प्रत्यारोपणाची प्रक्रिया पार पडली होती.
- **गर्भधारणा तपासणी:** २५ मार्च २०२६ रोजी करण्यात आलेल्या तपासणीत १२ गाई गाभण असल्याचे स्पष्ट झाले.
- **आकडेवारी:** एकूण १९ भ्रूण प्रत्यारोपित करण्यात आले होते, त्यापैकी १२ यशस्वी झाले आहेत.
- **यशाचे प्रमाण:** ६३% इतके उच्च यश या प्रयोगातून मिळाले आहे.



# सातारा येथील एनएलएम प्रकल्पास पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. समीर बोरकर यांची भेट

पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. समीर बोरकर यांनी दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील येळेवाडी येथील नॅशनल लाइव्हस्टॉक मिशन 'Milestone-२' अंतर्गत भेट देऊन सविस्तर तपासणी केली.

तपासणी दरम्यान पथकाने लाभार्थी श्री. बाबासाहेब बाळासाहेब विरकर (रा. मु. येळेवाडी, पो. बिजवडी, ता. माण) यांच्या मेंढीपालन प्रकल्पाची वस्तुस्थिती जाणून घेतली. सदर प्रकल्पात ५०० मेंढ्या व २५ नर (बोकड) अशा एकूण ५२५ पशुधनाचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी प्रामुख्याने 'डेक्कनी' जातीच्या मेंढ्यांची निवड करण्यात आली आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च ९१ लाख १० हजार रुपये इतका असून, यामध्ये ३६ लाख ४४ हजार रुपयांचे बँक कर्ज, ११ लाख १ हजार रुपयांचा स्वहिस्सा आणि ४३ लाख ६५ हजार रुपयांच्या मंजूर अनुदानाचा समावेश आहे.

प्रकल्पाच्या तांत्रिक प्रगतीचा आढावा घेतला असता, बँक कर्जाची मंजुरी २६ मे २०२३ रोजी झाली असून, त्यानंतर SLEC आणि CEC च्या मंजुऱ्या अनुक्रमे ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२३ मध्ये प्राप्त झाल्या आहेत. सद्यस्थितीत प्रकल्पाचे सर्व बांधकाम पूर्ण झाले असून मेंढ्यांची खरेदी देखील पूर्ण झाली आहे. प्रकल्पाचा 'Milestone-१' २७ मे २०२४ रोजी पूर्ण झाला असून, त्यापोटी २१ लाख ८२ हजार ५०० रुपयांचा अनुदानाचा पहिला हप्ता ६ जून २०२४ रोजी लाभार्थ्याला प्राप्त झाला आहे.

तपासणी अधिकाऱ्यांनी खात्री केली की, प्रकल्पातील सर्व खरेदी देयके ही मूळ आराखड्यानुसार असून प्रकल्प सध्या यशस्वीरीत्या कार्यान्वित आहे. तपासणीच्या वेळी लाभार्थी श्री. बाबासाहेब विरकर हे स्वतः उपस्थित होते. डॉ. बोरकर यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. तसेच लाभार्थ्यास मेंढीपालन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शनही केले.









धर्माबाद (जि. नांदेड) येथे 'एफ.एम.डी.' लसीकरणाच्या आठव्या फेरींतर्गत पशुजैव पदार्थ निर्मिती संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी गोशाळा व पशुवैद्यकीय संस्थांना भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी 'टीएमव्हीपीसी' (TMVPC) धर्माबाद अंतर्गत १४ गावांमध्ये १००% लसीकरण व एन.डी.एल.एम. पोर्टलवर शंभर टक्के नोंदणी पूर्ण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. सोबतच गोशाळांना 'परिपोषण' योजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





जिल्हा विधी न्यायालय आयोजित 'शासकीय योजनांचा महामेळावा' या उपक्रमात पशुसंवर्धन विभागाच्या स्टॉलला उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती मा. माधव जामदार व जिल्हा परिषद रत्नागिरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वैदेही रानडे यांनी भेट देऊन लाभार्थींना कुक्कुटपालनासाठी आवश्यक साहित्याचे वाटप केले.

# तितूर येथे विशेष घटक योजनेअंतर्गत ३ दिवसीय पशुपालन प्रशिक्षण



**तितूर (ता. कुही, जि. नागपुर) :** येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात दि. ५ ते ७ मार्च २०२६ दरम्यान विशेष घटक योजनेअंतर्गत तीन दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पंचायत समिती कुही यांच्या माध्यमातून आयोजित या शिबिरात गायपालन, बकरीपालन आणि कुक्कुटपालन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी गट विकास अधिकारी श्री. स्वप्नील मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अविरत सवाईमूल यांनी पशुसंवर्धनातील विस्तारावर, तर डॉ. अमोल चौधरी यांनी शेळीपालनाच्या आधुनिक तंत्रावर प्रकाश टाकला. डॉ. हर्षल रेवतकर यांनी पशुपालकांच्या दैनंदिन समस्यांवर चर्चासत्र घेतले. डॉ. विनोद समर्थ (सहायक आयुक्त) यांनी आधुनिक गायपालनावर, तर श्री. राजू जाधव व श्री. सारंग राऊत यांनी पशुपालनातील व्यवस्थापन कौशल्यांवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांनी उद्यमी शेतकरी श्री. सचिन चिकणकर यांच्या शेताला व जर्सी डेअरीला भेट दिली. यावेळी डॉ. अंजली गंधे, डॉ. वैशाली अंजनकर आणि डॉ. लईक खान यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे माहिती दिली. श्री. वामन श्रीरामे यांनी पशुसंवर्धनातून प्रगतीचा मंत्र दिला. सरपंच श्री. अमित लांडगे, उपसरपंच सचिन कामळी, देविदास वैद्य व ग्रामपंचायत सदस्यांची यावेळी उपस्थिती होती.

सूत्रसंचालन श्री. राहुल बंधाते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पशुधन पर्यवेक्षक पराग खोब्रागडे, बावणे, रुपेश खोडणकर, गोपाल फड तसेच स्थानिक ग्रामस्थांनी व परिचरवृंदाने विशेष परिश्रम घेतले. परिसरातील बहुसंख्य पशुपालकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.







पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगाव (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे दि. २३ ते २५/०३/२०२६ या कालावधीत शेळी-मेंढीपालन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यात एकूण ८४ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.





# महा एनजीओ फेडरेशन व शासकीय प्रक्षेत्राचा स्तुत्य उपक्रम
# शेतकऱ्यांना 'गवळाऊ' गोवंशाचे वाटप



**अमरावती:** राज्यातील शेतकऱ्यांचे व पशुपालकांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने, शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, पोहरा (जि. अमरावती) आणि महा एनजीओ फेडरेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'गवळाऊ गोवंश वितरण' कार्यक्रमाचे दिमाखात आयोजन करण्यात आले. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या उपक्रमामुळे विदर्भातील शुद्ध गवळाऊ गोवंशाच्या संवर्धनाला नवी दिशा मिळाली आहे.

**प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या लाभावर भर**

एनजीओ फेडरेशनने थेट शेतकऱ्यांना गोवंश देऊन त्यांच्या उत्पन्नात भर टाकण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे निश्चित केले आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा व आयोगाच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. संगीता पांडे यांच्या संकल्पनेतून हा विशेष उपक्रम साकारण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला केंद्र व राज्य स्तरावरील मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने, श्री. सुनील मानसिंह (सदस्य, जीवजंतू कल्याण बोर्ड, भारत सरकार), डॉ. सुनील सुर्यवंशी (सदस्य, महाराष्ट्र गोसेवा आयोग), श्री. विजयजी शर्मा (सदस्य, प्राणी क्लेश निवारण समिती, अमरावती) यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. रामेश्वर अढाऊ हे होते. यावेळी मान्यवरांनी गोवंशाचे महत्त्व आणि त्याद्वारे होणारी ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरण यावर आपले विचार मांडले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश राऊत, डॉ. प्रतीक वानखडे (पशुधन विकास अधिकारी) व श्री. चंद्रशेखर गिरी (सहा. वैरण विकास अधिकारी) यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नेटके संचालन श्री. सतीश ढोके (सहा. पशुधन विकास अधिकारी) यांनी केले. या उपक्रमामुळे पोहरा परिसरातील पशुपालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शुद्ध गवळाऊ गोवंशाच्या दुधामुळे आणि शेतीकामातील उपयुक्ततेमुळे शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.




**ठाणे:** ठाणे जिल्हा परिषद व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'बी. जे. हायस्कूल' येथे आयोजित विशेष सोहळ्यात जिल्ह्यातील गुणवंत पशुपालक आणि उत्कृष्ट सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हा गौरव सोहळा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली व पशुसंवर्धन विभागाचे माननीय प्रादेशिक सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजिंक्य पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते 'पशुधन उन्नती' या विषयावरील पुस्तकांचे विमोचन करण्यात आले. तसेच, ग्रामीण भागातील पशुपालकांना माहितीचा स्रोत उपलब्ध व्हावा या उद्देशाने पशुसंवर्धनविषयक उपयुक्त पुस्तकांचे लोकार्पण करण्यात आले.



**नंदुरबार:** जिल्ह्यातील पशुधनाच्या आरोग्य संरक्षणासाठी व पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक तांत्रिक बाबींवर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नंदुरबार जिल्हा पशुसंवर्धन विभागामार्फत एकदिवसीय तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन जिल्हा परिषद येथील 'याहा मोगी' सभागृहात १० मार्च २०२६ करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन नाशिक विभागाचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय प्रादेशिक सहआयुक्त मा. डॉ. बाबुराव नरवाडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. चंद्रकांत पवार यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# खलासना येथे गायीच्या डोळ्याच्या कर्करोगावर यशस्वी शस्त्रक्रिया

**तितूर/कुही (जि.नागपुर):** कुही तालुक्यातील खलासना येथे पशुवैद्यकीय विभागाने एका गायीच्या डोळ्याला झालेल्या कर्करोगावर अत्यंत गुंतागुंतीची व यशस्वी शस्त्रक्रिया करून पशुधनाला जीवदान दिले आहे. पशुवैद्यकीय चिकित्सालय, तितूर व पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, महाराज बाग (नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम फत्ते करण्यात आली.

संबंधित गायीला डोळ्याचा कर्करोग (Ocular Squamous Cell Carcinoma) झाला होता. यामुळे गायीला असह्य वेदना होत होत्या. हा संसर्ग संपूर्ण शरीरात पसरण्याची भीती निर्माण झाली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला. ही शस्त्रक्रिया डॉ. हर्षल निळकंठ रेवतकर (पशुवैद्यकीय अधिकारी, तितूर) आणि डॉ. प्रदीप गावंडे (पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, महाराज बाग) यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली. डॉ. गावंडे यांनी या प्रक्रियेत तांत्रिक मार्गदर्शन केले.सर्व शास्त्रीय नियमांचे आणि निर्जंतुकीकरणाच्या पद्धतींचे पालन करून गायीचा संक्रमित डोळा अत्यंत काळजीपूर्वक काढण्यात आला. शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्राव नियंत्रण आणि ऊतींच्या संरक्षणाची विशेष खबरदारी घेण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर गायीची प्रकृती स्थिर असून ती सध्या तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार घेत आहे.





गडचिरोली पोलीस दल व पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोजेक्ट संजीवनी' अंतर्गत एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली येथे आत्मसमर्पित माओवाद्यांसाठी पशुपालन संबंधित तंत्रविषयक मार्गदर्शनाची एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) डॉ. गणेश ब. मेश्राम यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, जिल्हा वार्षिक योजना आणि राज्यस्तरीय योजनांची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी जिल्हा प्रकल्प अधिकारी (VMDDP) डॉ. मनोज दोनाडकर, पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिकेत चिचामे आणि डॉ. अक्षय लाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

महापशुधन वार्ता

# चाळीसगावच्या 'टीएमव्हीपी' मध्ये प्रगत 'सीआर' एक्स-रे तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग; घोड्याच्या दुर्धर आजाराचे अचूक निदान



**जळगाव:** पशुवैद्यकीय क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाचा वापर आता ग्रामीण भागातही प्रभावीपणे होऊ लागला आहे. चाळीसगाव (जि. जळगाव) येथील टीएमव्हीपी (तालुका लघुपशुवैद्यकीय चिकित्सालय) येथे नुकतेच एका घोड्याच्या पायातील गंभीर दुखापतीचे 'डिजीटल सीआर सिस्टम' क्ष-किरण तंत्रज्ञानाद्वारे अचूक निदान करण्यात आले. महिनाभरापासून लंगडणाऱ्या घोड्यावर या तंत्रज्ञानामुळे योग्य उपचार सुरू झाले आहेत.

संबंधित घोडा गेल्या एक महिन्यापासून लंगडत होता. त्यावर स्थानिक पातळीवर अनेक उपचार करण्यात आले, मात्र कोणताही सकारात्मक परिणाम दिसून येत नव्हता. अखेर १८ मार्च २०२६ रोजी या घोड्याला चाळीसगाव येथील टी.एम.व्ही.पी. केंद्रात आणण्यात आले. पविअ डॉ. ऋषीकेश मंत्री यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ आधुनिक रेडिओग्राफिक मूल्यमापन करण्याचा निर्णय घेतला.

## अचूक निदानामुळे उपचारांना दिशा

एक्स-रे तपासणीमध्ये घोड्याच्या पायातील 'फेकलॉक' भागातील हाडांच्या संरचनेत बदल झाल्याचे दिसून आले. हाडांवरील अतिरिक्त दाबामुळे झालेली दुखापत (Stress Injury) व हाडांची कमी झालेली घनता (Osteopenia) हे या लंगडेपणाचे मुख्य कारण असल्याचे निष्पन्न झाले. यापूर्वी केवळ बाह्य लक्षणांवरून उपचार होत असल्याने यश येत नव्हते, मात्र आता 'पिंजरा' भागातील हाडांची झीज स्पष्ट झाल्याने डॉक्टरांनी नेमके उपचार सुरू केले आहेत.



डॉक्टरांनी घोड्याच्या पायाला महिनाभर 'क्रेप बँडेज' लावून आधार दिला असून, हाडांच्या पुनरुज्जीवनासाठी विशिष्ट इंजेक्शन व कॅल्शियम-फॉस्फरसचे सप्लिमेंट्स सुरू केले आहेत. एका महिन्यानंतर पुन्हा तपासणी करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारचे प्रगत 'एक्स-रे' निदान उपलब्ध झाल्यामुळे महागड्या प्राण्यांच्या आजारावर वेळीच उपचार करणे शक्य झाले आहे. टी.एम.व्ही.पी. चाळीसगाव येथील तज्ज्ञांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# प्राण्यांमधील अस्थिभंग आता असाध्य नाही

## नाशिकच्या डॉ. प्रतिभा कोरे यांचा यशस्वी 'ऑर्थोपेडिक' प्रयोग; जखमी मांजरीची चाल पुर्ववत!





**नाशिक:** माणसांप्रमाणेच प्राण्यांनाही अपघाती धडक, उंचावरून पडणे किंवा अनपेक्षित आघातामुळे हाडे मोडण्याच्या (फ्रॅक्चर) समस्येला सामोरे जावे लागते. मात्र, योग्य वेळी निदान व आधुनिक शस्त्रक्रिया उपलब्ध झाल्यास हे प्राणी पुन्हा धावू शकतात, हे नाशिक येथील जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाने सिद्ध केले आहे. नाशिकच्या पहिल्या महिला वेटरनरी ऑर्थोपेडिक सर्जन तथा पशुधन विकास अधिकारीडॉ. प्रतिभा उत्तम कोरे यांनी जटिल शस्त्रक्रियांद्वारे अनेक भटक्या व पाळीव प्राण्यांना नवजीवन दिले आहे.

### कसे ओळखावे फ्रॅक्चर?

- चालताना लंगडणे किंवा पायावर वजन न देणे.
- बाधित भागावर सूज येणे आणि तीव्र वेदना होणे.
- पायाचा नैसर्गिक आकार बदलणे.
- जखमेतून हाड बाहेर दिसणे.

अशी लक्षणे दिसल्यास त्वरित क्ष-किरण (X-Ray) तपासणी करून फ्रॅक्चरचा प्रकार निश्चित करणे आवश्यक असते.करिता, त्वरीत पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधणे आवश्यक असते.

### प्राण्यांमधील फ्रॅक्चरचे प्रकार

- प्राण्यांमध्ये प्रामुख्याने बंद फ्रॅक्चर (Closed Fracture)
- उघडे फ्रॅक्चर (Open Fracture)
- हाड तडकणे (Transverse)
- तिरक्या कोनात मोडणे (Oblique)
- हाडाचे अनेक तुकडे होणे (Comminuted Fracture)

### जटिल शस्त्रक्रियेतून मांजरीला जीवदान

नुकतीच एक २ वर्षांची मांजर पहिल्या मजल्यावरून पडल्याने तिचा पाय गंभीररीत्या फ्रॅक्चर झाला होता. डॉ. प्रतिभा कोरे यांनी 'एक्स-रे' द्वारे तपासणी केली असता फ्रॅक्चर अत्यंत जटिल असल्याचे दिसून आले. त्यांनी 'क्रॉस पिनिंग' (Cross Pinning) या आधुनिक तंत्राचा वापर करून हाड पुन्हा योग्य स्थितीत बसवले. केवळ दोन महिन्यांच्या कालावधीत ती मांजर पूर्णपणे बरी होऊन आता आपल्या मालकासोबत पुन्हा बागडू लागली आहे.

### आधुनिक उपचार पद्धती

डॉ. कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली साध्या फ्रॅक्चरसाठी प्लास्टर (Plaster) तर जटिल केसेसमध्ये Metal Pins, Rods किंवा Plates वापरून ऑपरेशन केले जाते. या कार्यासाठी त्यांना पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त, नाशिक विभाग डॉ. बाबुराव नरवडे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रकाश आहेर आणि रोग अन्वेषण विभागाचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मिलिंद भणगे यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

### पशुपालकांसाठी महत्त्वाचा सल्ला

"प्राण्यांमध्ये फ्रॅक्चर ही गंभीर समस्या असली तरी ती पूर्णपणे बरी होऊ शकते. शस्त्रक्रियेनंतर योग्य आहार, पुरेशी विश्रांती व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित 'फॉलो-अप' घेतल्यास मुके प्राणी पुन्हा सामान्य जीवन जगू शकतात. आपल्या पाळीव प्राण्याला दुखापत झाल्यास घरगुती उपाय न करता त्वरित तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घेणे हिताचे ठरते."



**डॉ. प्रतिभा कोरे**
पशुधन विकास अधिकारी
जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, नाशिक



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

लोकमत

# १६६ पशु वैद्यकीय दवाखाने आता उघडणार दोन सत्रात

सकाळी ८ ते दुपारी १.३० - दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान सेवा



### यासाठी केला बदल

### शेती कामातील खोळंबा दूर

### स्थानिकांना या सूचना

पुढारी



## बोरीत जैवसुरक्षेचा संदेशातील शेळी-मेंढी पालकांची कार्यशाळा

८५ पशुपालक सहभागी; रोगप्रतिबंध, स्वच्छता, आधुनिक पालनावर मार्गदर्शन

# पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या वेळेत

### आठवड्यातून एकदा भेट द्या

पुण्यनगरी

# १९२ पशुवैद्यकीय दवाखान्यांची वेळ बदलली

सातारा / प्रतिनिधी

### आता दोन सत्रांत सेवा मिळणार

### शेतकऱ्यांचा वेळ वाचणार..

www.freepressjournal.in

**WILD TAG** | Collector directs tagging of livestock to ensure vaccination, transparency in trade

# Collector orders mandatory animal tagging

FPJ News Network

CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

District Collector Deelip Swami has directed that tagging of livestock be made mandatory, particularly for animals brought from other states, to ensure timely vaccination and transparency in sale and purchase.

"It is important that the cattle wealth in the district should be tagged for proper vaccination in time and to make their sale and purchase deals transparent. The animals should be tagged with the names of the farmers and their owners," Swami said during a review meeting at the district collectorate on Monday.



He said transactions involving animals brought from neighbouring states lack transparency due to the absence of tagging. He directed that such animals must be registered and tagged upon entry into the state.

Swami instructed the Animal Husbandry, Police and Transport departments to take necessary steps to monitor and investigate such cases. He added that animals brought to markets, including cows, oxen, goats and buffaloes, must have ear tags and should be checked by the concerned authorities.

He also directed the Animal Husbandry Department to take preventive measures during the summer season to protect livestock from heatstroke and ensure adequate availability of fodder and water. Necessary guidelines should be issued to farmers and animal breeders, he said.

District Cattle Wealth Officer Nanasaheb Kadam said that 87% vaccination of animals in the district has been completed under the ongoing drive.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# पशुपालकांसाठी माहितीचा खजिना पशुसंवर्धन विभागाचे 'महापशुधन वार्ता' ई-मासिक

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रकाशित होणारे 'महापशुधन वार्ता' हे डिजिटल ई-मासिक पशुपालक, शेतकरी, उद्योजक, पशुवैद्यकीय विद्यार्थी तसेच सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त माहितीचे प्रभावी माध्यम ठरत आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील शासनाच्या योजना, नवनवीन तंत्रज्ञान, यशस्वी प्रकल्प, प्रशिक्षण उपक्रम, रोगनियंत्रण, तसेच विभागाच्या कार्यांची सविस्तर माहिती या मासिकातून नियमितपणे प्रसिद्ध केली जाते.

पशुसंवर्धन सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या संकल्पनेतून या मासिकाची निर्मिती झाली. मे २०२५ रोजी या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला होता. आतापर्यंत या मासिकाचे ११ अंक प्रसिद्ध झाले आहेत. या मासिकामध्ये राज्यातील विविध भागातील यशस्वी पशुपालकांच्या प्रेरणादायी यशोगाथा, आधुनिक शेळीपालन, कुक्कुटपालन, गो-आधारित शेती, शास्त्रोक्त मत्स्यपालन, लसीकरण मोहिमा, तसेच पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांचे क्षेत्रीय दौरे व उपक्रम यांच्या माहितीचा समावेश असतो. त्यामुळे हे मासिक केवळ माहितीपर न राहता मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरत आहे. पशुसंवर्धन आयुक्तालयामार्फत हे मासिक प्रकाशित केले जाते. पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावरून आता हे मासिक महाविस्तार ॲपमध्येही वाचता येणार आहे.

मार्च २०२६ च्या अकराव्या अंकात फुलगाव पाळी वैजनाथ येथे झालेल्या अखिल भारतीय स्तरावरच्या महापशुधन एक्स्पो विषयाची माहिती, छायाचित्रे देण्यात आली आहेत. त्याशिवाय आत्मनिर्भर गोशाळा व नैसर्गिक शेतीचे भरज, लडाखमधील पशुपालनासाठी महाराष्ट्राचे मदत, नंदुरबार जिल्ह्यातील दुग्धविकास क्षेत्राला मिळणार चालना आदी विविध विषयांवरील माहितीचा समावेश आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी या मासिकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "पशुपालन व दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. विभागामार्फत प्रकाशित होणारे हे मासिक पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना व यशस्वी प्रयोगांची माहिती देणारे प्रभावी साधन आहे. महापशुधन वार्ता हे डिजिटल ई मासिक पशुपालक शेतकरी बांधवांना प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरत आहे. प्रत्येक पशुपालक, तरुण उद्योजक आणि विद्यार्थ्यांनी हे मासिक नियमित वाचावे," असे आवाहन त्यांनी केले.



सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी सांगितले की, "राज्यात गुणात्मक पशुधनाची वृद्धी तयार करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रभावी धोरण राबवित आहे. त्या अनुषंगाने शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून 'महापशुधन वार्ता' हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. पशुपालन क्षेत्रात गुणवत्ता, उत्पादकता व उत्पन्न वाढीसाठी ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. हे मासिक डिजिटल स्वरूपात सर्वांसाठी मोफत उपलब्ध असून, अधिकाधिक नागरिकांनी या मासिकाचा लाभ घ्यावा."

## जिल्ह्यातील पशुपालकांनी चारा उत्पादनासाठी वैरण बियाण्यांचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी | [illegible]

जिल्ह्यातील पशुपालकांनी चारा उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावे, या उद्देशाने पशुसंवर्धन विभागामार्फत चारा समृद्ध गाव अभियान राबविण्यात येत आहे. यात पशुपालकांनी वैरण बियाण्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी [illegible] आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी [illegible] यांनी केले आहे.

सध्या जिल्ह्यात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर होत आहेत. शिबिरांत पशुसंवर्धन विभागाकडे विशेष माहिती कक्ष उभारून विविध शासकीय योजनांची माहिती दिली जाते. तसेच, लाळ्या-खुरकूत प्रतिबंधक लसीकरणाबाबतही जनजागृती केली जात आहे. अभियानात जिल्हा पशुसंवर्धन योजनेतून प्राप्त झालेली वैरण बियाणे शिबिरात पशुपालकांना वितरित केली जात आहेत. पशुधनासाठी वर्षभर पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, हा उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

**कुठे संपर्क साधाल**

इच्छुक पशुपालकांनी ही योजना आणि बियाण्यांचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन) डॉ. प्रदीप [illegible] यांनी दिली.

दैनिक क्रांतीशस्त्र
क्रांतीज्योती - क्रांतीसूर्यांचे प्रकाश

# वरपूड येथे भव्य पशुरोग निदान उपचार व लसीकरण शिबीर...!

क्रांतीशस्त्र वृत्तसंकलन

परभणी (दि.१७ मार्च ) - वरपुड येथे पशुविज्ञान महाविद्यालय परभणी व कै. अंबादासराव वरपूडकर कृषी महाविद्यालय वरपुड यांच्या संयुक्त विद्यमानाने पशुरोग निदान उपचार व लसीकरण शिबिराचे दि.१२ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन श्री सुशील मैप्या वरपूडकर यांच्या हस्ते गो पूजनाने करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पशुप्रजनन विभाग प्रमुख डॉ सौ.मंजुषा पाटील होते तर प्रमुख अतिथी म्हणून पशुशल्यक्रिया विभाग प्रमुख डॉ शरद येमटे, पशुवैद्यकीय औषध विभागाचे डॉ पंकज हसे,डॉ सय्यद मुजीब यांची उपस्थिती होती. डॉ शरद येमटे यांनी पशुवर्क रोगांची कारणे व प्रतिबंध उपाय या वर मार्गदर्शन केले. डॉ पंकज हसे यांनी जंत निर्मुलन, लसीकरण यांची माहिती दिली. डॉ सय्यद मुजीब यांनी लाळ्या खुरकूत रोगाची कारणे, लक्षणे,उपचार व प्रतिबंधक उपाय या विषयी मार्गदर्शन केले. डॉ सौ.मंजुषा पाटील यांनी पशुप्रजनन व्यवस्थापन, पशुवंधत्व निवारण या बद्दल मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये २८९ पशुनां लाळ्या खुरकुत पशु रोग लस देण्यात आली.या सोबत ४ शस्त्रक्रिया,१८ गर्भधारणा तपासणी १४ पशुवंधत्व निवारण व उपचार करण्यात आले. उपस्थित पशुपालकांसाठी जंत निर्मुलन गोळ्या व खनिज मिश्रण वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य चंद्रदीप डोंगरे यांनी केले. तर आभारप्रदर्शन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ शाहेद देशमुख यांनी केले. सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राध्यापक आर. बी रणेर, एस.के. हलाळ,संजय अवसंड , प्रकाश शिंदे, शुभम कदम यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.



## पशुपालकांसाठी माहितीचा खजिना; पशुसंवर्धन विभागाचे 'महापशुधन वार्ता' ई-मासिक



# उष्माघाताचा धोका, तंत्रशुद्ध व्यवस्थापनातून वेळीच रोखा!

## उष्णलहरी व उष्माघातापासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी उपाययोजना:




जागतिक तापमान वाढीचे परिणामस्वरूप उन्हाळ्यातील तापमान नेहमीच्या सरासरी तापमानापेक्षा किमान १-२ अंश सेल्सिअसने जास्त होऊ शकते. मानवास ज्याप्रमाणे वाढत्या तापमानास तोंड द्यावे लागते, तीच परिस्थिती पशुधनाची ही असते. वातावरणातील तापमान वाढीचे परिणाम पशुधनाच्या शरीरक्रियेवर होऊन पशुधन आजारी पडू शकते किंवा दगावण्याची शक्यता ही असते, त्यास उष्माघात किंवा उष्णलहरी म्हणले जाते. एखाद्या भौगोलिक क्षेत्रात उष्णलहरीं असताना वातावरणातील तापमान त्याकाळातील नियमित सरासरी तापमानापेक्षा किमान ३ अंश से. किंवा जास्त तापमान सलग ३ दिवसांसाठी किंवा जास्त कालावधीसाठी असू शकते. अशा ठिकाणी ४५ अंश से. किंवा जास्त तापमान सलग २ दोन दिवसांसाठी असू शकते. यामुळे पशुधनाच्या शरीरातील पाणी व क्षार यांचे प्रमाण कमी होऊन डिहायड्रेशन होते. तसेच चारा व खाद्य खाण्याचे प्रमाण कमी होऊन उत्पादनावर प्रतिकुल परिणाम होतो.



**डॉ. शैलेश केंडे**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (मुख्यालय)
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११०६५

### पशुधनास सवयीचे करणे (अनुकुलन)

प्रतिबंधात्मक उपाययोजना, प्रथमोपचार व पशुवैद्यकीय उपाय याद्वारे उष्णलहरींपासून होणाऱ्या आजारांपासून पशुधनांचा बचाव करता येतो. तुलनेने थंड तापमानातून पशुधनास थेट उष्ण तापमानात नेण्याचे टाळावे. पशुधनास उष्ण कालावधीत सावलीत / हवेशीर निवाऱ्यात ठेवून वाढत्या तापमानाची हळूहळू सवय लावावी.

लहान वासरे / करडे, काळ्या अथवा गडद रंगाचे प्राणी, श्वासाच्या आजाराने ग्रस्त अथवा आजारी पशुधन, वराह, नुकतेच लोकर कापलेल्या मेंढ्या, दुभते पशुधन, मोठ्या चणीची जनावरे अशा पशुधनास व कुक्कुट पक्ष्यांना उष्माघाताचा जास्त धोका असतो. उष्माघात किंवा उष्णलहरींच्या प्रकोपाचा प्रभाव झालेले पशुधन ओळखने अत्यंत महत्वाचे असते. अशा पशुधनात धाप लागणे, श्वासाचा दर वाढणे, पाणी जास्त प्रमाणात पिणे, चारा घेण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट, पशुधन सुस्तावते, लाळ गाळते, नाकपुड्या कोरड्या पडतात, पशुधनाच्या शरीरातील पाणी व क्षार (डिहायड्रेशन) यांचे प्रमाण कमी होते.

उष्माघाताचे लक्षणे:

पशुधनात खालील नमुद लक्षणांपैकी एखादे / काही लक्षणे अथवा जास्त / भिन्न लक्षणे दिसून येण्याची शक्यता असते.

- **शारीरीक लक्षणे:** बाधीत पशुधनात नाकपुड्या कोरड्या, अशक्तपणा, स्नायूंची थरथर, लाळ गळणे, जमिनीवर लवंडणे / पडणे, पडलेल्या स्थितीत पाय ताणलेल्या अवस्थेत असणे, फुगलेले पोट इत्यादी व अशा स्वरुपाची लक्षणे एखादे किंवा सर्व एकत्रित किंवा यापेक्षा अधिक / भिन्न स्वरुपात लक्षणे दिसून येऊ शकतात.
- **बाधीत पशुधनाचे वर्तन / हालचाल (क्रियाशिलता):** हलचाल मंदावणे, पशुधनाची ढब (पवित्रा/मुद्रा) बदलणे, अनियंत्रित हालचाली, वारंवार पाणी पिणे, चारा न खाणे / भुक न लागणे, इत्यादी लक्षणे दिसून येऊ शकतात.
- **श्वासोच्छवास प्रक्रियेतील बदल:** धापा टाकणे, जलद गतीने जीभ बाहेर काढून धाप टाकणे, तोंड उघडे ठेवून श्वास घेणे, इ.
- **उष्ण तापमान संतुलन प्रतिक्रिया लक्षणे:** सतत सावलीत उभारणे / बसणे, जास्तीत जास्त कालावधी पाण्याच्या संपर्कात राहणे, कुक्कुट पक्ष्यात पंख पसरवलेले असणे, इ.
- **उत्पादन दर्शक लक्षणे:** उत्पादनात घट दिसून येणे.




## उष्माघात विकार, लक्षणे व प्रथमोपचार

| अ.क्र. | उष्णलहरींमुळे होणाऱ्या आजाराचा प्रकार | लक्षणे | प्रथमोपचार |
|---|---|---|---|
| १ | वराह व मेंढ्यांमध्ये त्वचा जास्त दिसून येते. | त्वचा लालसर होते, सुजही असू शकते, फोड, ताप येतो. | बाधीत पशुधनावर पाणी फवारावे / शिंपडावे. फोड आलेले असतील तर निर्जतुक ड्रेसिंग /मलम पट्टी करावे. |
| २ | कॅम्पस येणे / पेटके येणे | पायाचे व पोटाचे स्नायु आखडतात आणि घाम येतो. | पशुधनास सावलीत किंवा निवा-यात थंड जागेत ठेवावे. आखडलेल्या स्नायूंना मसाज करावा. |
| ३ | उष्माघातामुळे थकवा /ताण - तणाव येणे. | भरपूर घाम येतो, अशक्तपणा येतो, त्वचा निस्तेज / थंड असणे, धापा टाकते, नाकपुड्या कोरड्या होतात, श्वासोच्छावासाचा दर वाढतो, तापमान नॉर्मल असू शकते. | पशुधनास सावलीत किंवा निवाऱ्यात थंड जागेत ठेवावे. शक्य असल्यास फॅन लावावेत, थंड पाणी पिण्यासाठी पुरवावे, एका जागेत पशुधन दाटीवाटीने बांधू नये. शक्यतो, विरळ बांधावीत. गोठ्यातील पशुधनाची घनता कमी करावी. |
| ४ | उष्माघात - दुभती जनावरे जास्त काळासाठी व /अथवा जास्त तीव्र उष्ण वातावरणाच्या सानिध्यात राहिलेली दुभती जनावरे | शरीराचे तापमान वाढते, त्वचा / कातडी गरम व कोरडी होते, नाडी (Pulse) ठोके स्पष्ट जाणवतात आणि त्याचा दर वाढलेला असतो. | पशुधनास सावलीत किंवा निवाऱ्यात थंड जागेत ठेवावे. शक्य असल्यास फॅन/कुलर लावावेत, थंड पाणी पिण्यासाठी पुरवावे, कोल्ड स्पॉन्जिंग करावे, थंड पाण्याचा शिडकावा करावा, एका जागेत पशुधनाची दाटी करू नये, विरळ बांधावीत, पशुवैद्यकाशी त्वरीत संपर्क साधून उपचार करून घ्यावेत. |




### पशुसंवर्धन विभागाची तयारी व उपाययोजना:

#### जनजागृती व पशुवैद्यकीय देखभाल:

राज्यातील पशुपालक आणि कुक्कुट व्यावसायिकांनी उष्णलहरीच्या काळात पशुधनाचे व्यवस्थापन कसे करावे, याबाबत पशुसंवर्धन विभागाने व्यापक प्रसिद्धी द्यावी. यामध्ये उष्माघाताची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि 'काय करावे व काय करू नये' या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश असावा. विभागांतर्गत कार्यरत पशुवैद्यक, पशुधन पर्यवेक्षक आणि पशुसखी अशा क्षेत्रीय मनुष्यबळाची क्षमताबांधणी करून त्यांना सातत्याने खालील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी उद्युक्त करावे:

- आपल्या कार्यक्षेत्रातील पशुपालकांना उष्णलहरीतील पशुधनाच्या दक्षतेबाबत जागृत करणे.
- उष्णलहरीच्या काळात घ्यावयाची काळजी व निगा यावर तांत्रिक मार्गदर्शन करणे.
- आपत्तीच्या वेळी पशुपालकांच्या समस्यांना सकारात्मक आणि संवेदनशील प्रतिसाद देणे.

पशुवैद्यकीय पायाभुत सुविधा, कार्यपध्दती व तज्ञ-विशेषज्ञ यांच्यात सुधारणा व सुसुत्रता आणावी. त्यामध्ये खालील बाबी समाविष्ट कराव्यात:

१. हवामान विभागाशी नियमित संपर्कात रहावे. त्याद्वारे दैनिक तापमानाचे अंदाज मिळवावेत आणि ते क्षेत्रीय संस्थांना अवगत करावेत. तसेच क्षेत्रीय पशुवैद्यकांनी व सहाय्यक मनुष्यबळाने स्वयंप्रेरणेने तयारीत राहून तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी त्यांना सतर्क करावे.

२. स्थानिक परिस्थिती व गरजांच्या अनुरुप कृती आराखडा / कार्यपध्दती / मोहिमेची आखणी व नियोजन याबाबी परिणामकारक करण्यासाठी राज्य आपत्ती निवारण दलाच्या सहकार्याने संयुक्त कवायतींचे आयोजन करावे.

३. पशुवैद्यकीय संस्थांमध्ये आवश्यक औषधी, क्षार मिश्रणे, जीवरक्षक औषधी, साहित्य, विविध सलाईन व उपकरणे यांचा साठा करावा.

४. फिरते पशुवैद्यकीय पथकांना तातडीच्या सेवा / प्रतिसादासाठी तयारीत/दक्ष ठेवावे.

५. उष्णलहरीत पशुधनाचे व्यवस्थापन कसे करावे, याबाबत पशुपालक व कुक्कुटपालक यांना माहिती देण्यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करावेत.

६. मृत पशुधनाच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी योग्य क्षेत्र निवडून / आरक्षित करून ठेवावे.

७. समाजातील समहित लाभधारक, इतर भागधारक आणि संस्थांशी समन्वय राखुन पशुधन वाहतूक, चारा व पशुखाद्य वाहतुक, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, स्वच्छता, मृत पशुशव विल्हेवाट, निर्जंतुकीकरण, झुनॉटीक आजार या आपत्ती हाताळण्यासाठी अंतिम टप्प्यातील अग्रीम तयारी करावी.

८. उर्जेचा किफायती वापर करण्यासाठी पशुधन आणि कुक्कुट शेड / निवाऱ्याअंतर्गत तापमान कमी राखण्यासाठी छतासाठी वापरण्यात येणारे साहित्य प्राधान्याने उष्णता रोधक / शितलता प्रदान करणारे व हिरव्या रंगाचे असावे, खिडक्या सावली देणाऱ्या असाव्या, पावसाचे पाणी साठवण सुविधा, पाणी पुर्नवापर सुविधा इत्यादी सोई सुविधायुक्त पशुवैद्यकीय संस्था व पशुधन / कुक्कुट निवारे असावेत.

९. उष्णलहरींची सुरुवात होण्यापुर्वी जंतनाशक पाजणे, घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार रोग प्रतिबंधक लसीकरण करणे.

१०. पशुपालकांकडे पुरेसे भौगोलिक क्षेत्रनिहाय क्षार मिश्रणे, अ जीवनसत्व व इतर जीवनसत्वांचा साठा असावा, याची खातरतमा करावी. जेणेकरून पशुधनास मिळणारे पोषकतत्वे अबाधीत राहतील.

## उष्णलहरीत पशुधनाची घ्यावयाची काळजी, मार्गदर्शक तत्वे:

**१. निवारा :** पशुधनास दिवसातील प्रखर उन्हाच्या (११ ते ४) कालावधीत पशुधनांना विश्रांती घेता यावी, उष्णलहरींपासून बचावासाठी पुरेशी सावली उपलब्ध व्हावी, यासाठी आडोसा असावा.

**२. पिण्याचे पाणी पुरवठा :** पशुधनास दिवसभरात विशेषतः प्रखर उन्हाच्या (११ ते ४) कालावधीत पिण्यासाठी शितल व स्वच्छ पाणी उपलब्ध होईल याची सोय करावी.

**३. वायूविजन व शीतकरण:** पशुधन निवाऱ्यातील वायुवीजन अबाधित राहिल तसेच शक्य असल्यास त्यात वाढ होईल, अशी उपाययोजना करावी. शक्य असल्यास स्प्रींकलर वापर / पाणी फवारणी / पाणी शिंपडणे असे उपाय करावेत. आवश्यक असल्यास तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करावी.

**४. शारीरीक कष्ट / व्यायाम:** शक्यतो पशुधनाकडून (बैल व तत्सम) दिवसाच्या थंड कालावधीत म्हणजे सकाळी १० पूर्वी व सायंकाळी ५ नंतर शारीरीक कष्टाची कामे (शेती, वाहतुक, रेस, इ.) करवून घ्यावीत.

**५. शितल निवारा:** पशुधनाच्या निवाऱ्यात शितलता असावी, यासाठी मॅट वापराव्यात तसेच पशुधनास खेळती हवा व आवश्यक सावली असलेल्या निवाऱ्यात बांधावे.

**६. पशुधनाची वाहतूक :** प्रखर उन्हाच्या (११ ते ४) कालावधीत पशुधनाची वाहतूक करणे टाळावे. शक्यतो सकाळी १० पुर्वी आणि सायंकाळी ५ नंतर वाहतूक करावी. वाहतुकी दरम्यान पुरेसे पिण्यास पाणी द्यावे. पशुधनावर थंड पाणी शिंपडावे / फवारावे. वाहनात पशुधन दाटीवाटीने बांधू नये.







### पशुधनाचे आरोग्य व कल्याण

**१. पशुधनाचे केस / लोकर कापणी:** उष्णलहरीच्या कालावधीत केस कमी केल्याने शरीर तापमान कमी राखण्यास मदत होईल.

**२. पशुधनावरील उष्णतेच्या ताणाचे व्यवस्थापन:** दिवसातील उष्णकाळात लसीकरण शक्यतो टाळावे. वासरे, गाभण पशुधन व दुभत्या जनावरांचे जवळून स्वास्थ निरिक्षण करावे.

**३.पशुधनाचे स्नान :** शरीरांतर्गत उष्णता वाढू नये यासाठी दिवसाच्या थंड कालावधीत स्नान घालावे.

### पशुधन निवारा व्यवस्थापन

**१. वायूवीजन :** निवाऱ्याची दारे व खिडक्याचे दारे उघडी ठेवावीत. प्रखर उन्हाच्या काळात ओले गोणपाट खिडक्यांना बांधावे. यामुळे उष्ण हवा थेट पशुधन निवाऱ्यात येणार नाही.

**२. दाटी वाटी :** पशुधनास विरळ बांधावे. दाटीवाटीने बांधू नये.

**३. छतावर चारा अंथरणेः** शक्य असल्यास पशुधन निवाऱ्याच्या छतावर साळी / गहु / ज्वारी / इत्यादी पिकांचा वाळलेला चारा अंथरावा. त्यावर पाणी शिंपडल्याने छत तापणार नाही व वातावरण थंड राहण्यास मदत होईल. छतास पांढऱ्या रंगाने पेंट करावे. शक्य असल्यास छताखाली फाल्स सिलिंग लावावे.

**४. शितन सयंत्रे :** थंड पाण्याचे फवारे तासास तीन वेळा, सोबत फॅन यामुळे उष्ण व कोरड्या हवामानात पशुधन निवाऱ्यातील वातावरण थंड राहु शकते. टायमरसह ऑटोमॅटीक फवारे जास्त मदतीची ठरु शकतात. तथापि, वायुविजन व्यवस्थित ठेवावे अन्यथा दमटपणा वाढण्याचा धोका असतो.

**५. पाण्यात बसविणे :** म्हैस व तत्सम पशुधन ज्यांना पाण्यात बसायला आवडते. अशा पशुधनास पाण्यात बसण्याची सुविधा शक्य असल्यास पुरवावी.

### चारा व पशुखाद्य व्यवस्थापन

**१. खाद्य व पाणी व्यवस्थापन:** चाऱ्याची गव्हाण व पिण्याच्या पाण्याचे टाके / भांडे / पात्र हे सावलीत असावेत.

**२. उत्कृष्ट दर्जाचे पशुखाद्य:** हिरव्या चाऱ्यासोबतच उत्कृष्ट दर्जाचे पशुखाद्य, संतुलित आहार, भरड, खाद्यपुरके द्यावीत. यामुळे पशुधनाची रोग प्रतिकारशक्ती शाबुत रहाते. उष्ण तापमानात पशुधन चांगल्याप्रकारे तग धरण्यास सक्षम राहाते.

**३. चारा देण्याच्या वेळा :** उष्ण तापमानात पशुधनास चारा देण्याच्या वेळा वाढवाव्यात. पुर्ण दिवसाचा चारा या वेळात विभागून देण्यात यावा. शक्यतो दिवसाच्या थंडवेळी चारा द्यावा. यामुळे चयापचाय क्रियेतून निर्माण होणारी उर्जा नियंत्रित होते.

**४. चरण्याचा कालावधी:** जे पशुधन चरण्यास सोडण्यात येते अशा पशुधनास दिवसाच्या थंड कालावधीत चरण्यास सोडावे.

**५. पोषक द्रव्ये :** पशुधनास उच्च पोषण मुल्य असलेले पशुखाद्य, खाद्य पुरके, क्षार मिश्रणे, जीवनसत्वे व इलेक्ट्रोलाईट द्यावीत.

**६. पिण्याचे पाणी :** पशुधनास पिण्यास स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध असावे. पशुधनास पिण्यास पाणी देताना धातुच्या भांड्यांचा वापर टाळावा. पशुधनास पिण्यास पाणी देण्याच्या वेळा नियमित पेक्षा दुप्पट कराव्यात, जसे दिवसातून तीन वेळा पाणी पाजले जात असेल तर ५ ते ६ वेळा पाणी पाजावे.

**७. क्षार व खनिज मिश्रणे :** आहारात खनिज मिश्रणे व सामान्य मीठ यांचा ही समावेश असावा.

### पशुपालकात जागृती निर्माण करणे

**१. जनजागृती :** पशुपालक व शेतकरी यांना उष्णलहरीच्या वेळी पशुधनाची काळजी, निगा व उष्माघात याबाबत माहिती द्यावी. साठी जनजागृती मेळावे, प्रशिक्षण, सभा तसेच वर्तमानपत्रात लेख, रेडीओटॉक, इत्यादी बाबींचे आयोजन करण्यात यावे.

**२. जन सहभाग :** नागरिकांना त्यांच्या घरासमोर पशुधन व पक्षी यांना पिण्यासाठी पाण्याचे भांडे ठेवावे असे अवाहन करावे.

### तातडीच्या उपाययोजना

**१. दक्षता :** उष्णलहरी संबंधित वार्ता, पशुधनातील लक्षणे दिसून आल्यास त्यांना त्वरीत सावली अथवा थंड निवारा उपलब्ध करून देण्याची दक्षता घ्यावी, पशुवैद्यकाशी संपर्क करावा, उपरोक्त नुसार उपाययोजना कराव्यात.

**२. पशुवैद्यकीय मदत :** पशुधनाचे स्वास्थ खालावत चालले असेल तसेच वरील नमुद उपाययोजनांनी त्यांच्या स्वास्थात सुधारणा होत नसेल तर नजीकच्या पशुवैद्यक संस्थेशी संपर्क साधावा.

**३. पशुवैद्यकीय औषधी साठा:** सर्व क्षेत्रीय पशुवैद्यकीय संस्थांना उष्माघातासंबंधी इलेक्ट्रोलाईट, सलाईन व आवश्यक औषधींचा पुरेसा साठा असावा.

**४. बाह्य मदत :** जिल्हा प्रशासन, अशासकीय संस्था, सामाजिक संस्था आणि पशु कल्याण मंडळे इत्यादी संस्थांना पशुधनाच्या पिण्याच्या पाण्यासाठी हौद / भांडी / टाके यांची सोय विविध ठिकाणी करण्यासाठी अवाहन करावे. जेणेकरुन उष्ण लहरींची तिव्रता कमी करण्यास मदत होईल.

### उष्णलहरींच्या वेळी काय करावे:

१. स्थानिक हवामान अंदाज व दैनिक तापमानावर लक्ष ठेवावे.

२. चारा व वैरण यांचा पुरेसा साठा ठेवावा.

३. पशुखाद्य देताना पुरेसे क्षार व जिवनसत्व मिश्रणे द्यावीत. दुभत्या पशुधनास संतुलीत आहार द्यावा.

४. दुभत्या पशुधनांच्या दोहनाच्या दोन वेळा किमान १ तास उशीराने ठेवल्यास पशुधनापासून योग्य उत्पादन मिळेल.

५. पशुधनासाठी आधुनिक गोठे असलेल्या पशुपालकांनी स्प्रिंकलरची सोय करावी. इतर पशुपालकांनी पशुधनावर पाणी मारणे/ फवारणे किंवा म्हैसवर्गीय पशुधनासाठी शक्य असल्यास पाण्यात बसण्यासाठी स्वच्छ पाण्याच्या हौदाची सोय करावी.








६.शेतीच्या, वहनाच्या व इतर कामासाठीच्या पशुधनास उन्हाच्या (शक्यतो दिवसा ११ ते ४) वेळी विश्रांती द्यावी. त्यांना सावलीत व भरपूर खेळती हवा असलेल्या जागेत बांधावे.

७. स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची सोय असावी. पिण्याच्या पाण्याची भांडी स्वच्छ ठेवावीत.

८. शक्यतो पिण्याच्या पाण्याचे हौद अथवा इतर सुविधा गोठ्याजवळ व सावलीत असावी. जेणेकरून पशुधनास थेट उन्हाचा संपर्क येणार नाही.

९. अश्ववर्गीय पशुधनास उष्णलहरींपासून बचावासाठी पायाकडून शरीराच्या वरील भागास थंड पाण्याचा हळूवार शिडकावा करावा.

१०. गाभण पशुधनास पुरेसे पशुखाद्य व चारा / वैरण द्यावे.

११. वराह प्रजातींच्या पशुधनास पुरेसा निवारा, पिण्याचे स्वच्छ पाणी व शक्य असल्यास पाण्यात बसण्याची सोय असावी.

१२. कुक्कुट पक्षांसाठी वातानुकुलीत पक्षीगृह सर्वोत्तम असतात. तथापि ज्या पक्षीगृहांना अशी सोय नाही त्यांनी पक्षीगृहाच्या शेडवर गवताचे अच्छादन करावे, पक्षीगृहाच्या जाळ्यांना पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे. तसेच पक्षीगृहात भरपूर खेळती हवा राहिल, याची दक्षता घ्यावी.

१३. पाळीव पशुधनास उन्हाच्या वेळी शक्यतो गोठ्यातच ठेवावे.

१४. गोठ्याच्या छतासाठी उष्णतारोधक मटेरीयल वापरावे.

१५. मृत पशुधनाची विल्हेवाटीची जागा सार्वजनिक ठिकाणे, पाणवठे यांच्यापासून दूर असावे तसेच ते संरक्षित असावे तसेच तेथे फलक लावण्यात यावा.

**उष्णलहरींच्या वेळी काय करू नयेः**

१. पशुधन उन्हाळ्यात उघड्यावर बांधू नये.

२. पाळीव पशुधनास पार्क केलेल्या गाडीत सोडून जावू नये.

३. शेतीविषयक व इतर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या पशुधनास उन्हाच्या वेळी कामास लावू नये.

४. पशुधनास पाणी पिण्यासाठी उन्हात फार दूर व फार वेळ चालावे लागू नये, याची दक्षता घ्यावी.

५. गोठ्यामध्ये पशुधनाची गर्दी होणार नाही, याची काळजी घ्यावी. दाटीवाटीने बांधू नये.

६. भर उन्हात पशुधनाची हलचाल / वाहतूक करू नये.

७. उन्हे असल्यास दुभत्या पशुधनाचे दोहन करून नये.

८. मृत पशुधन उघड्यावर टाकू नये.

### उन्हाळ्यात कुक्कुटपालन प्रक्षेत्रावरील तसेच परसातील कोंबड्यांची घ्यावयाची काळजी:

राज्यात साधारणतः फेब्रुवारी महिन्यापासून उन्हाळा ऋतु सुरु होतो. वातावरणातील तापमान फारच वाढल्यास (४२ डिग्री सेल्सिअस) उष्माघाताने (Heat Stroke) मृत्यूही संभवतात. पक्ष्यांची रोग प्रतिकारक शक्ती उष्ण हवामानामुळे कमी होत असल्याने या काळात डायरिया व राणीखेत, देवी यासारखे जिवाणूजन्य व विषाणूपासून होणारे रोग होऊ शकतात. सध्या वातावरणामध्ये तापमानात सरासरीपेक्षा जास्त वाढ झाल्याने (४५ डिग्री सेल्सिअस पर्यंत) प्रक्षेत्रावरील तसेच परसातील कोंबड्यांमध्ये मरतूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. सर्वसाधारणपणे पक्षीगृहातील वातावरणाचे तापमान ३० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त वाढू लागले की, पक्ष्यांचे खाणे कमी होते तसेच उत्पादन क्षमता घटते. यामुळे कुक्कुट पालकाचे नुकसान होते, किंबहुना तोटाही होतो.

### उन्हाळ्यात कुक्कुट पक्ष्यांची घ्यावयाची काळजी:

१. पक्षीगृहाच्या छतावर व बाहेरील भिंतींवर चुन्याचा लेप लावावा. त्यामुळे उष्णलहरी परावर्तीत होऊन पक्षीगृहातील तापमान वाढण्यास प्रतिबंध होतो व पक्ष्यांना उन्हाचा त्रास कमी होईल.

२. पक्षीगृहाच्या छतावर नारळाच्या झावळ्या किंवा गावात शाकारून / पसरून ठेवावे जेणेकरून उन्हाची तीव्रता कमी होऊन पक्षीघरात गारवा राहील.

३. उन्हाचा त्रास कमी होण्यासाठी दुपारच्या वेळी पक्षीगृहाच्या छतावर पाण्याचे स्प्रिंकलरचा उपयोग करावा तसेच पक्षीगृहाच्या आतील उष्णता कमी करण्यासाठी फॉगर्स बसवावेत .

४. पक्षीगृहात हवा खेळती राहण्यासाठी "एक्झोस्ट" पंखे बसवावेत. ज्यामुळे पक्षीघरातील गरम हवा बाहेर पडून तापमान संनियंत्रित राहिल.

५. पक्षीगृहाच्या बाहेरील बाजूने पोती लाऊन ठेवल्यास बाहेरील उष्ण हवेपासून पक्ष्यांचे संरक्षण होईल. दिवसातून २ ते ३ वेळा पोत्यांवर पाणी शिंपडून ती ओली करावी; जेणेकरून पक्ष्यांना थंड हवा मिळेल.

६. पक्षीगृहांपासून नजीक (सुरक्षीत अंतरावर) परिसरात भाजीपाल्याची पिके (बागायती) लावून पाणी दिल्यास परिसर थंड राहतो.

७. पक्ष्यांना नेहमी लागणाऱ्या जागेपेक्षा जवळपास २० ते ३० टक्के जागा वाढवून द्यावी व पाण्याच्या भांड्यांची संख्या देखील नेहमीपेक्षा दुप्पट करावी. पक्षीगृहाच्या क्षमतेपेक्षा कमी पक्षी संगोपनासाठी ठेवावेत.

८. पक्ष्यांना खाद्य देताना सकाळी लवकर व संध्याकाळी उन्हानंतर द्यावे तसेच खाद्य देतांना लाईट कमी करावा म्हणजे पक्ष्यांच्या हालचाली कमी होऊन खाद्य खाणे वाढते व त्यामुळे अंड्यांच्या उत्पादनात वाढ होते.

९. उन्हाळ्यात पक्ष्यांचे अंडी उत्पादन कमी होऊ नये व उन्हाचा ताण कमी करण्यासाठी खाद्यामध्ये फीड ॲडीटीव्ह (Vit.AD३, VitC and Electrolytes) वापरावेत.

१०. पक्ष्यांना स्वच्छ व थंड पाण्याचा नियमित पुरवठा करण्यात यावा. पक्षांना दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान थंड पाणी दिल्यास अंड्याचे उत्पादन चांगले मिळते.

११. उन्हाळ्यामध्ये विहिरीतील पाण्याची पातळीकमी होत असल्यामुळे पाण्याची टंचाई जाणवते. जे पाणी मिळते अशुद्ध व खराब मिळते. परिणामतः पक्षांमध्ये ई-कोलाय जंतूमुळे मरतूक होऊ शकते. त्यासाठी पाण्यात मेडीक्लोर वापरावे.

१२. उन्हाचा ताण घालविण्यासाठी पक्ष्यांना पाण्यातून जीवनसत्व क देण्यात यावे.

१३. विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे पक्ष्यांना वयानुसार रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करावे. त्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी नियमित संपर्कात राहावे.

## उष्णलहरीपासून बचाव करण्यासाठी मेंढ्यांची घ्यावयाची काळजी




१. मेंढ्या-शेळ्यांपेक्षा उष्णलहरींना जास्त बळी पडतात.

२. गडद रंगांच्या पशुधनात उष्णलहरींचा परिणाम जास्त होतो.

३. जास्त लोकर असलेल्या मेंढ्या उष्ण लहरींचा चांगला प्रतिकार करू शकतात.

४. मेंढ्यांची लोकर उन्हाळ्यापुर्वीच कातरावी; जेणेकरून प्रखर उन्हाळा सुरू होण्यापुर्वी बऱ्यापैकी लोकर वाढू शकते व त्याचा उपयोग उष्णलहरींपासून बचावासाठी होऊ शकतो.

५. मेंढ्यांची लोकर प्रखर उन्हाळ्यात कातरू नये.

६. आपल्याकडे बंदिस्त मेंढीपालन नगन्य असून, शक्यतो पांरपारीक स्थलांतरीत पध्दतीने केले जाते. म्हणून दिवसाच्या थंडवेळी चारावे उन्हाच्यावेळी सावलीत / निवाऱ्यास बसवावे.

७. उन्हाळ्यात चरण्यासाठी चारा उपलब्ध नसतो. तसेच स्थलांतरीत मेंढ्यांसाठी हिरवा चारा मिळण्याची शक्यता फारच कमी असते. यामुळे जेथे हिरवा चारा/वैरण उपलब्ध होईल तेथे थोड्या प्रमाणात हिरवी वैरण देण्यात यावी.

८. भर उन्हात शेतात उघड्यावर बसवू नये.

९. स्वच्छ व थंड पाणी पिण्यास मुबलक प्रमाणात द्यावे.
१०. स्थलांतर शक्यतो सकाळी उन्हापुर्वी अथवा सायंकाळी उन्हानंतर करावी.
११. मेंढ्यांना शेडमध्ये बांधण्याची सोय असल्यास ते थंड कसे राहिल, याची दक्षता घ्यावी.
१२. मेंढ्यांच्या निवाऱ्यासमोरील मोकळ्या जागेत जाळीदार कापडाचे तात्पुरते अच्छादन ही करता येऊ शकते.
१३. मेंढ्यांना दाटीवाटीने रहायची सवय असल्यामुळे त्यांचे छोटे- छोटे गट करावेत.
१४. आजारी मेंढ्यांना उपचारासाठी त्वरीत पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.
१५. पशुवैद्यक सल्ल्यानुसार / पशुसंवर्धन विभागाने परिपत्रित केलेल्या वेळापत्रकानुसार लसीकरण करावे.




## उन्हाळ्यात उष्णलहरींपासून शेळ्यांचा बचाव करण्यासाठी उपाययोजना:

शेळ्यांची शरीर रचना मेंढ्यांपेक्षा वेगळी असल्यामुळे (लांब कान व मोकळी त्वचा) शरीराचे उष्णता नियोजन मेंढ्यापेक्षा उत्तम असते. परंतु, सरासरी तापमानापेक्षा जास्त उष्ण हवामान शेळ्यांनाही घातक ठरू शकते. गडद रंगांच्या पशुधनात उष्णलहरींचा परिणाम जास्त होतो.

१. शेळ्यांना थंड व भरपूर खेळती हवा असणारा निवारा द्यावा.
२. बंदिस्त शेळीपालन करणाऱ्या पशुपालकांनी उन्हाळ्यात शेडच्या छतावर गवत किंवा नारळाच्या झावळ्या अंथराव्यात, जेणेकरून शेडमधील वातावरण फार वाढणार नाही.
३. शेडच्या भिंतींना पांढरा चूना / रंग देऊन घ्यावा; ज्यामुळे उष्णता परावर्तीत होईल.
४. अर्धबंदिस्त शेळीपालन करणाऱ्या शेळीपालकांनी उन्हाळ्यात शेडसमोरील मोकळ्या जागेत शेडनेटचा निवारा करावा.
५. मुक्त पध्दतीने शेळीपालन करणाऱ्या शेळी पालकांनी शेळ्यांना दिवसाच्या थंड वेळीच चरावयास न्यावे. उन्हाच्या वेळी झाडाखाली सावलीत शेळ्या बसवाव्यात.
६. रानातील / शेतातील पाणवठ्यात / डोहात / नदीत शिल्लक असलेले व गढूळ झालेले पाणी पाजू नये. त्यामुळे हगवण व इतर आजार उद्भवण्याची शक्यता असते.
७. शेळ्यांना पिण्यासाठी थंड व स्वच्छ पाणी उपलब्ध असावे.
८. शेळ्यांना दाटीवाटीने व गर्दी होईल असे बांधू नये.
९. करडे, गाभण तसेच आजारी शेळ्यांची विशेष दक्षता घ्यावी.
१०. शेळ्या आजारी असल्याची शंका असल्यास त्वरीत पशुवैद्यकास पाचारण करावे.
११. पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार / विभागाने परिपत्रित केलेल्या वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे.

# मुख्यमंत्री पशुधन ग्रामीण उद्योजकता योजना

## ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा रोडमॅप






**डॉ. देवेंद्र जाधव**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन), महाराष्ट्र राज्य
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

पशुसंवर्धन विभागाचे नियोजन आरोग्य, पैदास सुधारणा, वैरण विकास, पशुखाद्य आणि व्यवस्थापन या पंचसूत्रीवर आधारित आहे. यामध्ये 'वन हेल्थ' कार्यक्रम आणि AI/ML सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ही राज्य आणि जिल्हा स्तरावर राबवली जाईल. यातून अल्पभूधारक व भूमिहीन लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन मिळेल. योजनेत दुभत्या जनावरांचे वाटप, शेळी-मेंढीपालन, हायड्रोपोनिक्स चारा निर्मिती व भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) यांसारख्या आधुनिक घटकांचा समावेश आहे. एकूणच ही योजना आगामी काळात ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठीचा रोडमॅप ठरेल, याची पूर्णत: खात्री आहे.


**राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायास उद्योजगतेचे स्वरूप देण्याकरिता विभागामार्फत “मुख्यमंत्री पशुधन ग्रामीण उद्योजकता योजना” प्रस्तावित**

**10 + 2** — **राज्यस्तरीय योजना**

**13 +2** — **जिल्हा वार्षिक योजना**

राज्याच्या पशुसंवर्धन क्षेत्रासमोर प्रती पशुधन उत्पादकता वाढवण्याची मोठी संधी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेमुळे उपलब्ध होणार आहे. उदाहरणार्थ, पंजाबमध्ये संकरित गाय सरासरी १४.१ लिटर दूध देते, तर महाराष्ट्रात हे प्रमाण १०.२१ लिटर आहे.

ही तूट भरून काढण्यासाठी आधुनिक पैदास तंत्रज्ञान आणि आहार व्यवस्थापनावर भर देणे गरजेचे आहे, त्यासाठी ही योजना आधारभूत ठरेल. तसेच, अंडी उत्पादनाच्या बाबतीत राज्यात मोठी तूट दिसून येते. भारतीय आरोग्य परिषदेच्या शिफारसीनुसार प्रती व्यक्ती वार्षिक १८० अंडी आवश्यक असताना महाराष्ट्रात केवळ ६५ अंडी उपलब्ध आहेत. परिणामी, राज्याला दररोज १ ते १.२५ कोटी अंडी परराज्यातून आयात करावी लागतात. हा आयात खर्च वाचवून अंडी उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी कुक्कुटपालन व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना देणे ही काळाची गरज आहे, ज्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत कुक्कुटपालनासाठी आकर्षक अनुदान व सवलती असल्याने कुक्कुट उद्योगात आगामी काळात महाराष्ट्रामध्ये विकासात्मक वृद्धी दिसून येईल. त्यामुळे अंडी व चिकन या पशुजन्य उत्पादनात आवश्यक वाढ दिसून येईल.



**जिल्हा वार्षिक योजना द्वारे दारिद्रय रेषेखालील, भुमीहीन, अल्पभुधारक, अत्यल्प भुधारक प्रवर्गातील लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन निर्माण करून देणे**



**राज्य योजनाद्वारे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व इतर पशुपालन जोडधंद्यांना उद्योजकतेचे स्वरूप देण्यासाठी सुयोग्य वातावरण उपलब्ध करून देणे**

पशुसंवर्धन व्यवसायाला खऱ्या अर्थाने उद्योजकतेचे स्वरूप देण्यासाठी "मुख्यमंत्री पशुधन ग्रामीण उद्योजकता योजना" प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी राज्यस्तरीय (१०+२) आणि जिल्हा वार्षिक योजना (१३+२) अशा दोन स्तरांवर केली जाणार आहे. जिल्हा वार्षिक योजनेचा मुख्य उद्देश दारिद्र्यरेषेखालील, अल्पभूधारक आणि भूमिहीन लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे हा आहे, तर राज्य योजनेद्वारे दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनासाठी एक एकात्मिक परिसंस्था (Integrated Ecosystem) निर्माण करण्यात येणार आहे. या योजनेमध्ये दुभत्या जनावरांचे पालन, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन आणि वैरण विकासासाठी हायड्रोफोनिक व मुरघास यंत्रांचा पुरवठा यांसारख्या विविध घटकांचा समावेश आहे. तसेच, भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF), कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित 'कॅटल मॉनिटरिंग सिस्टम' आणि पायाभूत सुविधांच्या विकासासह व्याजात सवलत देऊन पशुपालकांना सक्षम बनवण्यावर या योजनेचा विशेष भर आहे.




सध्या विभागात एकूण १४ जिल्हास्तरीय योजना कार्यान्वित असून, प्रशासकीय कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्यामध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. या प्रक्रियेत ६ जुन्या योजना बंद करण्यात आल्या असून, ६ योजनांमध्ये आवश्यक सुधारणा करून त्या अधिक प्रभावी करण्यात आल्या आहेत (उदा. दुभत्या जनावरांचे व शेळी-मेंढीचे गट वाटप, कुक्कुट विकास आणि चारा उत्पादन कार्यक्रम). याव्यतिरिक्त, २ योजना कोणत्याही बदलाशिवाय सुरू ठेवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, भविष्यातील गरजा लक्षात घेऊन ७ नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये हायड्रोफोनिक चारा उत्पादन, मिनी टीएमआर (Total Mixed Ration) उपकरणे, भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) आणि १००% अनुदानावर लिंग निश्चित रेतमात्रा (Sex Sorted Semen) पुरवठा यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांचा समावेश आहे. हा बदल राज्याच्या पशुसंवर्धन क्षेत्राला अधिक आधुनिक आणि तंत्रस्नेही बनवण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण व प्रासंगिक ठरणार आहे.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

## शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) साध्य करण्यामध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची भूमिका

- पशुपालनाद्वारे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती
- दूध, अंडी व मांसाद्वारे उच्च प्रथिने व सूक्ष्म पोषक घटकांचा पुरवठा
- प्राण्यांचे आरोग्य सुधारल्याने झुनोटिक आजार कमी होऊन मानवी आरोग्य सुरक्षित (One health)
- पशुपालनाद्वारे ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण
- लघु-स्तरीय शाश्वत पशुपालनास प्रोत्साहन देऊन ग्रामीण उत्पन्न वाढवणे व अन्न सुरक्षेसह आर्थिक उत्पादकता सुधारणे.
- शाश्वत पशुपालन प्रणाली खाद्य अन्नाचा अपव्यय कमी करून पशु कार्यक्षमता वृद्धिंगत करते.
- शाश्वत पशुपालन व्यवस्थापन पद्धतींमुळे हरितगृह वायू उत्सर्जन कमी होऊन पर्यावरणाचे रक्षण होते.
- योग्य चारा व्यवस्थापन केल्याने जैवविविधतेचे रक्षण होऊन जमिनीचा ऱ्हास रोखण्यास मदत होते.

सद्यस्थितीत विभागात एकूण १८ राज्यस्तरीय योजना कार्यरत आहेत, ज्यांचे कार्यक्षमता वाढवण्यासाठी विविध गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे. या प्रक्रियेत जुन्या ११ योजना बंद करण्यात आल्या असून, ५ योजनांमध्ये सुधारणा करून त्या अधिक अद्ययावत करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये दुभत्या जनावरांचे व शेळी-मेंढीचे गट वाटप आणि आयुक्तालयाचे बळकटीकरण यांसारख्या बाबींचा समावेश आहे. तसेच, विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प (टप्पा-२) आणि राजे यशवंतराव होळकर महामेष योजना या २ योजना कोणत्याही बदलाशिवाय सुरू ठेवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, भविष्यातील गरजा ओळखून ५ नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये अंडी देणाऱ्या पक्ष्यांद्वारे उद्योजकता विकास, १००० अंडी उबवणी क्षमतेच्या यंत्रांचा पुरवठा, मुरघास संयंत्र वाटप, कर्ज व्याजात सवलत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पशुसंवर्धन व्यवसायात AI आणि ML (मशिन लर्निंग) सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर यांवर भर देण्यात आला आहे. हा बदल राज्याच्या पशुसंवर्धन क्षेत्राला तांत्रिकदृष्ट्या सक्षम व आधुनिक बनवण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.



'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन ठरणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना शाश्वत उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे व पशुपालन या जोडधंद्याला पूर्णतः व्यावसायिक आणि उद्योजकतेचे स्वरूप प्रदान करणे हा आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील तरुण व महिलांना स्वयंरोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

# मुख्यमंत्री पशुधन ग्रामीण उद्योजकता योजनेची फलनिष्पत्ती

ग्रामीण भागात लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे तसेच पशुपालनाला उद्योजकतेचे स्वरुप निर्माण करणे







मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या अंमलबजावणीमुळे राज्याच्या एकूण दूध व मांस उत्पादनात लक्षणीय वाढ अपेक्षित असून, यासाठी संकरित गाई, म्हशी आणि सुधारित जातीच्या शेळ्यांचे वाटप केले जात आहे. तांत्रिक आघाडीवर, ET-IVF (भ्रूण प्रत्यारोपण), Sex Sorted Semen (लिंग निश्चित रेतमात्रा) आणि Cattle Monitoring System यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केल्यामुळे उच्च गुणवत्तेच्या दुभत्या पशुधनाची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. या तांत्रिक प्रगतीमुळे पशुपालकांच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांच्या हातात नियमित भांडवल उपलब्ध होणार आहे, परिणामी त्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी या योजनेअंतर्गत व्याजदर सवलत, सोलर ऊर्जा आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारखी प्रोत्साहने दिली जात आहेत. पशुपालन व्यवसायाला 'कृषि व्यवसायाचा दर्जा' मिळाल्याने मिळणारे पूरक लाभ आणि पशुखाद्य व प्रक्रिया उद्योगांना मिळणारे प्रोत्साहन यामुळे पशुपालनावर आधारित 'स्टार्ट-अप' साठी नवीन वाटा मोकळ्या झाल्या आहेत. एकूणच, ही योजना दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालन या क्षेत्रांना आधुनिकतेची जोड देऊन राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत भरीव योगदान देण्यासाठी सज्ज आहे. या योजनेमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा आश्वासक विकास आगामी काळात होईल, अशी खात्री आहे.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जनावरांचे आरोग्य धोक्यात आले की, शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडते. मात्र, आता अद्ययावत तंत्रज्ञान आणि १९६२ मोबाईल वेटरनरी क्लिनीक यांच्या समन्वयामुळे पशुपालकांना मोठा आधार मिळाला आहे. गेल्या वर्षभरातील आकडेवारी या सेवेच्या यशाची साक्ष देत आहे. या सुविधेमुळे केवळ उपचारांमधील वेळच वाचला नाही, तर दुर्गम भागातील हजारो पशुधनास वेळेत 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. कॉल सेंटर आणि फिरते पथक यांच्यातील तांत्रिक समन्वयामुळे पशुपालकांचा वाहतूक खर्च कमी होऊन, दूध उत्पादनातील घट रोखण्यात यश आले आहे, जे ग्रामीण समृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.



**डॉ. दत्तू श्रीपती गाडे**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
(रोगनियंत्रण), पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७




वर्षभरात या कॉल सेंटरकडे एकूण ४,०१,९९२ कॉल्स प्राप्त झाले. अत्यंत कौतुकास्पद बाब म्हणजे, यापैकी ३,७८,०३५ पशुधनाच्या आजारविषयक समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील पशुपालकांसाठी ही सेवा 'लाईफलाईन' ठरली असून, तब्बल ३४,९७९ पशुपालकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. हे केवळ आकडे नसून, पशुसंवर्धन क्षेत्रातील समर्पित पशुवैद्यकीय सेवेचे निदर्शक आहे. विशेषतः विषबाधा, कठीण प्रसूती व अपघातासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी या यंत्रणेने हजारो मुक्या जीवांना मृत्यूच्या दारातून परत आणले आहे. आधुनिक सॉफ्टवेअर व प्रगत कॉल रेकॉर्डिंग प्रणालीमुळे सेवेतील पारदर्शकता वाढली असून, प्रत्येक पशुपालकाचा फीडबॅक घेऊन त्यात सातत्याने सुधारणा केली जात आहे. भविष्यात एआय (AI) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून प्राथमिक सल्ल्याची व्याप्ती वाढवण्याचा मानस असून, यामुळे राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण पशुवैद्यकीय सेवा पोहोचवणे शक्य होणार आहे.

## 'गोल्डन अवर' मधून ६४ हजारांहून अधिक पशुधनाला जीवदान

अपघात, विषबाधा किंवा कठीण प्रसूती अशा आपत्कालीन स्थितीत 'गोल्डन अवर' (पहिली महत्त्वाची घटका) मध्ये उपचार मिळणे अनिवार्य असते. कॉल आल्यानंतर अवघ्या १.५ तासात पशुवैद्यकीय पथक प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचते. या तत्परतेमुळे एकूण ६४,७५९ पशुधनाचे प्राण वाचले आहेत. यामध्ये २९,१३० मोठे पशुधन व ३५,५६९ लहान पशुधनाचा समावेश आहे. पशुवैद्यकीय शास्त्रात 'गोल्डन अवर' मधील उपचारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण या काळात मिळालेले उपचार पशुधनाच्या मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करतात. केवळ दीड तासाच्या सरासरी वेळेत पथक पोहोचल्यामुळे रक्ताभिसरण, श्वासोच्छवासाचे अडथळे व गंभीर जखमांवर तातडीने नियंत्रण मिळवणे शक्य झाले. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान तर टळलेच, पण त्याचबरोबर ग्रामीण भागातील पशुधनाचे आयुर्मान व उत्पादकता टिकवून ठेवण्यात '१९६२-मोबाईल वेटरनरी क्लिनिक' सेवेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पशुधनाच्या वर्गीकरणानुसार उपलब्ध असलेली ही आकडेवारी सदर प्रणालीच्या अचूक नियोजनाचे उत्तम उदाहरण आहे.




'दारापाशी पशुवैद्यकीय सेवा' या संकल्पनेमुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे. पशुधनास दवाखान्यात नेण्यासाठी लागणारा वाहतूक खर्च व अमूल्य वेळ वाचला आहे. तातडीच्या सेवेमुळे शेतकऱ्याची पशुवैद्यकीय उपचारांसाठीची वणवण थांबली आहे. पशुधनाच्या आजारपणामुळे दूध उत्पादनात घट होत असल्याने पशुपालकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत होता. मात्र, वेळेवर उपचार मिळाल्यामुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर होणारा प्रतिकूल परिणाम टाळला गेला, ज्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान टळले आहे. केवळ उपचारांसाठीच नव्हे, तर लसीकरण व रोग प्रादुर्भावाच्या काळात DW (२०,१७५) आणि व्हीसी (४,४३६) द्वारे या हेल्पलाईनने मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे. त्रिस्तरीय फायद्यांमुळे पशुपालकांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी किरकोळ आजारासाठीही पशुधनाला दवाखान्यात नेणे जिकिरीचे व महागडे ठरत असे, परंतु आता तज्ज्ञ पशुवैद्यक स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत आहेत. यामुळे केवळ आजार बरे होत नाहीत, तर वेळेवर मिळालेल्या मार्गदर्शनामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेही सुलभ झाले आहे. परिणामी, दुग्धव्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन न राहता एक शाश्वत व फायदेशीर व्यवसाय म्हणून आकारास येत आहे. शेतकऱ्यांमधून या सेवेबाबत समाधानाची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

**तंत्रज्ञानाची जोड व भविष्यातील वाटचाल:**
कॉल सेंटरमध्ये वापरले जाणारे अद्ययावत सॉफ्टवेअर, कॉल रेकॉर्डिंग व फीडबॅक सिस्टीम यामुळे सेवेचा दर्जा सुधारला आहे. आगामी काळात ही सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित प्राथमिक सल्ला व व्हॉट्सॲप चॅटबॉट यांसारख्या तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे नियोजन आहे. या प्रगत प्रणालीमुळे प्रत्येक कॉलचे अचूक ट्रॅकिंग व पशुवैद्यकांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे सुलभ होणार आहे. रुरल कनेक्टिव्हिटी व डेटा ॲनालिटिक्सच्या जोडीने, दुर्गम भागातील पशुवैद्यकीय गरजांचे विश्लेषण करुन आवश्यक कार्यवाही नियोजनपूर्वक करता येईल. प्रस्तावित एआय तंत्रज्ञानामुळे पशुपालकांना तातडीच्या परिस्थितीत प्रथमोपचार व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती काही सेकंदात उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे. डिजिटल क्रांतीची ही जोड पशुवैद्यकीय सेवांच्या कार्यक्षमतेत आमूलाग्र बदल घडवून आणणारी ठरेल, ज्यामुळे पशुधनाची हानी कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी मिळेल.

## जेव्हा आगीच्या विळख्यातून कपिला वाचली!

**दिनांक: ११-०३-२०२६ | ठिकाण: आळंदी (पुणे)**

पुणे जिल्ह्यातील आरवी गावातील शेतकरी श्री. रणजित झोटींग यांच्या गोठ्याला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. त्यांच्या गायीच्या शरीराचा १२ ते १५% भाग भाजला गेला होता. दुपारी १२:५० ला कॉल सेंटरला तक्रार प्राप्त होताच 'तिकीट' जनरेट झाले. डॉ. गणेश वारे यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी गाईच्या जखमा स्वच्छ करून त्यावर सिल्व्हर सल्फाडायझिन आणि पोव्हिडोन आयोडीन मलम लावून उपचार सुरू केले व या गाईचे प्राण वाचवले.


" १९६२ ची मोबाईल वेटरनरी व्हॅन आणि डॉक्टर वेळेवर पोहोचले नसते, तर माझ्या गायीचा जीव वाचला नसता. त्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने गाईवर उपचार करुन मला प्रथमोपचाराविषयी माहिती दिली. तसेच पशुधनाच्या व्यवस्थापनाबाबतही मार्गदर्शन केले. मी या सेवेवर अत्यंत समाधानी आहे. - **रणजित झोटींग, पशुपालक** "

" आज मला या सेवेशी जोडले गेल्याचा अभिमान वाटत आहे. एका मुक्या प्राण्याचा जीव वाचवल्यानंतर मिळणारे समाधान शब्दातीत आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि पशुवैद्यकांच्या समर्पित प्रयत्नांमुळे '१९६२' ही सेवा महाराष्ट्रातील पशुपालकांसाठी खऱ्या अर्थाने एक सुरक्षा कवच ठरली आहे. - **डॉ. गणेश वारे** "



# गाई -म्हशीमधील दूध घट वेळीच ओळखा कारणे व करा शास्त्रोक्त उपाय!

'दुग्धव्यवसाय' हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीला जोडधंदा म्हणून सुरू झालेला पशुपालन व्यवसाय आता मुख्य व्यवसाय बनू पाहत आहे. मात्र, अनेकदा चांगल्या जातीची जनावरे असूनही दूध उत्पादनात अचानक घट होते. यास पोषणातील त्रुटी, व्यवस्थापनातील चूक, सुप्त आजार किंवा पर्यावरणीय ताण कारणीभूत असतात. दूध उत्पादनात घट ही केवळ दूध कमी मिळण्यापुरती मर्यादित समस्या नसून, तिचा परिणाम जनावराच्या आरोग्यावर, प्रजनन क्षमतेवर व एकदंरित शेतकऱ्याच्या आर्थिक स्थैर्यावर दीर्घकालीन स्वरूपात होतो. दूध उत्पादनातील ही घट रोखून नफा वाढवण्यासाठी दूध उत्पादन घटण्यामागील शास्त्रीय कारणे, त्याचे आर्थिक व आरोग्यविषयक परिणाम आणि करावयाच्या शाश्वत, परवडणाऱ्या व व्यवहार्य उपाययोजना समजून घेणे आवश्यक आहे.





**प्रा. डॉ. अनिल भिकाने**
माजी विस्तार शिक्षण संचालक,
माफसू, नागपूरमो. ९४२०२१४४५३

## १. दूध उत्पादन घटण्याची प्रमुख कारणे व परिणाम

दूध उत्पादनावर परिणाम करणारे घटक प्रामुख्याने तीन मुख्य गटांमध्ये विभागता येतात:

**अ.** पोषण विषयक कारणे

**ब.** आरोग्य विषयक कारणे

**क.** व्यवस्थापन व पर्यावरणीय ताण

### अ) पोषणविषयक कारणे

**१) ऊर्जेचा अभाव:**

गाय म्हैस विल्यानंतरच्या पहिल्या ६-८ **आठवड्यांत दूध उत्पादन सर्वोच्च पातळीवर असते. मात्र, याच काळात जनावराची भूक तुलनेने कमी असते. परिणामी,** आहारातून मिळणारी ऊर्जा व दुधासाठी लागणारी ऊर्जा यामध्ये तफावत निर्माण होते. या अवस्थेला नकारात्मक उर्जा संतुलन (निगेटिव्ह एनर्जी बॅलेन्स) असे म्हणतात. ही तूट भरून काढण्यासाठी जनावराच्या शरीरातील चरबी जळू लागते. जर ही अवस्था जास्त काळ टिकली तर,

- ❑ जनावर अशक्त होते.
- ❑ शरीराचे वजन झपाट्याने घटते.
- ❑ दूध उत्पादनात घट होते.
- ❑ किटोसिस (कितनबाधा), फॅटी लिव्हर यांसारखे चयापचय विकार उद्भवतात.

अनेकवेळा ही स्थिती “दूध आपोआप कमी झाले” असे समजून दुर्लक्षित केली जाते, पण प्रत्यक्षात हा आहारातील गंभीर दोष असतो.

### २) प्रथिने, खनिजे व जिवनसत्त्वांची कमतरता

दूध हे केवळ पाणी नसून त्यात प्रथिने, फॅट, लॅक्टोज, खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. त्यामुळे आहार संतुलित नसेल तर दूध उत्पादन आणि गुणवत्ता दोन्हीवर परिणाम होतो.

**प्रथिनांची कमतरता:**

* दुधातील फॅट विरहित घन पदार्थ (एस.**एन. एफ.) घटतात.**
* दूध पातळ होते.
* जनावराची प्रतिकारशक्ती कमी होते.

**कॅल्शियम व फॉस्फरसची कमतरता**

- सुप्त दूध ताप/ मिल्क फिव्हर होतो.
- हाडे व सांधे कमजोर होतात.
- गाभण राहण्यात अडचणी येतात उदा. वंध्यत्व व जनावर पुन्हा पुन्हा माजावर येणे.

**सूक्ष्म खनिजांची कमतरता** (कॉपर, झिंक, सेलेनियम, आयोडीन)

- ✓ जनावराची रोग प्रतिकारशक्ती घटते. त्यामुळे ते वारंवार आजार पडतात.
- ✓ दूध उत्पादन टिकत नाही.

**३) पाण्याची कमतरता**

दुधात सुमारे ८५ -८६% पाणी असते. त्यामुळे पाण्याची कमतरता म्हणजे थेट दूध उत्पादनात घट. संशोधनात असे आढळून आले आहे की, जर जनावराला गरजेपेक्षा १०% कमी पाणी मिळाले तर उत्पादनात १५-२०% पर्यंत घट होऊ शकते.

- ❖ उन्हाळ्यात स्वच्छ, थंड व मुबलक पाण्याच्या अभावी कितीही चांगला आहार दिला तरी दूध कमी होते.
- ❖ हिवाळ्यात पाणी अधिक थंड असेल तर पाणी पिण्याचे प्रमाण घटते परिणामी दूध उत्पादन कमी होते.

## ब) आरोग्य विषयक कारणे

**१) अदृश्य (सुप्त) स्तनदाह**



दूध उत्पादन घटण्यामागील सर्वात मोठे, मात्र, सर्वाधिक दुर्लक्षित कारण म्हणजे सुप्त स्तनदाह होय.

* या प्रकारातबाह्य लक्षणे दिसत नाहीत.
* स्तन सुजलेले किंवा वेदनादायक नसते.
* मात्र दुधातील पांढऱ्या पेशी (सोमॅटिक सेल कां
* दूध उत्पादन १०-२५% पर्यंत घटते.
* दुधाची गुणवत्ता घटते.

**२) सुप्त रक्तपरजीवी रोग/गोचीडजन्य रोग:**

थायलेरियोसिस, बबेसियोसस व अनाप्लाझ्मोसिस या रोगांमध्ये रक्तातील लाल पेशी नष्ट होतात, त्यामुळे,

* जनावर थकलेले व अशक्त दिसते.
* भूक कमी होते.
* हलका ताप असतो/नसतो.
* दूध उत्पादन झपाट्याने घटते.योग्यवेळी निदान व उपचार न झाल्यास जनावर दीर्घकाळ कमी दूध देते.

**३) सुप्त चयापचय विकार :** सुप्त किटोसिस, सुप्त दूध ताप आणि कमी तीव्र आम्ल अपचन हे विकार सुरुवातीला दिसून येत नाहीत, पण ते दूध उत्पादन, प्रजनन व आरोग्यावर विपरित परिणाम करतात.

## क) व्यवस्थापन व पर्यावरणीय ताण

**१) उष्णतेमुळे ताण** : वातावरणातील तापमान २५° से. पेक्षा जास्त झाल्यावर गाई-म्हशींमध्ये उष्णता ताण (समर स्ट्रेस) सुरू होतो. उन्हाळ्यात दूध घटण्यामागे उष्णतेचा ताण हा प्रमुख कारणीभूत घटक असतो. यामुळे,

* श्वसनाचा वेग वाढतो.
* चारा खाणे कमी होते.
* शरीरातील ऊर्जा ही उष्णता कमी करण्यात खर्च होते.
* दूध उत्पादन घटते.

**२) थंडीचा ताण**

अतिथंड वातावरणामुळे जनावरात ताण दिसून येतो. त्यामुळे,

* दूध उत्पादन अचानक घटते.
* जास्त उर्जा खर्च झाल्याने वजन घटते.
* खाणे पिणे कमी होते.
* श्वसन रोग होतात.

**३) दूध काढण्याची अयोग्य पद्धत**

* दुध काढण्याची वेळ न पाळणे.
* जनावरावर आरडा-ओरड करणे, मारहाण करणे.
* दूध काढण्याची अयोग्य पद्धत अवलंबणे.

यामुळे जनावरात ॲड्रेनॅलिन संप्रेरक वाढते, जे दूध उतरवणाऱ्या ऑक्सिटोसिन संप्रेरकाच्या कार्यात अडथळा आणते. परिणामी पान्हा न फुटणे व दूध उत्पादन घटते.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




**दूध वाढीसाठी किंवा दुग्धोत्पादन घटू नये म्हणून खालील काळजी घ्यावी.**

### १. आहार व्यवस्थापन:

- ❑ विण्यापूर्वी ३ आठवडे आणि विल्यानंतर ३ आठवडे गाई-म्हशीच्या आहारावर विशेष लक्ष द्यावे.
- ❑ विण्यापूर्वीच्या काळात आहरात कॅल्शियमचे प्रमाण मर्यादित ठेवावे व व्हीटॅमिन डी-३ चा समावेश करावा.
- ❑ विण्यापूर्वी ६ तास, विल्यानंतर व पुन्हा १२ तासानी असे ३ वेळा कॅल्शियम जेल पाजावे.

**चारा- पाणी:** १० लिटर दूध देणाऱ्या गाई- म्हशींसाठी रोज २०-३० किलो हिरवा चारा, ५-७ किलो सुका चारा व ७०-८० लिटर पाणी देण्यात यावे.

**पशुखाद्य:** गाईत प्रती २.५-३ लिटर तर म्हशीत २-२.५ लिटर दुधामागे १ किलो पशुखाद्य (खुराक) द्यावे.

- ❖ नियमीत दुधाच्या प्रमाणात ५०- १०० ग्रॅम खनिज मिश्रण व ३०-५० ग्रॅम मीठ उपलब्ध करून द्यावे.
- ❖ बायपास फॅट व बायपास प्रोटीन-१५ लिटरपेक्षा जास्त दूध देणाऱ्या जनावरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. ज्यामुळे प्रथिनांची व ऊर्जेची तूट भरून निघते, वजन टिकते व दुधातील फॅट सुधारते.

### २) कास आरोग्य व्यवस्थापन:

- ➢ महिन्यातून एकदा सीएमटी चाचणी करावी.
- ➢ दूध काढल्यानंतर सड जंतूनाशक द्रावणात बुडवावे (टीट डिपिंग).
- ➢ गोठा स्वच्छ, कोरडा राहील याची दक्षता घ्यावी.
- ➢ आहारात खनिज व जिवनसत्व मिश्रणांचा अंतर्भाव असावा.
- ➢ दूध काढल्यानंतर जनावर किमान ३० मिनिटे बसणार नाही, यासाठी चारा द्यावा.
- ➢ गाभण काळात गाय-म्हैस आटवताना जंतुनाशक मलम चारही स्तनात सोडावे.

### २. दूध वाढीसाठी शाश्वत उपाययोजना

“उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच स्वस्त, सुरक्षित व शाश्वत” असतो. गाई-म्हशींमधील दूध उत्पादन घट ही बहुतांश वेळा व्यवस्थापनातील त्रुटींची स्पष्ट खूण असते. योग्यवेळी दिलेला संतुलित आहार व आरोग्याची घेतलेली काळजी, हीच दूध वाढीची गुरुकिल्ली आहे. पशुपालकांनी पारंपरिक पद्धतीला आधुनिक विज्ञानाची जोड दिल्यास दूध उत्पादनातील घट रोखून हा व्यवसाय नक्कीच फायदेशीर ठरेल.

### ३) उन्हाळी व्यवस्थापन:

- ▪ छत पांढरे रंगवणे ताडपत्री / गवताचे आच्छादन द्यावे.
- ▪ सकाळी ११ ते सायं. ४ दरम्यान पाण्याचे तुषार फवारावे.
- ▪ गोठ्याच्या सभोवताली सावलीची झाडे लावावीत.
- ▪ गोठा हवेशीर असावा.

### ४) हिवाळी व्यवस्थापन:

- गोठा हा वारा रोखणारा, कोरडा व स्वच्छ असावा.
- उबदारपणा मिळण्यासाठी गोठ्यात भुसा अंथरावा.
- अधिक उर्जायुक्त आहार द्यावा, कोमट पाणी प्यायला द्यावे.

### ५) प्रजनन व्यवस्थापन:

- **दोन वेतातील अंतर:** १२-१४ महिने राहणेसाठी विल्यानंतर ६०-९० दिवसांत गाभण राहणेच्या दृष्टीने दक्षता घेणे.

### ६) गोचीड व्यवस्थापन:

- ❑ गोठ्यातील भेगा, खाच्च-खळगे बुजवावेत.
- ❑ गोठा व परिसरातील अडगळ दुर करावी.
- ❑ गोठ्याच्या पृष्ठभागावरील कचऱ्यासहित अंडी जमा करून जाळावे व नष्ट करावे.
- ❑ फ्लेमगनद्वारे गोठ्याचा पृष्ठभाग अधून-मधून जाळून घ्यावा.
- ❑ गोठ्यामध्ये व पशुधनाच्या शरीरावर वनस्पतीजन्य वा रासायनिक किटकनाशकाची अधून मधून फवारणी करावी.
- ❑ गोठ्यात कोबंड्या सोडाव्यात.



# जीवामृत: पशुधन व शेतीतील समृद्ध सहसंबंध



शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे प्रक्षेत्रावर निर्मित जीवामृतच्या संतुलित वापरामुळे जोमदार वाढ झालेले मका पिक.





**डॉ. अमोल. एस. आहेर**
पशुधन विकास अधिकारी
शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र,
ताथवडे, पुणे-३३

**श्री. राजवर्धन घोगरे**
कृषी सहाय्यक (कं.)
शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र,
ताथवडे, पुणे-३३

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या ताथवडे (पुणे) येथील शासकीय पशुपैदास केंद्राने पशुसंवर्धनासोबतच शाश्वत शेतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. येथे देशी गोवंशाच्या शेण व गोमूत्रापासून शास्त्रोक्त पद्धतीने 'जिवामृत' निर्मिती केली जात आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जमिनीचा पोत सुधारणे व शेतकऱ्यांचा रासायनिक खतांवरील खर्च कमी करणे हा आहे. जिवामृतामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढून पिकांची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. हे नैसर्गिक खत केवळ जमिनीची सुपीकता वाढवत नाही, तर विषमुक्त शेतीलाही प्रोत्साहन देते. केंद्रावर उपलब्ध असलेले हे दर्जेदार जिवामृत शेतकऱ्यांसाठी फायद्याचे ठरणार असून, पशुधन व शेती यांच्यातील समृद्ध सहसंबंध यातून अधोरेखित होणार आहे.

रासायनिक खतांमुळे जमिनीचा पोत कमालीचा खालावला जात असल्याचे आपण नेहमीच पाहतो व ऐकतो. जी शेतजमीन एकेकाळी लोण्यासारखी मऊ व भुसभुशीत होती, जिचा सुगंध मनाला मोहवून टाकत असे, तीच जमीन आज रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे सिमेंटसारखी कडक व निर्जीव झाली आहे. नांगरणी करताना तिचे ढेकूळ फुटत नाहीत. जमिनीची 'प्राणशक्ती' मोजण्याचे एकक म्हणजे 'सेंद्रिय कर्ब'. ५० वर्षांपूर्वी तो १% च्या वर होता. आज तो ०.३% च्या खाली गेला आहे. विज्ञान सांगते की, ज्या जमिनीचा कर्ब ०.५% पेक्षा कमी होतो, ती जमीन 'निर्जीव' समजली जाते. आज बहुतांश शेती अत्यवस्थ आहे. सद्यस्थितीत मातीचे सत्व धोक्यात आले आहे. मातीला आता आणखी युरिया किंवा इतर रासायनिक खतांची गरज नाही. तिला आता गरज आहे ती 'नैसर्गिक उपचारांची'. गाईचे शेण हे कचरा नाही, तर ती 'संजीवनी' आहे. शेणात जे कोट्यवधी जिवाणू आहेत, जे निर्जीव मातीला पुन्हा जिवंत करू शकतात. गोमूत्रात ती ताकद आहे, जी पिकांवरील रोगाला नैसर्गिकरीत्या पळवून लावू शकते. त्यामुळे आजच्या काळात हे शेण 'जसेच्या तसे' टाकून चालणार नाही. या पशुजन्य नैसर्गिक संसाधनावर प्रक्रिया करून, त्याचे रूपांतर एका 'ब्रँडेड प्रॉडक्ट' मध्ये करण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाने जिवामृत निर्मितीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी मंडळाच्या राज्यभरातील प्रक्षेत्रांवर जीवामृत निर्मिती प्रकल्पाची आवश्यकतेनुसार उभारणी करण्यात येत आहे.

जीवामृत हे जमिनीचे 'विरजण'आहे. दुधाचे दही करण्यासाठी आपण काय करतो? त्यात एक चमचा विरजण टाकतो. त्या एका चमच्यात असे जिवाणू असतात जे पूर्ण दुधाला दह्यात रूपांतरित करतात. अगदी तसेच काम 'जीवामृत' करते. हे जमिनीतील सुप्त जिवाणूंना जागे करते व त्यांची संख्या लक्षावधी पटीने वाढवते. ज्यामुळे मातीचा पोत सुधारतो व ती कसदार बनते.

**जीवामृतची वैशिष्ट्ये:**

- १००% नैसर्गिक सेंद्रिय द्रव खत
- मातीतील सुक्ष्मजीवांची संख्या वाढवते.
- पिकांची वाढ जलद व निरोगी करते.
- जमिनीची सुपीकता सुधारते.
- नैसर्गिक जीवाणू मातीची जैविक क्रियाशीलता वाढवतात व पिकांना अधिक पोषण मिळण्यास मदत करतात.



**प्रक्रिया:**

- प्लास्टिकच्या बॅरलमध्ये सर्व घटक एकत्र करा व सावलीत ठेवा. दिवसातून दोनदा काठीने घड्याळाच्या काट्याच्या दिशेने हलवा.
- **४८ तासांची जादू:** पुढील ४८ तासांत या मिश्रणात जिवाणूंचा असा काही स्फोट होतो की, एका लिटरमध्ये कोट्यवधी उपयुक्त जिवाणू तयार होतात.

**जीवामृताची पंचसूत्रीः**

जिवामृत बनवणे अत्यंत सोपे आहे. यासाठी लागणारे साहित्य प्रत्येकाच्या गोठ्यात असते.

१. **देशी गाईचे शेण:** १० किलो (जिवाणांचे घर)
२. **गोमूत्रः** १० लिटर (अँटी-फंगल व नत्र.
३. **गूळ (काळा):** २ किलो (जिवाणूंसाठी शक्ती / ऊर्जा देण्यासाठी)
४. **बेसन (डाळीचे पीठ):** २ किलो (जिवाणंसाठी प्रोटीन)
५. **वड/ पिंपळाखालची माती/ज्या शेतात जीवामृत वापर करणार आहेत त्या शेतातली :** १ मूठ (ज्यात नैसर्गिक जिवाण् असतात)
६. **पाणी:** १८० लि. या प्रक्रियेतून २०० लि. जीवामृत तयार होते.



**जीवामृत वापरण्याच्या पद्धती:**

**ठिबक / ट्रेंचिंग साठी :** १६० लीटर पाण्यात ४० लीटर जीवामृत मिसळावे / प्रती एकर वापरावे.

**फवारणी:** १५ ली. फवारणी पंपसाठी १ ली. गाळून मिसळावे.

**कुंडीतील झाडांसाठी जीवामृत वापर प्रमाण**

मातीमध्ये घालण्यासाठी (Soil Drenching)

**प्रमाण :** १ लीटर पाण्यात ५०-१०० ml जीवामृत मिसळावे (म्हणजे अंदाजे ५-१०%)

**कसे द्यावे?**

दर १५ दिवसांनी एकदा थेट मातीवर ओतावे किवा झाडा पानांच्या खालून वरून फवारणी करावी.

**साठवण सूचना:**

- सावलीत व ठंडी ठिकाणी ठेवा.
- थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.
- झाकण पूर्ण घट्ट बंद करू नये.
- वापरण्यापूर्वी हलके हलवा.

**खबरदारी:**

- खराब वास किंवा जास्त बुरशी दिसल्यास वापरू नका.
- मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवा.
- रासायनिक खतांपासून वेगळे साठवा.
- **जीवामृत: सेंद्रिय शेतीचा पाया-** जीवामृत पूर्णपणे नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले सेंद्रिय मातीपोषक द्रावण आहे. देशी गायीचे शेण, गोमूत्र, गूळ, डाळ पीठ व स्थानिक माती यांचा वापर करून तयार केलेली शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे येथील ही सहावी बॅच असून, उत्पादीत जीवामृताला शेतकऱ्याकडून मागणी नोंदविण्यात येत आहे.



जीवामृताची किमया... रसरशीत आणि जोमदार मका!



**डॉ. शितलकुमार मुकणे**
अति. आयुक्त पशुसंवर्धन
तथा, CEO:MLDB

"कृषी निविष्टांचा खर्च कमी करून जमिनीचा पोत सुधारण्यासाठी 'जीवामृत' हा आता एक शाश्वत पर्याय म्हणून समोर येत आहे. शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे (पुणे) येथे राबवण्यात येत असलेल्या जीवामृत प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत आहेत. कसदार व विषमुक्त हिरवा चारा पशुधनाला उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या आरोग्यात मोठी सुधारणा दिसून येत आहे. याचा थेट सकारात्मक परिणाम दुग्धोत्पादनावर झाला असून, सरासरी दूध उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. प्रक्षेत्रावर आतापर्यंत जीवामृतच्या सहा बॅचेस यशस्वीपणे उत्पादित करण्यात आल्या आहेत. स्थानिक शेतकरी वर्गाकडूनही जीवामृतला मोठी मागणी होत आहे. शेतकरी व नागरिकांची मागणी विचारात घेता, लवकरच उत्पादित जीवामृतची दरनिश्चिती केली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य शेतकरी आणि परसबाग करणाऱ्या नागरिकांना हे जीवामृत माफक दरात सहज उपलब्ध होऊ शकेल. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून मातीचा पोत सुधारण्यासाठी जीवामृत हा सर्वात स्वस्त आणि प्रभावी मार्ग आहे. कृषी निविष्टांवरील (खते व औषधे) होणारा अवाढव्य खर्च कमी करून शाश्वत भरघोस उत्पन्न मिळवण्यासाठी शेतकरी बांधवांनी जीवामृतचा जास्तीत जास्त अवलंब करावा."

# मथुरा-लभान गोवंश : वैशिष्ट्ये व प्रजनन क्षेत्र



मथुरा-लभान गोवंशाचे प्रजनन क्षेत्र हे प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यातील किनवट, हिमायतनगर व भोकर या तालुक्यांमध्ये तसेच लगतच्या जिल्ह्यांमध्ये आढळून येते. मथुरा-लभान गोवंश हा मथुरा, लभानी व बंजारा समुदायाकडे २०० वर्षांपेक्षा अधिक काळापासून असल्याचे समजते.

**मथुरा-लभान गोवंश संशोधक टीम**

**डॉ.पंडीत नांदेडकर, डॉ. सखाराम खुणे, डॉ. राजकुमार पडिले, डॉ. प्रविणकुमार घुले, डॉ. महेश चोपडे डॉ.बळीराम कातकडे**

या गायी प्रामुख्याने पांढऱ्या रंगाच्या असून, क्वचितच फिकट राखाडी रंगाच्या आढळतात. त्वचा चमकदार व शरीराला घट्ट चिकटलेली असते. डोळे काळे व पाणीदार, कपाळ रुंद व सपाट, तर चेहरा निमुळता असतो. या गायी मध्यम बांध्याच्या असून, शिंगे बाहेरच्या दिशेने वर जाऊन पुन्हा आत वळलेली असतात. कान मध्यम आकाराचे असून बाह्य पृष्ठभाग राखाडी रंगाचा असतो. दोन्ही पुढील पायांमधील छातीचा भाग अरुंद असतो. छातीचा पोळ मध्यम आकाराचा व लटकलेला असतो.

शेपटी पायाच्या घोट्यापर्यंत लांब असून शेपटीचा गोंडा काळा व झुपकेदार असतो. कास मध्यम आकाराची व शरीराला घट्ट चिकटलेली असून दुधाची शीर ठळक व सरळ असते. स्तन दंडगोलाकार असतात. गायी साधारणतः दिवसाकाठी १.५ ते २ लिटर दूध देतात.



या गायींचे प्रजनन वळूद्वारे नैसर्गिक पद्धतीने केले जाते, त्यामुळे या जातीचे मूळ शारीरिक गुणधर्म टिकून राहिलेले दिसून येतात. या गोवंशातील नर जनावरे मादीपेक्षा आकाराने मोठी असतात. मथुरा-लभान बैलांचा वापर प्रामुख्याने शेतीकाम व ओढकामासाठी केला जातो.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



मथुरा-लभान गोवंश सूर्योदयापूर्वी जंगलात चराईसाठी एकत्र कळपाने सोडले जातात व सूर्यास्तापूर्वी परत आणले जातात. चारा व पाण्याच्या अभावामुळे उन्हाळ्यात या गोवंशाचे स्थलांतर केले जाते व जून महिन्यात पुन्हा मूळ ठिकाणी परत आणले जाते. मथुरा-लभान गोवंशाची स्वतंत्र नवीन जात म्हणून नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेला अनुवांशिकीय अभ्यास पशु अनुवंश व पैदास विभाग, पशुवैद्यक महाविद्यालय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (म.प.म.वि.वि.), परभणी आणि पशु संवर्धन विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नुकताच हाती घेण्यात आला आहे.

" यवतमाळ उमरखेड, किनवट, आदिलाबाद येथील परिसरात मथुरा लभान हा गोवंश दिसतो. शेती आणि ओढकामासाठी बैलांचा वापर होतो. हा काटक गोवंश आहे. 'माफसू' कडून या देशी गोवंशाला ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**डॉ. पंडित नांदेडकर, पशु अनुवंश व पैदास विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी** "



" कुलगुरू डॉ. नितीन पाटील, संशोधन संचालक डॉ. नितीन कुरकुरे यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील अवर्णित जनावरांची नोंद घेणे सुरू आहे. त्यानुसार 'माफसू'कडून मथुरा लभान गोवंशाला ओळख मिळवून देण्यासाठी डॉ. पंडित नांदेडकर यांच्या नेतृत्वात सर्वेक्षणाचे काम हाती घेतले आहे. "

**डॉ. अनिल भिकाने, विस्तार संचालक, माफसू, नागपूर**

# वेळेवर गर्भधारणा = दरवर्षी वासरू = शाश्वत दुग्ध उत्पादन

दुग्धव्यवसायामध्ये पशुधनाची गर्भधारणा हा प्रजननाचा केवळ एक जैविक टप्पा नसून, तो संपूर्ण व्यवसायाचा आर्थिक कणा आहे. योग्य वेळी गर्भधारणा होणे व सुरक्षित प्रसूती होणे यावरच दुग्धव्यवसायाचे यश अवलंबून असते. गाई किंवा म्हशीमध्ये दुधाची निर्मिती ही नैसर्गिकरित्या वेतानंतर (प्रसूतीनंतर) सुरू होते. जर जनावराची गर्भधारणा लांबली, तर 'ड्राय पिरीयड' (दूध न देण्याचा काळ) वाढतो, ज्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते. दरवर्षी एक वेत मिळाल्यास दुधाचे उत्पादन चक्र टिकून राहते. दोन वेतांमधील अंतर जितके कमी, तितका तो पशुपालक फायद्यात राहतो. गर्भधारणा वेळेवर झाल्यास हे अंतर मर्यादित राहते, ज्यामुळे जनावराच्या संपूर्ण आयुष्यातील दुधाचे एकूण उत्पादन वाढते. थोडक्यात सांगायचे तर, **"वेळेवर गर्भधारणा = दरवर्षी वासरू = शाश्वत दुग्ध उत्पादन"**. हे सूत्र पाळल्यास दुग्धव्यवसाय कधीही तोट्यात जात नाही.





**प्राध्यापक डॉ. नितीन मार्कंडेय**
माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (पशुप्रजनन शास्त्र विभाग)
पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी मो. ९४२२६५७२५१

प्रसूतीनंतर तिसऱ्या महिन्यात गायी तर चौथ्या महिन्यात म्हशी पुन्हा गाभण राहण्यासाठी सोपे, बिन खर्चिक, अल्पश्रमिक, आवश्यक आणि उपयुक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने उपाययोजना करण्यासाठी पशुपालकाने पशुप्रजननविषयक प्राथमिक माहितीचा अभ्यास व अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यामध्ये पशुपालकांनी गायी-म्हशींचा माज ओळखणे, योग्य वेळी रेतन करणे आणि खनिज मिश्रणांचा आहारात वापर करणे यांकडे लक्ष द्यावे. जनावरांच्या गर्भाशयाची आरोग्य तपासणी करून घेतल्यास वेळेत गर्भधारणा होण्यास मदत होते. यामुळे दोन वेतातील अंतर कमी होऊन दुग्धव्यवसायाचा नफा वाढतो. नियमित जंतनिर्मूलन आणि संतुलित आहार ही या यशाची गुरुकिल्ली आहे.



पशुपालक मित्रहो, दुग्धव्यवसायातील नफा हा पशुधनाच्या वेळेवर होणाऱ्या प्रजननावर अवलंबून असतो. गायी-म्हशी प्रसूतीनंतर लवकरात लवकर गाभण राहण्यासाठी गोठ्यात खालील माहितीचा सविस्तर तक्ता लावून त्याचे तंतोतंत पालन करा.

| अ.क्र. | बाब | मार्गदर्शक सूचना / अंमलबजावणी |
|---|---|---|
| १ | प्रसुतीनंतरचा पहिला माज दिवस | गाय ६०, म्हैस ९० |
| २ | प्रसुतीनंतरचा पहिला माज | रेतनासाठी नेहमी अयोग्य |
| ३ | पहिल्या माजाचा कालावधी | तासात नोंद करा. |
| ४ | पहील्या माजाचा बळस | तार लोंबत फोटो आवश्यक |
| ५ | सामान्य माजाचा बळस/ सोट/ स्त्राव | रंगहीन, पारदर्शक, वासरहित, स्वच्छ , घट्ट, सहज न तुटणारा |
| ६ | गर्भाशयदाह बळस | पांढरट/ धुरकट/ पिवळसर/दहीरंग |
| ७ | गर्भाशयदाह बळस | बळसाची प्रयोगशाळा तपासणी आवश्यक |
| ८ | गर्भाशय दाह | उपचार आवश्यक, पशुवैद्यकीय सल्ला |
| ९ | शरीर वजन नोंद | पहिल्या माजापासून दर ७ दिवसास |
| १० | प्रसूतीनंतर दुसरा माज | पहिल्या माजानंतर २१ दिवस |
| ११ | प्रसूतीनंतर दुसरा नियमीत माज | रेतन योग्य माज |
| १२ | रेतन योग्य माज | पशुवैद्यकीय खात्री आवश्यकच |
| १३ | रेतन योग्य माज | सामू ७.०० खात्री आवश्यक |
| १४ | रेतन योग्य माज | तिसऱ्या टप्प्यात रेतन आवश्यक |
| १५ | रेतमात्रा निवड | पैदास धोरणानुसार अचूकता |
| १६ | रेतन योग्य माज | सहज, सुलभ, ताणरहित रेतन |
| १७ | रेतनानंतर पुन्हा रेतन | २४ तास अंतरानंतर |
| १८ | योग्य रेतन | अनुभवी, प्रशिक्षित तंत्रज्ञ आवश्यक |
| १९ | योग्य रेतन | तापमापक, ३७°C पाणी आवश्यक |
| २० | योग्य रेतन नोंद | रेतनानंतर रेतमात्रा जपून ठेवणे |
| २१ | रेतनानंतर निरीक्षण | माज लक्षणांसाठी २४ तास |
| २२ | माजानंतर रक्तस्त्राव | सामान्यपणे दोन दिवसानंतर |
| २३ | माजानंतर रक्तस्त्राव | शरीरक्रियेसाठी उपचार नकोत |
| २४ | माजानंतर पूरक उपाय | क्षार, गुळ, शतावरी |
| २५ | मध्यचक्र माज | रेतनानंतर १० दिवसास |
| २६ | मध्यचक्र माज | रेतन नको, स्त्रीबीज सुटत नाही |
| २७ | प्राथमिक गर्भधारणा चाचणी | रेतनानंतर १२ दिवसांपासून |
| २८ | प्राथमिक गर्भधारणा चाचणी | मुत्रातील बीज उगवण प्रतिबंध |
| २९ | प्राथमिक गर्भधारणा चाचणी | पशुपालकाकडून घरच्याघरी |
| ३० | रेतनानंतर २१वा दिवस | माज लक्षणे अपेक्षित नाही |

| अ.क्र. | बाब | मार्गदर्शक सूचना / अंमलबजावणी |
|---|---|---|
| ३१ | रेतनानंतर २१वा दिवस | माज लक्षणे म्हणजे विफल गर्भधारणेचे संकेत |
| ३२ | आधुनिक गर्भधारणा पडताळणी | रेतनानंतर २१-२५ दिवस सोनोग्राफी सुविधा आवश्यक |
| ३३ | आधुनिक गर्भधारणा पडताळणी | पशुवैद्यक सहाय्य आवश्यक |
| ३४ | आधुनिक गर्भधारणा पडताळणी | गोठ्यात, सुलभ चाचण्या शक्य |
| ३५ | आधुनिक गर्भधारणा पडताळणी | तात्काळ निदान देणाऱ्या चाचण्या उपलब्ध |
| ३६ | आधुनिक गर्भधारणा पडताळणी | रु ३००-३५० किंमत |
| ३७ | गर्भधारणा निदान | सोनोग्राफीद्वारे तपासणी |
| ३८ | गर्भधारणा निदान | सोनोग्राफी सुरक्षित,खात्रीशीर |
| ३९ | रेतनानंतर पाठपुरावा | २१, ४२, ६३ दिवसास निरीक्षण |
| ४० | गर्भधारणा | निदानानंतर खात्री नेहमी आवश्यकच |
| ४१ | गर्भधारणा खात्री | गाय साठवा, म्हैस सत्तरवा दिवस |
| ४२ | गर्भधारणा खात्री | पशुवैद्यकाकडून तपासणी |
| ४३ | कालवड- रेडी पहिला माज | अनुक्रमे १०, १८ महिने वयास |
| ४४ | कालवड-रेडी पहिला माज | अनुक्रमे २५०-२७५ किलो शरीरवजन |
| ४५ | कालवड/रेडी पहिला माज | पशुवैद्यकीय तपासणी अनिवार्य |
| ४६ | कालवड/ रेडी पहिला माज | सामान्य प्रजनन संस्थेची खात्री |
| ४७ | कालवड/ रेडी पहिला माज | रेतनास अयोग्यच |
| ४८ | कालवड/ रेडी माजचक्र | सुरुवातीला अनियमित |
| ४९ | कालवड/ रेडी माजचक्र | ३/४ माजास नियमित |
| ५० | कालवड/ रेडी रेतन | पहिल्या नियमित माजास |
| ५१ | कालवड/ रेडी माज | कालावधी+लक्षणे कमीच |

**टिप:** हा तक्ता गोठ्यात अशा ठिकाणी लावा जिथे तो सहज वाचता येईल. प्रत्येक रेतनानंतर वापरलेली रेतमात्रा (Straw) जतन करून ठेवा, जेणेकरून नोंदी ठेवणे सोपे जाईल. नियमित जंतनिर्मूलन व संतुलित आहार ही यशस्वी गर्भधारणेची गुरुकिल्ली आहे.

**तिप्पट वाढवा पशुगर्भधारणा प्रमाण :**

पशुपालनात गायी म्हशी सदोषतेमुळे उलटतात यात विशेष काही नाही. पण महिनोन् महिने सतत उलटतच राहतात असे होणारे आर्थिक नुकसान फार मोठे असते. सतत उलटणाऱ्या जनावरात नेहमी फार मोठे खर्चिक उपचार केले जातात आणि त्यातून फायदा अत्यंत कमी दिसून येतो, कारण असे उपचार "निदान न करता" होतात, याची जाणीव असूनही पशुपालक सदैव गप्पच असतात. पशुधनाचा "सुप्त गर्भाशय दाह" हाच मोठा शत्रू असल्याने पशुपालकांनी अधिक जाणकार आणि सजग होणे गरजेचे आहे. त्यासाठी पशुवैद्यकाकडून गर्भाशयाची वेळेत तांत्रिक तपासणी करून घेऊन नेमके कारण शोधावे. अचूक निदानानंतर केलेले शास्त्रोक्त उपचारच जनावरांना पुन्हा गाभण ठेवण्यासाठी आणि पशुपालकाचा अनावश्यक खर्च वाचवण्यासाठी यशस्वी ठरतात.



### महत्वाचे मुद्दे:

१. कोरडा गोठा, मोजा नोटा
२. वेळेवर माज, परिपूर्ण आहाराची हमीच
३. एका माजचक्राचे नुकसान, किमान चार हजार
४. माजाचा जास्त काळ, स्त्रीबीज सुटण्यास विलंब\
५. माजाचा खराब बळस, सुप्त गर्भाशय दाह
६. सतत माज, सदाफळी वंध्यत्वाचा प्रकार
७. अनियमित माज, रेतनास अपात्र
८. पहिला माज, रेतनास नेहमी अपात्र.
९. अधिक प्रमाणात स्त्राव, रेतनास अपात्र माज
१०. माजानंतर रक्तस्त्राव, आधीच संपलेला माज
११. महाग प्रतिजैविक इंजेक्शने, परिणाम अनिश्चित
१२. गर्भाशयात औषधी, अपुराच होतो उपचार
१३. निदानाशिवाय उपचार, निरोपयोगी खर्च
१४. लिखीत नोंदींचा अभाव, तोट्याकडे वाटचाल
१५. रेतमात्रेस पर्याय वळू नाही, स्वत:ची प्रयोगशीलता टाळा
१६. रेतनच फायदेशीर, २४ प्रकारचे हमखास लाभ
१७. फार लांबलेला माज, रेतन नकोच
१८. तुटक माज, दुसऱ्या टप्प्यातही रेतन आवश्यक
१९. लक्षणं अधारित रेतन नको, स्त्रीबीज खात्रीच योग्य
२०. उलटण्याची कारणे हजार, कौशल्य हाच प्रहार

## गोठ्यातच करा गर्भाशयदाहचे निदान

**पद्धत १:** माजचक्र कालावधी अभ्यासा. **निदान**-माजानंतर ३ ते ८ दिवसात दिसणारा स्त्राव म्हणजे तीव्र गर्भाशयदाह. माजानंतर १३ ते १७ दिवसानंतर दिसून येणारा स्त्राव म्हणजे कमी किंवा सौम्य तीव्र स्त्राव केवळ २१ दिवसापूर्वी (दिड दोन दिवस कमी अधिक काळ शक्य) नोंद झालेल्या पशुधनातच रेतन करा.

**पद्धत २:** बळसाचा रंग व वास पडताळा. **निदान**- संपूर्णपणे पारदर्शक, वासरहित, तार तुटणारा, चिकट स्त्राव अपेक्षित व रेतन योग्य. मात्र पांढरट, धुरकट, पिवळट किंवा पारदर्शक स्त्रावात मध्येमध्ये / शेवटी पांढरे भाग, अधिक पातळ स्त्राव आढळल्यास रेतन टाळा.

**पद्धत ३:** बळसाचा सामू तपासा. **निदान**-बळस हा शरिर क्रियेतील भाग असल्याने फक्त ७.० सामू अपेक्षित व तेव्हाच रेतन करा. बाजारातून सामू पेपर पट्टी मिळवा. एक पट्टी दोनदा अर्धी करुन वापरता येईल. गळणारा तुटणारा बळस सामू पेपरवर चिटकवून होणारा रंग बदल प्रमाणकाशी तुलना करून नोंद करा. बदल आढळल्यास रेतन टाळा. सामू तपासणीसाठी डिजीटल पीएच मीटर उपलब्ध आहेत, त्याचा वापर करा.

### लक्षात ठेवा, घातक गर्भाशय दाह

१. जीवाणूमुळे होतो सौम्य/ तीव्र गर्भाशयदाह..
२. जीवाणूचे असंख्य प्रकार वातावरणात आहेत.
३. जीवाणू गोठ्यातील वातावरणात असतातच.
४. सगळे जीवाणू नेहमी संधी साधू असतात.
५. मानवी चुका गर्भाशय दाहास पूरक ठरतात.
६. जीवाणूंचा गर्भाशयात चूकांमुळेच प्रवेश घडतो.
७. जीवाणू प्रवेश शरीराकडून नेहमी थांबवला जातो.
८. योनीचे पडदे, गोलाकार स्नायू जंतूप्रवेश रोखतात.
९. भरपूर स्त्राव प्रमाण जीवाणू बाहेर टाकते.
१०. जीवाणू रोगनिर्माणाबाबत सतत संधी शोधतात.
११. गर्भाशयात जीवाणू अनिष्ट परीणाम करतात.
१२. शरीरावरचा ताण जीवाणूंना संधी पुरवतो.
१३. जीवाणूमुळे गर्भाशयात पु निर्माण होतो.
१४. जीवाणूंसाठी बरीच प्रतिजैविके निष्प्रभ ठरतात.
१५. दाहनिर्माण करणाऱ्या जीवाणूंचे संच बदलतात.
१६. सततचा प्रतिजैविक वापर शरीरातील प्रतिरोध वाढतो.
१७. प्रतिजैविक शरीराची रोगप्रतिकारक्षमता कमी करतात.
१८. जीवाणूमुक्त गर्भाशयासाठी उपचार खर्चिक असतो.
१९. निरोगी गर्भाशयासाठी शरीराची क्षमता वाढवावी.
२०. गर्भाशयदाह संपर्कातील जनावरात सहज पसरतो.
२१. सुप्त गर्भाशय दाह, छुपा शत्रु असतो.
२२. गर्भाशयात जिवाणूंची संख्यावाढ झपाट्याने होते.
२३. मिश्र प्रकारचे जिवाणू, नवीन गटात फोफावतात.
२४. २४. गर्भाशयातील रोगजंतू, फलित गर्भ संपवतात.
२५. जीवाणूंनिर्मित दाह, गर्भाशयापुरताच असतो
२६. गर्भाशयदाह प्रादुर्भाव, सतत कमी जास्त होतो
२७. गर्भाशयदाहाचा स्त्राव कासदाह शक्यता वाढवतो.
२८. गर्भाशयदाहयुक्त जनावर वेदना दाखवत नाही.
२९. अचूक निदानाचा पाठपुरावा नेहमी अपेक्षित.
३०. गर्भाशय निरोगी तरच अधीक गर्भधारणा.





**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**पद्धत ४:** बळस परिक्षण करा. **निदान:** सोडीयम हायड्रोक्साइडची बाटली बाजारात मिळते. १० टक्का या प्रमाणातील रसायन व योनीमार्गातून स्त्रवणारा बळस सम प्रमाणात एकत्र करा, थोडा गरम करा (५०-६०°c). बळस असणारा भाग पांढरा पांढरा असेल तर गर्भाशय दाह नाही, फिकट पिवळा झाला तर गर्भाशय दाहची शक्यता. दिसून येणारा पिवळा म्हणजे मध्यम प्रकारचा गर्भाशय दाह व गडद पिवळा म्हणजे तीव्र गर्भाशय दाह. पिवळट रंग सौम्य, फिका, ठळक, गडद असताना रेतन नकोच.

पद्धत ५: माजाच्या बळसाची काचपट्टी बनवा. **निदान:** माजाचा बळस योनीतून पडताना सरळ काचपट्टीवर घ्या, फक्त वाळवा आणि शहरातील माणसासाठी असणाऱ्या खाजगी रोगनिदान प्रयोगशाळेत या काचपट्टीवर ग्राम स्टेन करा. पीएमएन पेशी म्हणजे अधिक केंद्रक असणाऱ्या पेशी संख्या किती याची नोंद करा. अशा पीएमएन पेशींची ५ टक्क्याहून अधिक संख्या आढळल्यास हमखास सुप्त गर्भाशय दाह असल्याची खात्री होते. अशावेळी शास्त्रोक्त उपचार करणे आवश्यक ठरते.





**तोटा सहन करू नका, संघटनात्मक योग्य मागणी करा पशुधनात गर्भधारणा प्रमाण वाढवा.**

१. माजावर असलेल्या जनावरांचा स्वच्छ बळस माजाच्या मधल्या टप्प्यात काचपट्टीवर घेवून शाळेतसुद्धा असणाऱ्या साध्या सूक्ष्मदर्शक यंत्राखाली तपासून नेचे पानांची रचना पडताळणी आग्रहाने करा.

२. माजाचा बळस प्रयोगशाळेत तपासणी करून कोणते प्रतिजैविक अधीक प्रभावी याची सोय तालुक्यात उपलब्ध करून घ्या.

३. हमखास ५०% पशुधनात उपयोगी ठरणारा गर्भाशय दाहवरचा उपचार म्हणजे २/३/४% प्रमाणातील ल्युगॉल्स आयोडीन. दुसऱ्या वेळी उलटलेल्या आणि गर्भाशय दाह हेच कारण असलेल्या प्रत्येक गायी-म्हशीत याच उपचाराचा आग्रह धरा.

४. प्रत्येक तालुका लघु चिकित्सालयात ओझोन उपचार पद्धती सुरू करण्याची मागणी करा. प्रतिजैविकांवर मात आणि प्रभावी असणारी ओझोन उपचार पद्धती स्वस्त, सुरक्षित, सोपी व प्रभावी असल्याने सुप्त गर्भाशय दाह संपवता येतो.

५. शरीरातील रोगप्रतिकारक्षमता प्रभावीपणे वाढवणारी अत्यंत परिणामकारक उपचार पद्धती म्हणजे प्रतिजैविकांचा वापर न करता सुरक्षित सहाय्यक " ईकोलाय एलपीएस " किंवा "ओएस्टर ग्लायकोजन" औषधी. महाग आहे, केवळ खरेदीसाठी पण एक प्रभावी उपचार किंमत तिनशे फक्त आणि एका खरेदीत ५० जनावरात उपचार करता येतात. उपलब्धतेबाबत मागणी करा.

६. दोनपेक्षा अधीक वेळा उलटलेली जनावरे उपचार करण्यासाठी "तीन पशुवैद्यकांचा संघ" असा विचार, पाठपुरावा, धोरण, पद्धत ठरवेल अशी सोय निर्माण करण्याचे प्रयत्न करा.

७. पशुप्रजनन विनिमयन कायद्या अंतर्गत पुन्हा पुन्हा रेतनाची नोंद झाल्यास कारणे मागवण्यात येत आहेत, तेंव्हा दर तीन महिन्यात, तालुक्यात एका ठिकाणी, पारदर्शक पद्धतीत एका रेतमात्रेची प्रत पडताळणी होण्यासाठी आग्रह धरा.

८. उलटणाऱ्या जनावरात गर्भाशय दाह नसेल तर स्त्रीबीज विकृती ओळखण्यास सोनोग्राफी तपासणी उपयुक्त ठरत असल्याने अशा तपासण्या मोठ्या प्रमाणात होतील यासाठी मागणी नोंदवा.

९. माजावर असणारी जनावरे भरविण्यासाठी दुर्बीण यंत्र उपलब्ध आहेत, तालुक्यात एक तरी असे यंत्र रेतन अचूकतेसाठी खरेदीसाठी आग्रह धरा.

१०. लिंगवर्धित रेतमात्रा वापरताना जनावरांच्या माजाबाबत अजिबात दोष नाही याची सखोल पडताळणी, तज्ञ पशुवैद्यकाकडून होण्यासाठी सजगता दाखवा.

# स्कॉटलंडहून मुळशीच्या मातीपर्यंत

## आयटी इंजिनिअर्सच्या डेअरी फार्मला पशुसंवर्धन विभागाचा तांत्रिक आधार!





शिक्षणासाठी परदेशात जाणे व तिथेच स्थायिक होणे हे अनेकांचं स्वप्न असते. मात्र, स्कॉटलंडमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये मास्टर्स पूर्ण केलेल्या एका तरुणाने मायदेशात परतत शेती आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणारा एक अनोखा आदर्श आपल्या मित्रासोबत निर्माण केला आहे. विशाल देशमुख आणि त्यांचे मित्र कौस्तुभ पवार यांनी मुळशी तालुक्यातील अंबडवेट येथे 'क्रीम ऑफ लाईफ' या नावाने अत्याधुनिक डेअरी फार्म सुरू करून पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला नवी दिशा दिली आहे. पशुसंवर्धन विभागाने विविध पशुवैद्यकीय सेवांचा निरंतर आणि समयोचित पुरवठा करुन त्यांच्या या विजिगीषु प्रयत्नांना तांत्रिक ज्ञान व मार्गदर्शनाचा आधार दिला आहे, त्याबद्दल...

विशाल देशमुख यांनी स्कॉटलंडसारख्या देशातून कॉम्प्युटर सायन्समध्ये 'मास्टर्स' पदवी संपादन केली, तर कौस्तुभ पवार यांनी बीटेक आणि एमबीएचे शिक्षण पूर्ण करून व्यवस्थापन क्षेत्रातील बारकावे आत्मसात केले. परदेशात आणि कॉर्पोरेट क्षेत्रात करिअरच्या उत्तमोत्तम संधी उपलब्ध असतानाही, या दोन मित्रांनी मातीच्या ओढीने मायदेशी परतत दुग्ध व्यवसायात उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामागे केवळ व्यवसाय करणे हा उद्देश नव्हता, तर पारंपरिक दुग्ध व्यवसायाला तंत्रज्ञानाची आधुनिक जोड देऊन त्याचे 'मॉडेल' बदलणे हे मुख्य ध्येय होते. म्हणूनच, त्यांनी 'क्रीम ऑफ लाईफ' डेअरी फार्ममध्ये केवळ दूध उत्पादनावर लक्ष केंद्रित न करता, डेटा-ड्रिव्हन मॅनेजमेंट आणि जागतिक दर्जाच्या मानकांचा वापर केला आहे.

### स्वयंचलित मिल्किंग पार्लर आणि शुद्धता

अंबडवेट, (ता. मुळशी, जि. पुणे) येथील त्यांच्या फार्मवर पूर्णपणे स्वयंचलित 'मिल्किंग पार्लर' बसवण्यात आले आहे. यामुळे गायींचे दूध काढण्यापासून ते प्रक्रियेपर्यंत कुठेही मानवी स्पर्श होत नाही. ग्राहकांना शुद्ध आणि मलईदार दूध मिळावे, यासाठी त्यांनी स्वतःचा प्रक्रिया प्रकल्पही उभारला आहे.

**गायींचे आरोग्य अन् 'काऊ कम्फर्ट'**

नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांनी खास पंजाबमधून शुद्ध जातीच्या जर्सी गायींची खरेदी केली. या गायींना केवळ पाळणे नव्हे, तर त्यांना आनंदी आणि निरोगी ठेवण्यासाठी फार्मवर 'काऊ कम्फर्ट' तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. अत्यंत आरामदायक वातावरण, पोषक आहार आणि स्वच्छतेमुळे येथील गायी तणावमुक्त राहतात, ज्याचा थेट सकारात्मक परिणाम दुधाच्या गुणवत्तेवर होतो. पुण्यातील कुटुंबांना थेट फार्मवरून शुद्ध दूध उपलब्ध करून देणे हे या तरुणांचे मुख्य ध्येय आहे. यासोबतच महाराष्ट्रात उत्तम जातीच्या जर्सी गायींची पैदास करण्यासाठीही हे दोघे प्रयत्नशील आहेत.

केवळ पारंपरिक पद्धतीने दूध काढणे आणि विकणे या पलीकडे जाऊन, त्यांनी फार्मवर 'स्मार्ट फार्मिंग' संकल्पना राबवली आहे. यामध्ये गायींच्या आरोग्यापासून ते दुधाच्या पॅकेजिंगपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आधुनिक सॉफ्टवेअर आणि स्वयंचलित यंत्रणेचा वापर केला जातो. तंत्रज्ञान आणि शेतीची ही सांगड केवळ दुधाची शुद्धता टिकवून ठेवत नाही, तर उत्पादकता वाढवून एक विश्वासार्ह ब्रँड निर्माण करण्यातही मोलाची भूमिका बजावत आहे.





आमच्या अत्याधुनिक डेअरी फार्मला पशुसंवर्धन विभागाचे पिरंगुट पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे. शैलजा खोब्रागडे, डॉ. भुमिका रणवीरकर व श्री. राजेंद्र माळी यांचे नियमित मार्गदर्शन लाभत असते. याशिवाय, लसीकरण, औषधोपचार व व्यवस्थापन पद्धती याविषयी पशुसंवर्धन विभागाकडून नेहमीच चांगले सहकार्य व अनुकूल माहिती उपलब्ध करुन दिली जाते. आपत्कालीन परिस्थितीतही पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या सेवा आमच्या प्रक्षेत्राला दिल्या आहेत यासाठी पशुसंवर्धन विभागाचे नेहमीच आभारी आहोत. या व्यवसायात आम्हाला केवळ दूध विकायचे नाही, तर आरोग्याचा एक दर्जा द्यायचा आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने पशुपालन हा व्यवसाय किती फायदेशीर आणि सन्मानाचा होऊ शकतो, हे आम्हाला सिद्ध करायचे आहे.

**श्री. विशाल देशमुख व कौस्तुभ पवार**
संस्थापक, क्रीम ऑफ लाईफ



# पशुसंवर्धन विभागाची मिळता साथ
# मल्हारा गावात उगवली समृद्धीची पहाट



अमरावती जिल्ह्यातील मल्हारा (ता. अचलपूर) येथील शासकीय मराठ-वऱ्हाड/मदर डेअरी संकलन केंद्रात झालेले व्यावसायिक व आर्थिक परिवर्तन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सक्षमीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे. केवळ दोन वर्षांच्या कालावधीत दुग्ध संकलनात झालेली २२५०% वाढ ही पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव हगाणे यांच्या तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्याची पावती आहे.

डॉ. वैभव हगोणे यांनी पदभार स्वीकारला तेव्हा मल्हारा केंद्राची अवस्था अत्यंत प्राथमिक होती. केवळ २० लिटर संकलन असणे म्हणजे हे केंद्र बंद पडण्याच्या मार्गावर होते. मात्र, त्यांनी आपल्या चतुःसूत्रीचा (तांत्रिक, प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि विस्तार) प्रभावी वापर केला. डॉ. वैभव यांनी शासकीय दराची (४०-४५ रु.) हमी पशुपालकांना पटवून दिल्याने पशुपालकांचा विश्वास वाढला. आज ४५० लिटर दुधामुळे दररोज सुमारे १८,००० ते २०,००० रुपये थेट गावातील पशुपालकांच्या हातात पडत आहेत.

केवळ दूध गोळा करणे महत्त्वाचे नाही, तर दुधाची गुणवत्ता (FAT/SNF) टिकवणे गरजेचे असते. डॉ. वैभव यांनी पशुपालकांना सकस आहार, लसीकरण आणि गोठा व्यवस्थापनाचे तांत्रिक ज्ञान दिले. यामुळे जनावरांची उत्पादकता वाढली आणि दुधाचा प्रति लिटर दरही वाढला. कमी संकलनामुळे शासकीय यंत्रणेचा खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी स्थिती होती. ४५० लिटरच्या टप्प्यामुळे हे युनिट आता आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले असून शासकीय दूध योजनेला या भागातून मोठा आधार मिळाला आहे.

डॉ. हगोणे यांचे व्यवस्थापकीय व विस्तार विषयक प्रयत्न करतानाच उत्तम पशुपैदास, पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन, खाद्य व्यवस्थापन व दूध संकलन केंद्रावर पारदर्शकता आणून शेतकऱ्यांचा शासनावर विश्वास निर्माण केला. दुग्धव्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या हातात दर १० दिवसाला रोख रक्कम येऊ लागली आहे. यामुळे दैनंदिन घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि औषधोपचारासाठी शेतकऱ्यांना आता सावकारावर अवलंबून राहावे लागत नाही. गावात दरमहा अंदाजे ६ ते ७ लाख रुपयांची जादा गुंतवणूक होत आहे. या उपलब्ध भांडवलामुळे पशुपालकांना आता पशुसंवर्धनविषयक इतर व्यवसायही करण्याची प्रेरणा मिळाली आहे. ज्यामुळे आगामी काळात हे गाव उद्योजकीय केंद्र म्हणून नावारुपाला येईल.

महिला सक्षमीकरण:

मल्हारा गावात दुग्धव्यवसायाचे व्यवस्थापन प्रामुख्याने महिला करतात. डॉ. हगोणे यांनी महिलांना आधुनिक पशुपालनाचे प्रशिक्षण दिल्याने, त्यांच्या कष्टाला योग्य मोल मिळाले आहे. दुधाचे पैसे थेट बँक खात्यात जमा होत असल्याने महिलांचा घरातील आर्थिक निर्णयांमध्ये सहभाग वाढला आहे. शहरात जाऊन १०-१५ हजारांची नोकरी करण्यापेक्षा, स्वतःच्या गावी १० गायी पाळून सन्मानाने जगता येते, हा आत्मविश्वास दुग्धव्यवसायामुळे तरुणांमध्ये निर्माण झाला आहे. गावात दुधाची उपलब्धता वाढल्याने मुलांच्या आहारात दुधाचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे भविष्यातील पिढी सशक्त होण्यास मदत होत आहे. जनावरांची संख्या वाढल्याने नैसर्गिक खत (शेणखत) मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले आहे. यामुळे रासायनिक खतांवरील खर्च कमी होऊन जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होत आहे.

शासकीय दूध योजनेसाठी मल्हारा हे गाव आता एक 'प्रॉफिट सेंटर' बनले आहे. दर्जेदार दुधामुळे पशुपालकांना तूप, पनीर आणि खवा यांसारख्या पदार्थातून अधिक नफा कमवता येत आहे. शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय किती प्रभावी ठरू शकतो, हे मल्हारा गावाने सिद्ध केले आहे. डॉ. वैभव हगोणे यांनी मल्हारा गावात केवळ दूध संकलन वाढवले नाहीत, तर त्यांनी शेतकऱ्यांचा स्वाभिमान आणि आर्थिक स्तर उंचावला आहे. अमरावती जिल्ह्यातील इतर गावांसाठी हा एक 'रोल मॉडेल' प्रकल्प ठरला आहे. या कार्यात त्यांना जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. संजय कावरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मराठ-वऱ्हाड डेयरी प्रकल्पाचे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांची महत्वपूर्ण साथ लाभली.






























**पशुपालक शेतकरी बांधवांनो,**

आपणास एका महत्त्वाच्या विषयावर आवाहन करण्यात येते की, आपल्या पशुधनाची ओळख पटवण्यासाठी व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक पशुधनाच्या कानात १२ अंकी इअर टॅग असणे आता बंधनकारक आहे. फक्त इअर टॅग असून चालणार नाही, तर तो आपल्या आधार कार्ड व मोबाईल क्रमांकाशी लिंक असणेही आवश्यक आहे.

जर आपल्या पशुधनाच्या कानात टॅग नसेल, तर पशुवैद्यकीय दवाखान्यातंर्गत देण्यात येणाऱ्या सेवा म्हणजेच उपचार, कृत्रिम रेतन, लसीकरण, अतिवृष्टी, पूर व वीज पडून जनावर दगावल्यास मिळणारी शासकीय मदत, बाजारपेठेतील खरेदी-विक्री व जनावरांची कायदेशीर वाहतूक, जनावरांवर मिळणारे बँकांचे कर्ज व विमा संरक्षण, तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध वैयक्तिक लाभाच्या योजना या सुविधा मिळण्यासाठी अडचणी येवू शकतात. त्यामुळे, ज्या पशुधनाला अद्याप टॅग नाही, त्यांना त्वरित टॅग लावून घ्यावा. ज्या पशुधनास यापुर्वीच टॅग आहे, त्यांनी तो आपल्या आधार व मोबाईल क्रमांकाशी लिंक असल्याची खात्री करा. पशुधनाची केवायसी (KYC) अपडेट करण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी त्वरित संपर्क साधा. वेळेत टॅग लावल्यास, भविष्यात होणारे नुकसान टाळता येवू शकेल. आपले पशुधन ही आपली व देशाची संपत्ती आहे. त्याच्या उन्नतीसाठी आजच नोंदणी पूर्ण करा.



# महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:




**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य